बरवें जालें आलों या ठाया । होतें संचित ठायींचों पाया ।
देहभाव पालटली काया । पडली छाया ब्रह्मींची ॥ २ ॥
जोडिलें नें सरे हें धन । अविनाश आनंदघन ।
अमूर्तमूर्ति मधुसूदन । समें चरण देखियेले ॥ ३ ॥
जुनाट जुगादिचें नाणें । बहुता काळाचें ठेवणें ।
लोपलें होतें पारिखेपणें । ठावचळण चुकविला ॥ ४ ॥
आतां या जीवाचियासाठीं । न सुटे पडलिया मिठी ।
तुका ह्मणे सिणलों जगजेठी । न लवीं दिठी दुसऱ्याची ॥ ५ ॥

॥ ६१३ ॥

मी तंव अनाथ अपराधी । कर्महीन मतिमंदबुद्धी ।
तुज म्यां पाठविलें नाहीं कधीं । वाचे कृपानीधी मायबापा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं ऐकिलें गाइलें गीत । धरिली लाज सांडिलें हित ।
नावडे पुराण बैसले संत । केली बहुत परनिंदा ॥ ध्रु ॥
केला करविला नाहीं उपकार । नाहीं दया आली पीडितां पर ।
करूं नये तो केला व्यापार । वाहिला भार कुटुंबाचा ॥ २ ॥
नाहीं केलें तीर्थाचें भ्रमण । पाळिला पिंड करचरण ।
नाहीं संतसेवा घडलें दान । पूजावलोकन मुर्तीचें ॥ ३ ॥
असंगसंग घडले अन्याय । बहुत अधर्म उपाय ।
न कळे हित करावें तें । काय नये बोलूं आठवूं तें ॥ ४ ॥
आप आपण्या घातकर । शत्रु जालों मी दावेदार ।

१ दे. ठायींच.—२ पं. हें न सरे.—३ प. समचरणी.—४ पं. पुराणा.—५ पं. आप आपणियां.

तूं तंव कृपेचा सागर । उतरीं पार तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ६१४ ॥

आतां पावेन सकळ सुखें । खादलें कदा तें नेखें ।
अवघें सरलें पारिखें । सकळ देखें माहियेरें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जवळी विठ्ठल रखुमाई । बहिणी बंधु बाप आई ।
सकळ गोताची च साई । पारिखें काई ऐसें नेणिजे ॥ ध्रु ॥
जगदाकारीं जाली सत्ता । वारोनि गेली पराधीनता ।
अवघें आपुलें चि आतां । लाज आणि चिंता दुऱ्हावली ॥ २ ॥
वावरे इच्छा वसे घरीं । आपुले सत्तेचे माहेरीं ।
करवी तैसें आपण करीं । भीड न धरी चुकल्याची ॥ ३ ॥
सोसिला होता सासुरवास । बहुतांचा बहुत दिवस ।
बहु कामें पुरविला सोस । आतां उदास आपुल्यातें ॥ ४ ॥
करिती कवतुक लाडें । मज बोलविती कोडें ।
मायबाप उत्तरें गोडें । बोले बोबडें पुढें तुका ॥ ५ ॥

॥ ६१५ ॥

सर्वसुखाचिंया आशा जन्म गेला । क्षण मुक्ती यत्न नाहीं केला ।
हिंडतां दिशा सीण पावला । मायावेष्टिला जीव माझा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझें स्वहित नेणती कोणी । कांहीं न कारितां मजवांचुनी ।
सज्जन तंव सुखमांडणी । नेणती कोणी आदि अंत ॥ ध्रु ॥
काय सांगों गर्भींची यातना । मज भोगितां नारायणा ।

---

१ दे. क. पावन.—२ पं. न देखे.—३ पं माहियेरे.—४ पं सर्व सुखाची.

मांस मळ मूत्र जाणा । तुज क्षणक्षणा ध्यात[1] असें ॥ २ ॥
मज चालतां प्रयाणकाळीं । असतां न दिसती जवळी ।
मृत्तिके मृत्तिका कवळी । एकले मेळीं संचिताचे ॥ ३ ॥
आतां मज ऐसें करीं गा देवा । कांहीं घडे तुझी चरणसेवा ।
तुका विनवीतसे केशवा । चालवीं दावा संसारें ॥ ४ ॥

॥ ६१६ ॥

अगा ए सावळया सगुणा । गुणनिधिनाम नारायणा ।
आमची परिसा विज्ञापना । सांभाळीं दीना आपुलिया ॥ १ ॥
॥ ध्रु० ॥ बहु या उदराचे कष्ट । आह्मांसि केलें कर्मभ्रष्ट ।
तुमची चुकविली वाट । करीं वटवट या निमित्यें ॥ ध्रु ॥
जालों पांगिला जनासी । संसाराची आंदणी दासी ।
न कळे कधीं सोडविसी । दृढपाशीं बहु बांधलों ॥ २ ॥
येथें तों नये आठव कांहीं । विसावा तो क्षण एक नाहीं ।
पडिलों आणिके प्रवाहीं । हित तों कांहीं दिसे चिं[*] ना ॥ ३ ॥
जीवित्व वेचिलें[2] वियोगें । हिंडतां प्रवास वाउगें ।
कांहीं व्याधि पीडा रोगें । केलिया भोगें तंडातोडी[3] ॥ ४ ॥
माझा मीं च जालों शत्रु । कैचा पुत्र दारा कैचा मित्रु ।
कासया घातला पसरु । अहो जगद्गुरु तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ६१७ ॥

आतां मज धरवावी शुद्धि । येथुनी परतवावी बुद्धि ।
ध्यात्रें सोडवुनि कृपानिधि । सांपडलों संधीं काळचक्रीं ॥ १ ॥

---

१ पं. ध्यातसें.—२ दे. क. त. वेचलों.—३ पं. तडातडा वोडी.—* पं. हा शब्द नाहीं.

॥ ध्रु. ॥ करिसील तरि नव्हे काई । राईचा डोंगर पर्वत राई ।
आपुले करुणेची खाई । करीं वो आई मजवरी ॥ ध्रु ॥
मागील काळ अज्ञानपणें । सरला स्वभावें त्या गुणें ।
नेणें आयुष्य जालें उणें । पुढील पेणें अंतरलें ॥ २ ॥
आतां मज वाटतसे भय । दिवसेंदिवस चालत जाय ।
येथें म्या येउनि केलें काय । नाहीं तुझे पाय आठविले ॥ ३ ॥
करूनि अपराध क्षमा । होतील केले पुरुषोत्तमा ।
आपुले नामीं घ्यावा प्रेमा । सोडवीं भ्रमोंपासुनिया[2] ॥ ४ ॥
हृदय वसो तुमच्या गुणीं । ठाव हा पायांपें चरणीं ।
करूं हा[3] रस सेवन वाणी । फिटे तों धणी तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ६१८ ॥

जेणें हा जीव दिला दान । तयाचें करीन चिंतन ।
जगजीवन नारायण । गाईन गुण तयाचे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जो या उभा* भीवरेच्या[4] तिरीं । कट धरूनियां करीं ।
पाउलें सम चि साजिरीं । अंतरीं धरोनि राहेन ॥ ध्रु ॥
जो या असुरांचा काळ । भक्तजनप्रतिपाळ ।
खेळे हीं लाघवें सकळ । तयाच्या भाळ पायांवरी ॥ २ ॥
जो या गोपाळांच्या मेळीं । खेळु खेळे वनमाळी ।
रसातळा नेला बळी । राहे पाताळीं स्वामी माझा ॥ ३ ॥
जो हा लावण्यपुतळा । जयाचें अंगीं सकळ कळा ।

१ पं. होतें.—२ पं भवभ्रमापासुनि.—३ दे. त. कहा रस सेवन.—४ क. भीमरेच्या * हा शब्द नाहीं.

जयाचे गळां वैजयंतीमाळा । तया वेळोवेळां दंडवत ॥ ४ ॥
जयाचें नाम पाप नासी । लक्ष्मी ऐसी जयाची दासी ।
तो[1] हा तेजःपुंज रासी । सर्वभावें त्यासि तुका शरण ॥ ५ ॥

॥ ६१९ ॥

काय मी उद्धार पावेन । काय कृपा करील नारायण ।
ऐसें[2] तुह्मी सांगा संतजन । करा समाधान चित्त माझें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय हें खंडईल कर्म । पारुषतील धर्माधर्म ।
कासयानें तें कळे वर्म । ह्मणउनी श्रम वाटतसे ॥ ॥
काय हो स्थिर राहेल बुद्धी । कांहीं अरिष्ट ने[3] येल मधीं ।
धरिली[4] जाईल ते शुद्धी । शेवट कधीं तो मज न कळे ॥ २ ॥
काय ऐसें पुण्य होईल गांठीं । घालीन पायीं देवाचे मिठी ।
मज तो कुरवाळील[5] जगजेठी । दाटइन कंठीं सद्गदित ॥ ३ ॥
काय हे[6] निवतील डोळे । सुख तें देखोनि सोहळे ।
संचित कैसें तें न कळे । होतील डोहळे वासनेसी ॥ ४ ॥
ऐसी चिंता करीं सदा सर्वकाळ । रात्रिदिवस हे चि* तळमळ ।
तुका ह्मणे नाहीं आपुलें बळ । जेणें फळ पावें निश्चयेंसी ॥ ५ ॥

॥ ६२० ॥

तूंचि अनाथाचा दाता । दुःख मोह नासावया चिंता ।
शरण आलों तुज आतां । तारीं कृपावंता मायबापा ॥ १ ॥

---

१ दे. जो हा तेजोपुंज्यरासी. क. तो हा तेजो पुंज्यरासी.—२ प. सांगाल तुह्मी संतजन.—३ त पं. न येलकीं मधीं —४ त. पं. धारिलें जाईल तें सिद्धी.—५ दे. त. कुरवाळील.—६ त. ते. * दे. क. "हे चि" हे शब्द नाहींत.

संतसंगति देई चरणसेवा । जेणें[1] तुझा विसर न पडावा ।
हा च भाव माझिया जीवा । पुरवीं देवा मनोरथ ॥ २ ॥
मज[2] भाव प्रेम देई कीर्ती । गुण नाम वर्णावया स्तुती ।
विघ्नां सोडवूनि हातीं । विनंती माझी परिसावी हे ॥ ३ ॥
आणीक कांहीं नाहीं मागणें । सुखसंपत्तिराज्यचाड धनें[3] ।
सांकडें न पडे तुज जेणें । दुजें भक्तीविण मायबापा ॥ ४ ॥
जोडोनियां कर पायीं ठेवीं[4] माथा । तुका विनवी पंढरिनाथा ।
रंगीं वोडवावी रंगकथा । पुरवीं व्यथा[5] मायबापा ॥ ५ ॥

॥ ६२१ ॥

सेंदरीं[6] हें देवी दैवतें । कोण *तीं पुजी भुतेंकेतें ।
आपुल्या पोटा जीं रडतें । मागती शितें अवदान ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आपुले इच्छे आणिकां पीडी । काय तें देईल बराडी ।
कळों हीं आली तयाची जोडी । अल्प रोकडी बुद्धि अँधरा[7] ॥ ७ ॥
दासीचा पाहुनरउखतें[8] । धणी देईल आपुल्या हातें ।
करुणाभाषणउचितें । हें तों रितें सतंत शक्तिहीन ॥ २ ॥
काय तें थिल्लरींचें पाणी । ओठ न भिजे न फिटे धणी ।
सीण तरीं आर्दी आवसानीं । क्षोभे पुरश्चरणीं दिलें फळ ॥ ३ ॥
विलेपनें बुजाविती तोंड । भारें[9] खोल वाहाती उदंड ।

---

१ त. जेणें तुझा विसर न व्हावा. पं. क. जेणें हा तुझा विसर न पडावा.—२ पं. मज भाव देई परमप्रीति.—३ त. धनें.—४ पं. ठेवितों.—५ पं. देवा मनारेथ.—६ त. सेंदरीं हेंदरीं देवी दैवते. पं. सेंदरी हेदरीं दैवतें.—७ पं. अधीरा.—८ त. पं. पाहुणेर उखीतें.—९ क. भारखोळ.—* पं. हा शब्द नाहीं.

करविती आपणयां दंड । ऐसियास भांड ह्मणे देव तो ॥ ४ ॥
तैसा नव्हे नारायण । जगव्यापक जनार्दन ।
तुका ह्मणे त्याचें करा चिंतन । वंदू चरण येती सकळें ॥ ५ ॥

॥ ६२२ ॥

विषयओढीं भुलले जीव । आतां यांची कोण करील कींव ।
नुपजे नारायणीं भाव । पावोनि ठाव नरदेह ॥ १ ॥
॥ धृ. ॥ कोण सुख धरोनि संसारीं । पडोनि काळाचे आहारीं ।
माप या लागलें शरीरीं । जालियावरी सळे ओढिती ॥ ध्रु ॥
बापुडीं होतील सेवटीं । आयुष्यासवें जालिया तुटी ।
भोगिले मागें पुढें ही कोटी । होईल भेटी जन्मासी ॥ २ ॥
जुंतिलीं[१] घाणां बांधोनि डोळे । मागें जोडी आर तेंगेंही पोळे ।
चालिलों किती तें न कळे । दुःखें हारंबळे[२] भूकतान ॥ ३ ॥
एवढें जयाचें निमित्त । प्रारब्ध क्रियमाण संचित ।
तें हें देह मानुनि अनित्य । न करिती नित्य नामस्मरण ॥ ४ ॥
तुका ह्मणे न वेंचतां मोल । तो हा यासि महाग विठ्ठल ।
वेंचितां फुकाचे चि बोल । केवढें खोल अभागिया ॥ ५ ॥

॥ ६२३ ॥

आले हो संसारा तुह्मी एक करा । मुक्तिमारग हळू चि धरा ।
काळदंड कुंभयातना थोरा । कां रे अघोरा दैंचकसी[३] ना ॥ १ ॥
नाहीं त्या यमासि करुणा । बाहेर काढितां कुडी प्राणा ।

१ पं. जुंतिले.–२ क. हारबळे. पं. आरंबळे.–३ दे. क. देखसी ना.–

ओढाळ सांपडे जैं[1] धान्या । चोर यातना धरिजेतां ॥ २ ॥
नाहीं दिलें पावेल[2] कैसा । चालतां पंथें[3] तेणें वळसा ।
नसेल ठाउकें ऐकतो कैसा । नेती बंद जैसा धरोनियां ॥ ३ ॥
क्षण एक नागवा पायीं । न चलवे तया करितां कांहीं ।
ओढिती[4] कांटवणा सोई । अग्निस्तंभीं बाही कवटाळविती ॥ ४ ॥
देखोनि अंगें कांपती । तये नदीमाजी चालविती ।
लागे ठाव न लगे वुडविती । वरि मारिती यमदंड ॥ ५ ॥
तानभूक न साहावे वेळ । तो राखिती कितएिक काळ ।
पिंड पाळूनि कैसा सीतळ । तो तप्तभूमीं ज्वाळ लोळविती ॥ ६ ॥
ह्मणउनी करा कांहीं सायास । व्हावेल तर व्हा रे उदास ।
करवेल तर करा नामघोष । सेवा भक्तिरस तुका ह्मणे ॥ ७ ॥

॥ ६२४ ॥

न बोलसी तें ही कळलें देवा । लाजसी आपुलिया नांवा ।
तुज मी नाहीं घालीत गोवा । भीड केशवा कासयाची ॥ १ ॥
उतरीं आपुला हा पार । मजशीं बोलोनि उत्तर ।
माझा तुज नव्हे अंगीकार । मग विचार करीन मी ॥ २ ॥
दात्या[5] आणि मागत्यासी । धर्मनीति तरी बोलिली ऐसी ।
यथानशक्ति टाकेल तैसी । बाधी दोघांसी विन्मुखता ॥ ३ ॥
ह्मणोनि करितों मी आस । तुझिया वचनाची वास ।
धीर हा करूनि सायास । न टळें नेमास आपुलिया ॥ ४ ॥

---

१ प. जैसे.–२ दे. क पं. पावइल.–३ त. पंथें.–४ दे. क. वोढितां.–५ दे. त. दात ५। आणि मागतयासी.

तुझें म्यां घेतल्या वांचून । न वेजें एथूनि वचन[1] ।
हा चि माझा नेम सत्य जाण । आहे नाहीं ह्मण तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ६२५ ॥

आतां मी न पडें सायासीं । संसारदुःखाचिये पाशीं ।
शरण रिघेन संतांसी । ठाव पायांपाशीं मागेन त्यां ॥ १ ॥
न कळे संचित होतें काय । कोण्या पुण्यें तुझे लाधले[2] पाय ।
आतां मज न विसंबें माय । मोकलूनि धाय विनवीतसें ॥ २ ॥
बहुत जाचलों संसारें । मोहमायाजाळाच्या विखारें ।
त्रिगुण येतील लहरें । तेणें दुःखें थोरें[3] आक्रंदलों ॥ ३ ॥
आणीक दुःखें सांगों मी किती । सकळ संसारस्थिती ।
न साहे पाषाण फुटती । भयें[4] चित्तीं कांप भरलासे ॥ ४ ॥
आतां मज न साहवे सर्वथा । संसारगंधीची हे* वार्ता ।
जालों वेडा असोनि जाणता । पावें अनंता तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ६२६ ॥

आतां तुज कळेल तें करीं । तारिसी तरि तारीं मारीं ।
जवळी अथवा दुरी धरीं । घालीं संसारीं अथवा नको ॥ १ ॥
॥ धृ. ॥ शरण आलों नेणतपणें । भाव आणि भक्ति कांहीं च नेणें ।
मतिमंद सर्वज्ञानें । बहु रंक उणें रंकाहुनी ॥ ध्रु. ॥
मन स्थिर नाहीं माझिये हातीं । इंद्रियें धांवतां नावरती ।
सकळ खुंटलिया युक्ती । शांति निवृत्ति जवळी नाहीं ॥ २ ॥

---

१ पं. येथून न वजें वचन.—२ दे.क. त. लाधती.—३ पं. थोर.—४ पं. भय कांप चित्तीं भरलासे.—* त. हा शब्द नाहीं.

सकळ निवेदिला भाव । तुझिये पायीं ठेविलां जीव ।
आतां करीं कळे तो उपाव । तूं चि सर्व ठाव माझा देवा ॥ ३ ॥
राहिलों धरूनि विश्वास । आधार नेटीं तुझी कास ।
आणीक नेणें मी सायास । तुका ह्मणे यास तुझें उचित ॥ ४ ॥

॥ ६२७ ॥

देवा तूं कृपाकरुणासिंधु । होसी मायबाप आमचा बंधु ।
जीवनसिद्धि साधनसिंधु । तोडिसी भवबंधु काळपाश ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शरणागता वज्रपंजर । अभयदाना तूं उदार ।
सकळां देवा तूं अगोचर । होसी अविकार अविनाश ॥ ध्रु ॥
भागली स्तुति करितां फार । तेथें मी काय तें गव्हार ।
जाणावया तुझा हा विचार । नको अंतर देऊं आतां ॥ २ ॥
नेणें भाव परि ह्मणवीं तुझा । नेणें भक्ति परि करितों पूजा ।
आपुल्या नामाचिया काजा । तुज केशीराजा लागे धांवणें ॥ ३ ॥
तुझिया बळें पंढरीनाथा । जालों निर्भर तुटली व्यथा ।
घातला भार तुझिया माथां । नेमीं सर्वथा तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ६२८ ॥

कोण सुख धरोनि संसारीं । राहों सांग मज बा हरी ।
अवघ्या नाशिवंता परी । थितां दुरी अंतरसी ॥ १ ॥
प्रथम केला गर्भीं वास । काय ते सांगावे सायास ।
दुःख भोगिलें नव ही मास । आलों जन्मास येथवरी ॥ २ ॥

---

१ दे देवां.—२ पं. भिये.—३ पं. बाहेरी.—४ पं. थिता दुरी तूंहि अंतरसी.

बाळपण गेलें नेणतां । तारुण्यदशे विषयव्यथा ।
वृद्धपणीं प्रवर्तली चिंता । मरें मागुता जन्म धरीं ॥ ३ ॥
क्षण एक तो ही नाहीं विसावा । लक्ष चौऱ्यांशीं घेतल्या धांवा ।
भोवंडिती पाठीं लागल्या हांवा । लागो आगी नांवा माझ्या मीपणा ॥४॥
आतां पुरे ऐसी भरोवरी । रंक होऊनि राहेन द्वारीं ।
तुझा दास मी दीन कामारी । तुका ह्मणे करीं कृपा आतां ॥ ५ ॥

॥ ६२९ ॥

सुख या संतसमागमें । नित्य दुनावे तुझिया नामें ।
दहन होती सकळ कर्मे । सर्वकाळ प्रेमें डुलेतसों ॥ १ ॥
ह्मणोनि नाहीं कांहीं चिंता । तूं चि आमुचा मातापिता ।
बहिणी बंधु आणि चुलता । आणिकां गोतां सर्वांठायीं ॥ ३ ॥
ऐसा हा कळला निर्धार । माझा तुज न पडे विसर ।
अससी देऊनियां धीर । बाह्य अभ्यंतर मजजवळा ॥ ३ ॥
दुःख तें कैसें नये स्वप्नासी । भुक्तिमुक्ति जाल्या कामारी दासी ।
त्यांचें वर्म तूं आह्मांपाशीं । सुखें राहिलासी प्रेमाचिया ॥ ४ ॥
जेथें तुझ्या कीर्तनाचा घोष । जळती पापें पळती दोष ।
काय तें उणें आह्मां आनंदास । सेवूं ब्रह्मरस तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ६३० ॥

देवा तूं आमचा कृपाळ । भक्तिप्रतिपाळ दीनवत्सळ ।
माय तूं माउली स्नेहाळ । भार सकळ चालविसी ॥ १ ॥

---

१ पं. दुणावे—२ क पं. डुलतसों.—३ दे. त. मा माझा तुज न पडे विसर—४ पं. भक्तिपाळ.

तुज लागली सकळ चिंता । राखणें लागे वांकडें जातां ।
पुढती[1] निरविसी संतां । नव्हे विसंबतां धीर तुज ॥ २ ॥
आह्मां भय चिंता नाहीं धाक । जन्म मरण काहीं एक ।
जाला इहलोकीं परलोक । आलें सकळैकवैकुंठ ॥ ३ ॥
न कळे दिवस कीं राती[2] । अखंड लागलीसे ज्योती ।
आनंदलहरीची गती । वर्णूं कीर्ती[3] तया सुखा ॥ ४ ॥
तुझिया नामाचीं भूषणें । तीं यें[4] मज लेववलीं लेणें ।
तुका ह्मणे तुझियान गुणें[5] । काय तें उणें एक आह्मां ॥ ५ ॥

॥ ६३१ ॥

न पवे सन्निध वाटते चिंता । वारियां[6] बहुतांची सत्ता ।
नुगवे पडत जातो गुंता । कर्मी[7] बळिवंता सांपडलों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बहु भार पडियेला शिरीं । मी हें माझें मजवरी ।
उघड्या नागविलों चोरीं । घरिच्याघरीं जाणजाणतां ॥ ध्रु. ॥
तुज मागणें इतुलें आतां । मज या निरवावें संतां ।
जाला कंठस्फोट आळवितां । उदास आतां न करावें ॥ २ ॥
अति हा निकट समय । मग म्यां करावें तें काय ।
दिवस गेलिया ठाकईल छाय । उरईल हाय रातिकाळीं ॥ ३ ॥
होईल संचिताची सत्ता । अंगा येईल पराधीनता ।
ठाव तो न दिसे लपतां । बहुत[8] चिंता प्रवर्तली ॥ ४ ॥
ऐसी या संकटाची संधी । धांव घालावी कृपानिधी ।

१ दे. त. पुढती.—२ दे. त. रात्री.—३ पं. किती.—४ त. पं. तोये मज लेवविलें लेणें.—
५ पं. तुझिया गुणें.—६ क. वारियां; त. वरया; पं. वरीया.—७ पं. कर्मे.८— पं. बहु.

तुका ह्मणे माझी बळबुद्धी । सकळ सिद्धी पाय तुझे ॥ ५ ॥

॥ ६३२ ॥

आतां धर्माधर्मीं कांहीं उचित । माझें विचारावें हित ।
तुज मी ठाउका पतित । शरणागत परि जालों ॥ १ ॥
॥ धु. ॥ येथें राया रंका एकी सरी । नाहीं भिन्नाभिन्न तुमच्या घरीं ।
पावलों पाय भलत्या परी । मग बाहेरी न घालावें ॥ ध्रु ॥
ऐसें हें चालत आलें मागें । नाहीं मी बोलत वाउगें ।
आपुलिया पडिल्या प्रसंगें । कीर्ति हे जगें वाणिजेते[1] ॥ २ ॥
घालोनियां माथां बैसलों भार । सांडिला लौकिक वेव्हार ।
आधीं हे विचारिली थार । अविनाश पर पद ऐसें ॥ ३ ॥
येथें एक वर्म पाहिजे धीर । परि म्यां लेखिलें असार ।
देह हें नाशिवंत जाणार । धरिलें सार नाम तुझें ॥ ४ ॥
केली आरागुक सकळां हातीं । धरावें धरिलें तें चित्तीं ।
तुका ह्मणे सांगितलें संतीं । देई अंतीं ठाव मज देवा ॥ ५ ॥

॥ ६३३ ॥

बरवें झालें आलों जन्मासी । जोड जोडिली मनुष्य देहा ऐसी ।
महा लाभाची उत्तम रासी । जेणें[2] सुखासी पात्र होइजे ॥ १ ॥
॥ धु.॥ दिलीं इंद्रियें हात पाय कान । डोळे मुख बोलावया वचन ।
जेणें तूं जोडसी नारायण । नासे जीवपण भवरोग ॥ ध्रु ॥
तिळेंतीळ पुण्य सांचा पडे । तरि हें बहुतां जन्मीं जोडे ।

१ क. वाखाणिजेते. पं. वाखाणिजे—२ त. पं. जेणें सर्व सुखासी.

नाम तुझें वाचेसी आतुडे । समागम घडे संतांचा ॥ २ ॥
ऐसिये पावविलों ठायीं । आतां मी काई होऊं उतराई ।
येवढा जीव ठेवीन पायीं । तूं माझे आई पांडुरंगे ॥ ३ ॥
फेडियेला डोळियांचा कवळ । धुतला गुणदोषांचा मळ ।
लावूनि स्तनीं केलों सीतळ । निजविलों बाळ निजस्थानीं ॥ ४ ॥
नाहीं यां* आनंदासी जोडा । सांगतां गोष्टी लागती गोडा ।
आला आकारा आमुच्या चाडा । तुका ह्मणे भिडा भक्तीचिया[1] ॥ ५ ॥

॥ ६३४ ॥

अल्प भाव अल्प मती । अल्प आयुष्य नाहीं हातीं ।
अपराधाची वोळिलों मूर्ती । अहो वेदमूर्ती परियेसा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ किती दोषा देऊं परिहार । गुणदोषें मळिलें अंतर ।
आदि वर्तमान भविष्याकार । गेला अंतपार ऐसें[2] नाहीं ॥ ध्रु ॥
विविध कर्म चौऱ्याशी फेरा । त्रिविध भोग या शरीरा ।
कर्मकोठार पांजरा । जन्मजरामरणसांटवण ॥ २ ॥
जीवा नाहीं कुडीचें लाहातें । ये[3] भिन्न[4] पंच भूतें ।
रचतें खचतें संचितें[5] । असार रितें फलकट ॥ ३ ॥
पुत्र पत्नी सहोदर । मायबाप गोताचा पसर ।
मिळतां काष्ठें लोटतां पूर । आदळीं दूर होती खळाळीं[6] ।
ह्मणोनि नासावें[7] अज्ञान । इतुलें करीं कृपादान ।
कृपाळु तूं जनार्दन । धरूनि चरण तुका विनवी ॥ ५ ॥

---

१ पं. भक्ताचिया.–२ पं. नाहीं ऐसें.–३ दे. क. यें.–४ पं भिन्नभिन्न.–५ पं.त. संचतें–६ दे. खलाळीं. त. पं. खळाळी.–७ क. नसावें * पं. हा शब्द नाहीं.

॥ ६३५ ॥

ऐसी हे गर्जवूं वैखरी । केशव मुकुंद मुरारी ।
राम कृष्ण नामें बरीं । हरी हरी दोष सकळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जनार्दना जगजीवना । विराटस्वरूपा वामना ।
महदादि मधुसूदना । भवबंधना तोडितिया ॥ ॥
चक्रपाणी गदाधरा । असुरमर्दना वीर्यवीरा ।
सकळमुगुटमणि शूरा । अहो दातारा जगदानिया ॥ २ ॥
मदनमूर्ती मनमोहना । गोपाळगोपिकारमणा ।
नटनाटयकौशल्य कान्हा । अहो संपन्ना सर्वगुणें ॥ ३ ॥
गुणवंता आणि निर्गुणा । सर्वसाक्षी आणि सर्वजाणा ।
करोनि अर्कता आपणा । नेदी अभिमाना आतळों ।
कासयानें घडे याची सेवा । काय एक समर्पावें या देवा ।
वश्य तो नव्हे वांचुनि भावा । पाय जीवावेगळे न करी तुका ॥ ५ ॥

॥ ६३६ ॥

होतों तें चिंतीत मानसीं । नवस फळले नवसीं ।
जोडिते नारायणा ऐसी । अविट ज्यासी नाश नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धरिले जीवीं न सोडीं पाय । आलें या जीवित्वाचें काय ।
कैं हे पाविजेती ठाय । लाविली सोय संचितानें ॥ ॥
मज तों पडियेली होती भुली । चित्ताची अपसव्य चाली ।
होतीं मृगजळें गोवी केली । दृष्टि उघडली बेरें जालें ॥ २ ॥

---

१ त पं. मुकुंदा.—२ पं. बरवे.

आतां हा सिद्धि पावो भाव । मध्यें चांचल्यें[1] न व्हावा जीव ।
ऐसी तुह्मां भाकीतसें कींव । कृपाळुवा जगदानिया ॥ ३ ॥
कळों येते[2] आपुले बुद्धी । ऐसें तों न घडतें कधीं ।
केवढे[3] आघात ते मधीं । लज्जा रिद्धी उभी आड ठाके ॥ ४ ॥
कृपा या केली संतजनीं । माझी अळंकारिली वाणी ।
प्रीति हे[4] लाविली कीर्तनीं । तुका चरणीं लोळतसे ॥ ५ ॥

॥ ६३७ ॥

तुझिया पार नाहीं गुणां । माझी अल्प मति नारायणा ।
भवतारका जी सुजाणा । एक विज्ञापना पायांपाशीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय जागावें म्यां दीनें । तुझिये भक्तींचीं लक्षणें ।
धड तें तोंड धोऊं[5] नेणें । परि चिंतनें काळ सारीं ॥ ध्रु ॥
न लवीं आणीक कांहीं पिसें । माझिया मना वांयां जाय ऐसें ।
चालवीं आपुल्या प्रकाशें । हातीं सरिसें धरोनियां ॥ २ ॥
तुज[6] समर्पिली काया । जीवें भावें पंढरिराया ।
सांभाळीं समविषम डाया । करीं छाया कृपेची ॥ ३ ॥
चतुर तरीं चतुरां रांव[7] । जाणता तरीं जीवांचा जीव ।
न्यून तो कोण एक ठाव । आरुष भाव परि माझा ॥ ४ ॥
होतें तें माझें भांडवल । पायांपें निवेदिले बोल ।
आदरा ऐसें पाविजे मोल । तुका ह्मणे साच फोल तूं जागसी ॥ ५ ।

---

१ पं. चांचल्य.–२ दे. त. क. येतें.–३ पं. येवढे –४ त हीं –५ पं. धुऊं.–६ पं तुज हे समर्पिली काया.–७ दे. क. पं. रावो.

॥ ६३८ ॥

कां हो माझा मानियेला भार । ऐसा दिसतसे[1] फार ।
अनंत पावविलीं उद्धार । नव्हे चि थार मज शेवटीं ॥ १ ॥
पाप बळिवंत गाढें । तुज ही राहों सकतें पुढें ।
मागिल कांहीं राहिलें ओढें । नवल कोडें[2] देखियेलें ॥ २ ॥
काय मानिती संतजन । तुमचें हीनत्ववचन ।
कीं वृद्ध जाला नारायण । न चले पण आधील तो ॥ ३ ॥
आतां न करावी चोरी । बहुत न धरावें दुरी ।
पडदा काय घरच्यावरीं । धरिलें दुरी तेव्हां धरिलें ॥ ४ ॥
नको चाळवूं अनंता । कासया होतोसि नेणता ।
काय तूं नाहीं धरीत सत्ता । तुका ह्मणे आतां होई प्रगट ॥ ५ ॥

॥ ६३९ ॥

मज ते हांसतील संत । जींहीं देखिलेती मूर्तिमंत ।
ह्मणोनि उद्वेगलें चित्त । आ[3]ह्मा च भक्त ऐसा दिसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ध्यानीं म्या वर्णिविति कैसे । पुढें एकीं स्तुति केली असे ।
तेथूनि जीव निघत नसे । ऐसिये आ[4]से लागलोंसें ॥ ध्रु. ॥
कासया पाडिला जी धडा । उगा चि वेडा आणि वांकडा ।
आह्मां लेंकरांसि पीडा । एक मार्गें जोडा दुसऱ्याचा ॥ २ ॥
सांगा कोणाचा अन्याय । ऐसें मी धरीतसें पाय ।
तूं तंव सम चि सकळां माय । काय अन्याय एक माझा ॥ ३ ॥

---

१ दे: त. दिसे.—२ त. पं. केवढें.— ३ त. आह्मां. क. अह्मा.—४ दे. क. आश.

नये हा जरी कारणा । तरी कां व्यालेति नारायणा ।
वचन यावें जी वचना । मज अज्ञाना समजावीं ॥ ४ ॥
बहुत दिवस केला बोभाट । पाहातां श्रमलों ते वाट ।
तुका ह्मणे विस्तारलें ताट । काय वीट आला नेणों स्वामी ॥ ५ ॥

॥ ६४० ॥

बरें जालें आजिवरी । नाहीं पडिलों मृत्याचे आहारीं ।
वांचोन आलों एथवरी । उरलें तें हरी तुह्मां समर्पण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दिला या काळें अवकाश । नाहीं पावलें आयुष्य नाश ।
कार्या कारण उरलें शेष । गेलें तें भूस जावो परतें ॥ ॥
बुडणें खोटें पावतां थडी । स्वप्नीं जाली ओढाओढी ।
नासली जागृतीची घडी । साच जोडी शेवटीं गोड घास ॥ २ ॥
तुह्मासि पावविली हाक । तेणें निरसला धाक ।
तुमचें भातें हें कवतुक । जे शरणागत लोक रक्षावे ॥ ३ ॥
रवीच्या नावें निशीचा नाश । उदय होतां चि प्रकाश ।
आह्मां[1] कचा आह्मां दोष । तूं जगदीश[2] कैवारी ॥ ४ ॥
आतां जळो देह सुख दंभ मान । न करीं याचें साधन ।
तूं जगेदादि नारायण । आलों शरण तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ६४१ ॥

आतां माझा नेणो[3] परतों भाव । विसावोनि पायीं ठेविला जीव ।
सकळां लाभांचा हा ठाव । ऐसा वाव जाला चित्ताठायीं ॥ १ ॥

---

१ त. आह्मां कैंचा.—२ क. पं. जगदीश—३ क. दे. नेणों.

॥ ध्रु. ॥ भांडवल गांठी तरि विश्वास । जालों तों जालों निश्चय दास ।
न पाहें मागिल ते वास । पुढती सोस सेवेचा ची ॥ १ ॥
आहे तें निवेदिलें सर्व । मी* हें माझें मोडियला गर्व ।
अकोळीं काळ अवघें पर्व । जाला भरवसा कृपेलाभाचा ॥ २ ॥
वेव्हारीं वेव्हारा अनंत । नाहीं यावांचुनी जाणत ।
तरी हें समाधान चित्त । लाभहानी नाहीं येत अंतरा ॥ ३ ॥
करूनि नातळों संसारा । अंग भिन्न राखिला पसारा ।
कळवळा तो जीवनीं खरा । बीजाचा थारा दुरी आघात ॥ ४ ॥
बहुं मतापासूनि निराळा । होऊनि राहिलों सोंवळा ।
बैसल्या रूपाचा कळवळा । तुका ह्मणे डोळां लेइलों तें ॥ ५ ॥

॥ ६४२ ॥

तुळसीमाळा घालुनी कंठीं । उभा विटेवरी जगजेठी ।
अवलोकोनि पुंडलीका दृष्टी । असे भीमातटीं पंढरीराय ॥ १ ॥
भुक्तिमुक्ति जयाच्या कामारी । रिद्धिसिद्धि वोळगती द्वारीं ।
सुदर्शन घरटी करी । काळ कांपे दुरी धाकें तया ॥ २ ॥
जगज्जननी असे वाम भागीं । भीमकी शोभली अर्धांगीं ।
जैसी विद्युल्लता झमके मेघीं । दरुषणें भंगी महा दोष ॥ ३ ॥
सुखसागर परमानंदु । गोपीगोपाळां गोधनां छंदु ।
पक्षिश्वापदां जयाचा वेधु । वाहे गोविंदु पांवा छंदें ॥ ४ ॥
मुखमंडित चतुर्भुजा । मनमोहन गरुडध्वजा ।
तुका ह्मणे स्वामी माझा । पावे भक्तिकाज़ा लवलाहीं ॥ ५ ॥

---

१ पं. क. माझा –२ पं. अकाळ.–३ त. बहुत.–४ पं. क. बैसला.–५ त. क. पं. गोपी गोपाळा गोधना छंदु.–६ दे. त. मनमोहना. * पं. " मी हें " हे दोन शब्द नाहींत.

॥ ६४३ ॥

ह्यातींचें न संडावें देवें । शरण आलों जीवें भावें ।
आपुलें ऐसें ह्मणावें । करितों जीवें निंबलोण ॥ १ ॥
॥ ध्रु. बैसतां संतांचे पंगेती । कळों आलें कमळापती ।
आपुलीं कोणी च नव्हतीं । निश्चय चित्तीं दृढ जाला ॥ ध्रु ॥
येती तुझिया भजना आड । दाविती प्रपंचाचें कोड ।
कनिष्ठीं रुचि ठेऊनि गोड । देखत नाड कळतसे ॥ २ ॥
मरती मेलीं नेणों किती । तो चि लाभ तयाचे संगती ।
ह्मणोनि येतों काकुलती । धीर तो चित्तीं दृढ द्यावा ॥ ३ ॥
सुखें निंदोत हे जन । न करीं तयांशीं वचन ।
आदिपिता तूं नारायण । जोडी चरण तुमचे तें[3] ॥ ४ ॥
आपलें आपण न करूं हित । करूं हें प्रमाण संचित ।
तरि मी नष्ट चि पतित । तुका ह्मणे मज संत हांसती ॥ ५ ॥

॥ ६४४ ॥

बरवें जालें लागलों कारणीं । तुमचे राहिलों चरणीं ।
फेडीन संतसंगती धणी । गर्जइल गुणीं वैखरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न वंचें[4] शरीर सेवेसी । काया वाचा आणि मनेसीं ।
जालों संताची अंदणी दासी । केला याविशीं निर्धार ॥ ध्रु ॥
जीवनीं राखिला जिव्हाळा । जालों मी मजसीं निराळा ।

१ पं. क संगती—२ पं. क. कनिष्ठ—३ पं. क. ते. 'जोडीं चरण तुमचे ते' असा पाठ असता तर हल्लींच्यापेक्षां चांगला अर्थ होता. पण 'जोडी' यावर अनुस्वार कोणत्याच प्रतींत नाहीं, व 'ते' असें दे त. व क. या पुस्तकांत आढळतें. क च्या प्रतींतील 'तें' वरचा अनुस्वार मागून खोडला आहे.—४ दे. वंचें.—५ पं राहिला.*दे. क. हा शब्द नाहीं.

पंचभूतांचा पुतळा । सहज लीळा वर्ततसे ॥ २ ॥
जयाचें जया होईल ठावें । लाहो या साधियेला भावें ।
ऐसें होतें राखियलें जीवें । येथूनि देवें मोवेहुनी ॥ ३ ॥
आस निरसली ये खेपे । अवघे पंथ जाले सोपे ।
तुमचे दीनबंधु कृपें । दुसरें कांपे सत्ताधाकें ॥ ४ ॥
अंकिले पणें आनंदरूप । आतळों नये पुण्यपाप ।
सारूनि ठेविले संकल्प । तुका ह्मणे आपें आप एकाएकीं ॥ ५ ॥

॥ ६४५ ॥

अवघ्या दशा येणें साधती । मुख्य उपासना सगुणभक्ती ।
प्रगटे ल्हदयींची मूर्ती । भावशुद्धि जाणोनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बीज आणि फळ हरीचें नाम । सकळ पुण्य सकळ धर्म ।
सकळां कळांचें हें वर्म । निवारी श्रम सकळ ही ॥ ध्रु ॥
जेथें कीर्तन हें नामघोष । करिती निर्लज्ज हरीचे दास ।
सकळ वोथंबले रस । तुटती पाश भवबंधाचे ॥ २ ॥
येती अंगा वसती लक्षणें । अंतरीं देवें धरिलें ठाणें ।
आपण चि येती तयांचे गुण । जाणें येणें खुंटे वस्तीचें ॥ ३ ॥
न लगे सांडावा आश्रम । उपजले कुळींचे धर्म ।
आणीक न करावे श्रम । एक पुरे नाम विठोबाचें ॥ ४ ॥
वेदपुरुष नारायण । योगियांचें ब्रह्म शून्य ।
मुक्त आत्मा परिपूर्ण । तुका ह्मणे सगुण भोळ्या आह्मां ॥ ५ ॥

---

१ त. राखियलें होतें.–२ क. मोंवहूनि.–३ दे. क. त. तयाचा.

॥ ६४६ ॥

श्रीअनंता मधुसूदना । पद्मनाभा नारायणा ।
जगव्यापका जनार्दना । आनंदघना अविनाशा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सकळ[1]देवा आदिदेवा । कृपाळुवा जी केशवा ।
म[2]हा महा[3]नुभवा । सदाशिवा सहजरूपा ॥ ध्रु ॥
चक्रधरा विश्वंभरा । गरुडध्वजा करुणाकरा ।
सहस्रपादा सहस्रकरा । क्षीरसागरा शेषशयना ॥ २ ॥
कमलनयना कमलापती । कामिनीमोहना मदनमूर्ती ।
भवतारका धरित्या क्षिती । वामनमूर्ती त्रिविक्रमा ॥ ३ ॥
अगा ये सगुणा निर्गुणा । जगज्जनित्या जगज्जीवना ।
वसुदेवदेवकीनंदना । बाळरांगणा बाळकृष्णा ॥ ४ ॥
तुका आला लोटांगणी । मज ठाव द्यावा जी चरणीं ।
हे चि करीतसें विनवणी । भवबंधनीं सोडवावें ॥ ५ ॥

॥ ६४७ ॥

आतां येणें बळें पंढरीनाथ । जवळी राहिला तिष्ठत ।
पाहातां न कळे जयाचा अंत । तो चि ह्रदयांत घालूं आतां ॥ १ ॥
विसरोनि आपुला देहपणभाव । नामें चि भुलविला पंढरीराव ।
न विचारी यां[4]ती कुळ नांव । लागावया पाव संतांचे ॥ २ ॥
बरें वर्म आलें आमुचिया हातां । हिंडावें धुंडावें न लगतां ।
होय अविनाश सहाकारी दाता । चतुर्भुज संता परि धाकें ॥ ३ ॥

---

१ क. सकळ देवाधिदेवा.–२ पं. महानंदा महानुभावा.–३ क. पं. महानुभावा.–४ क यातु कुळ ठाव.

होय आवडी सानें थोर । रूप सुंदर मनोहर ।
भक्तिप्रिय लोभापर । करी आदर याचकपणें ॥ ४ ॥
तें वर्म आलें आमुच्या हाता । ह्मणोनि शरण निघालों संतां ।
तुका ह्मणे पंढरीनाथा । न सोडीं आतां जीवें भावें ॥ ५ ॥

॥ ६४८ ॥

माझा तंव खुंटला उपाव । जेणें तुझे आतुडती पाव ।
करूं भक्ति तरि नाहीं भाव । नाहीं हातीं जीव कवणेविशीं ॥ १ ॥
धर्म करूं तरि नाहीं चित्त । दान देऊं तरि नाहीं वित्त ।
नेणें पुजों ब्राह्मण अतीत । नाहीं भूतदया पोटा हातीं ॥ २ ॥
नेणें गुरुदास्य संतसेवन । जप तप अनुष्ठान ।
नव्हे वैराग्य वनसेवन । नव्हे दमन इंद्रियांसी ॥ ३ ॥
तीर्थ करूं तरि मन नये सवें । व्रत करूं तरि विधि नेणें स्वभावें ।
देव जरि आहे ह्मणों मजसवें । तरि आपपरावें न वंचे ॥ ४ ॥
ह्मणोनि जालों शरणागत । तुझा दास मी अंकित ।
यास कांहीं न लगे संचित । जालों निंश्चित तुका ह्मगे ॥ ५ ॥

॥ ६४९ ॥

तरि म्यां आळवावें कोणा । कोण हे* पुरवील वासना ।
तुजवांचूनि नारायणा । लावीं स्तना कृपावंते ॥ १ ॥
॥ ध्रु: ॥ आपुला न विचारीं सिण । न धरीं अंगसंगें भिन्न ।
अंगीकारिलें राखें दीन । देई जीवदान आवडीचें ॥ २ ॥

---

१ दे. त. निश्चित. * पं. हा शब्द नाहीं.

माझिया मनासिंहे आस । नित्य सेवावा ब्रह्मरस ।
अखंड चरणींचा वास । पुरवीं आस याचकाची ॥ २ ॥
माझिया संचिताचा ठेवा । तेणें हे वाट दाविली देवा ॥
एवढ्या आदराचा हेवा । मागें सेवादान आर्वडीनें[1] ॥ ३ ॥
आळवीन करूणावचनीं । आणिक गोड न लगे मनीं ।
निद्रा जागृती आणि स्वप्नीं । धरिलें ध्यानीं मनीं रूप ॥ ४ ॥
आतां भेट न भेटतां आहे । किंवा नाहीं ऐसें विचारूनि पाहें ।
लागला झरा अखंड आहे । तुका ह्मणे सोहे केलें अंतरीं ॥ ५ ॥

॥ ६५० ॥

हें चि भवरोगाचें औषध । जन्म जरा तुटे व्याध ।
आणीक कांहीं नव्हे बाध । करील वध षड्वर्गा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सांवळें रूप ल्यावें डोळां । सा[2] चौ अठरांचा गोळा ।
पदर लागों नेदी खळा । नाममंत्रमाळा विष्णुसहस्र ॥ ध्रु ॥
भोजना न द्यावें अन्न । जेणें चुके अनुपान ।
तरीं च घेतल्याचा गुण । होईल जाण सत्य भाव ॥ २ ॥
नये निघों आपुलिया घरा । बाहेर लागों नये वारा ।
बहु बोलणें तें सारा । संग दुसरा वर्जावा ॥ ३
पास तें एक द्यावें वरी । नवनीताची होईल परी ।
होईल गुसळिलें तें निवारी । सार भीतरी नाहीं तया ॥ ४ ॥
न्हायें अनुतापीं पांघरें दिशा । स्वेद निघों दे अवघी आशा ।
होसिल[3] मागें होतासी तैसा । तुका ह्मणे दशा भोगीं वैराग्य ॥ ५ ॥

---

१ पं. आवडीचें.—२ पं. साद्य.—३ पं. होइल.

॥ ६५१ ॥

मागुता हा चि जन्म पावसी । भोगिलें सुखदुःख जाणसी ।
हें तों न घडे रे सायासीं । कां रे अंध होसी जाणोनियां ॥ १ ॥
लक्ष चौऱ्याशी न चुके फेरा । गर्भवासीं यातना थोरा ।
येउनि पडसी संदेहपुरा । वोळसा थोरा मायाजाळीं ॥ २ ॥
पशु काय पापपुण्य जाणती । उत्तम मध्यम भोग भोगिती ।
कांहीं एक उपजतां मरती । बहिरीं अंध होती पांगुळ मुकीं ॥ ३ ॥
नरदेह निधान लागलें हातीं । उत्तम सार उत्तम गती ।
होइन देव चि ह्मणती ते होती । तरि कां चित्तीं न धरावें ॥ ४ ॥
क्षण एक मन स्थिर करूनी । सा[2]वेध होईं डोळे उघडोनी ।
पाहें [3]वेद बोलिले पुराणीं । तुका विनवणी करीतसे ॥ ५ ॥

॥ ६५२ ॥

दास्य करी दासांचें । उणें न साहे तयांचें ।
वाढिलें ठायींचें । [4]भाणें टाकोनियां धांवे ॥ १ ॥
॥ धु. ॥ ऐसा कृपेचा सागर । विटे उभा कटीं कर ।
सर्वस्वें उदार । भक्तांलागीं प्रगटे ॥ ध्रु ॥
ह्रदयीं श्रीवत्सलांछन । मिरवी [5]भक्तांचें भूषण ।
नाहीं तयाचा सीण । सुख धरिलें लातेचें ॥ २ ॥
सत्यभामा दान करी । उजुर नाहीं अंगीकारी ।
सेवकाच्या शिरीं । धरूनि चाले पादुका ॥ ३ ॥

---

१ क. पं. बाहिर.— २ दे. साव.—३ त. पाहें वेद्री बोलिलें. क. पाहें वेद बालिलें.—४ दे. भानें पं. भाणे. क. भाने.—५ त. पं. भक्ताचें.

राखे दार[1]वंटा बळीचा । सारथी[2] जाला अर्जुनाचा ।
दास सेवकांचा । होय साचा अंकित ॥ ४ ॥
भिडा नो[3] बोलवे पुंडलिकाशीं । उभा मर्यादा पाठीशीं ।
तुका ह्मणे ऐसी । कां रे न भजा माउली ॥ ५ ॥

॥ ६५३ ॥

हरि तैसे हरीचे दास । नाहीं तयां भय मोह चिंता आस ।
होउनि राहाती उदास । बळकट कांस भक्तीची ॥ १ ॥
॥ ध्रु० ॥ धरूनि पाय त्यजि[4]लें जन । न लगे मान मृत्तिकाधन ।
कंठीं नाम अमृताचें पान । न लगे आन ऐसें जालें ॥ ध्रु ॥
वाव तरी उदंड च पोटीं । धीर सिंधु ऐसे जगजेठी ।
कामक्रोधा न सुटे मिठी । गि[5]ऱ्हे तरी वेठीं राबविती ॥ २ ॥
बळें तरि नाग[6]वती काळा । लीन तरि सकळांच्या तळा ।
उदार देहासी सकळा । जाणोनि कळा सर्व नेणते ॥ ३ ॥
संसार तो तयांचा दास । मोक्ष तें[7] पाहातसे वास ।
रिद्धिसिद्धि देश[8]वटा त्रास । न शिवति यास वैष्णवजन ॥ ४ ॥
जन्ममृत्युस्वप्नांसारिखें । आप त्यां न दिसे पारखें ।
तुका ह्मणे अखंडित सुखें । वाणी वदे मुखें प्रेमामृताची[9] ॥ ५ ॥

॥ ६५४ ॥

बहुत जाचलों संसारीं । वसें गर्भीं मातेच्या उदरीं ।
लक्ष चौऱ्याशी योनिद्वारीं । जालों भिकारी याचक ॥ १ ॥

---

१ पं. दारवंट.—२ दे. त. क. रथी.—३ पं. त. न.—४ दे. त. तजिलें.—५ दे. त. वेठी वरी गिऱ्हे राबवीती.—६ दे. क. नांगवती.—७ पं तो.—८ दे. क. देशटा.—९ दे. प्रेमा अमृताची.

॥ ध्रु. ॥ जिणें पराधीन आणिकां हातीं । दृढ पाशीं बांधलों संचितीं ।
प्रारब्ध क्रियमाण सांगातीं । भोवंडिती सत्ता आपुलिया ॥ १ ॥
न भरे पोट नाहीं विसांवा । नाहीं नेम एक ठाव गांवा ।
नाहीं सत्ता न फिरे ऐसी देवा । लोहीं जीवा खापरीं तडफडी ॥ २ ॥
काळ बहुत गेले ऐसिया रीती । आणीक पुढें नेणों किती ।
खंडणा नाहीं पुनरावृत्ती । मज कल्पांतीं तरी वेगळें ॥ ३ ॥
ऐसें दुःख कोण हरील माझें । कोणा भार घालूं आपुलें ओझें ।
भवसिंधुतारक नाम तुझें । धांवसि काजें आडलिया ॥ ४ ॥
आतां धांव घालीं नारायणा । मजकारणें रंका दीना ।
गुण न विचारीं अवगुणा । तुका करुणा भाकीतसे ॥ ५ ॥

॥ ६५५ ॥

जंव हें सकळ सिद्ध आहे । हात चालावया पाये ।
तंव तूं आपुलें स्वहित पाहें । तीर्थयात्रे जायें चुकों नको ॥ १ ॥
जंव काळ असे दुरी ठेला । तंव तूं हरिगुण गायें आइक वहिला ।
मनीं भाव धरूनि भला । न वंचें त्याला चुकों नको ॥ २ ॥
जोडोनि धन न घेलीं माती । ब्रह्मवृंदें पूजन यतीं ।
सत्य आचरण दया भूतीं । करीं सांगातीं चुकों नको ॥ ३ ॥
दशा यौवनें बागली अंगीं । पांगिला नव्हें विषयसंगीं ।
काम क्रोध लोभ मोह त्यागीं । राहें संतसंगीं चुकों नको ॥ ४ ॥
मग तेथें न चले कांहीं । सत्ता संपदा राहेल ठायींच्या ठायीं ।

१ दे. क. लाहे.—२ पं. पुढें ही.—३ पं. घालीं.—४ दे न. इति. क. पिति.—५ त.पवोन.

पुढें संचित जाईल ग्वाही । तुका ह्मणे ते ही यमआज्ञा ॥ ५ ॥

॥ ६५६ ॥

ऐक पांडुरंगा एक मात । कांहीं बोलणें आहे एकांत ।
आह्मां जरी तारील संचित । तरी उचित काय तुझें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उसनें फेडितां धर्म तो कोण । काय तया मानवेल जन ।
काय गा मिरवूनि भूषण । वांयां थोरपण जनांमध्यें ॥ ध्रु ॥
अन्न जरी न मिळे तयासी देणें । आगांतुक पात्र उचित दान ।
उपकार तरी धनमंत्रीपणें । जरी देणेंघेणें नाहीं आशा ॥ २ ॥
शूर तों तयासी बोलिजे जागा । पाठीशीं घालूनि राखे दीना ।
पार पुण्य नाहीं त्या भूषगा । ऐक नारायणा वचन हें ॥ ३ ॥
आतां पुढें बोलणें तें काई । मज तारिसी तरी च सही ।
वचन आपुलें सिद्धी नेई । तुका ह्मणे तई मज कळसी ॥ ४ ॥

॥ ६५७ ॥

चांगलें नाम गोमटें रूप । निवती डोळे हरती ताप ।
विठ्ठल विठ्ठल हा जप । प्रगट स्वल्प अति सार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शस्त्र हें[1] निर्वाणींचा बाण । निकट समय अवसान ।
कोठें योजेल दश दान । खंडी नारायण दुःख चिंतनें ॥ ध्रु ॥
सकळ श्रेष्ठांचें मत । पावे सिद्धी पायवी अनंत ।
ह्मणोनि व्हावें शरणागत । आहे उचित एवढें चि ॥ २ ॥
ह्मणोनि हसलों संसारा । सर्प विखोर हा पांढरा ।

---

१ त. हा.—२ पै. हा विचार.

तुजशीं अंतर रे दातारा । या चि दावेदारानिमित्त[1] ॥ ३ ॥
येणें मज भोगविल्या खाणी । नसतां छंद लाविला मनीं ।
माजलों मी माझे भ्रमणीं । जाली बोडणी विटंबना ॥ ४ ॥
पावलों केलियाचा दंड । खाणी भोगोंविल्या[2] उदंड ।
आतां केला पाहिजे खंड । तुका दंडवत घाली देवा ॥ ५ ॥

॥ ६५८ ॥

चांगला तरी पूर्णकाम । गोड तरी याचें चि नाम ।
दयाळु[3] तरी अवघा धर्म । भला तरी दासा श्रम होऊं नेदी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उदार तरी लक्ष्मीयेसी[4] । जुंझार तरी कळिकाळासी ।
चतुर तरी गुणांची च रासी । जाणता तयासी तो एक ॥ ध्रु ॥
जुनाट तरी बहु काळा । न कळे जयाची लीळा ।
नेणता गोवळीं गोवळा । लाघवी अबळाभुलवणा ॥ २ ॥
गांढ्या तरी भावाचा अंकित । बराडी तरी उच्छिष्टाची प्रीत ।
ओंगळ तरीं कुब्जेशीं रत । भ्याड अनंत बहु पापा ॥ ३ ॥
खेळतो येणें चि खेळावा । नट तो येणें चि अवगावा[5] ।
लपोनि जीवीं न कळे जीवा । धरितां देवा नातुडेसी[6] ॥ ४ ॥
उंच तरी बहुत चि उंच । नीच तरी बहुत चि नीच ।
तुका ह्मणे बोलिलों साच । नाहीं अहाच[7] पूजा केली ॥ ५ ॥

॥ ६५९ ॥

कायं आह्मी भक्ति करणें कैसी । काय एक वाहावें तुह्मांसी ।

---

१ पं. निमित्य.—२ त. पं. भोगिल्या.—३ दे. त. दयाळ.—४ त. लक्षुमीयेसी.—५ दे. त. पं. आवगावा.—६ पं. त. नातुडसी.—७ त. पं. आहाच.

अवघा भरोनि उरलासीं । वाणीं स्वाणीं रसीं रूपीं गंधीं ॥ १ ॥
कसें करूं इंद्रियां बंधन । पुण्यपापाचें खंडण ।
काय व्रत करूं आचरण । काय तुजविण उरलें तें ॥ २ ॥
काय डोळे झांकुनियां पाहूं । मंत्रजप काय ध्याऊं ।
कवणे ठायीं धरूनि भाव । काय तें वाव तुजविण ॥ ३ ॥
काय हिंडों कवण दिशा । कवणे ठायीं पाय ठेवूं कैसा ।
काय तूं नव्हेसि न कळे तैसो । काय मी कैसा पाहों आतां ॥ ४ ॥
तुझिया नामाची सकळ । पूजा अर्चन मंत्र माळ ।
धूप दीप नैवेद्य फळ तांबूल । घेऊं पुष्पांजुळ तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ६६० ॥

शरीर दुःखाचें कोठार । शरीर रोगाचें भांडार ।
शरीर दुर्गंधीची थार । नाहीं अपवित्र शरीरा ऐसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शरीर उत्तम चांगलें । शरीर सुखाचें घोंसुलें ।
शरीरें साध्य होय केलें । शरीरें साधलें परब्रह्म ॥ ध्रु ॥
शरीर विटाळाचें आंळें[3] । मायामोहपाशजाळें ।
पतन शरीराच्या मुळें । शरीर काळें व्यापिलें ॥ २ ॥
शरीर सकळ हें[4] शुद्ध । शरीर निर्धीचा ही निध ।
शरीरें तुटे भवबंध । वसे मध्यें भोगी देव शरीरा ॥ ३ ॥
शरीर अविद्येचा बांधा । शरीर अवगुणाचा रांधा ।
शरीरीं वसे बहुत बाधा । नाहीं गुण सुंदा एक शरीरीं ॥ ४ ॥

---

१ दे. क. रूपगंधीं.—२ पं. ऐसा — ३ दे. क. अळें.—४ त. पं. ही.—५ पं. सुधा.

शरीरा सुख नेदावा भोग । न धावें दुःखें न करीं त्याग ।
नव्हे वोखटें ना चांग । तुका ह्मणे वेगें करीं हरिभजनी ॥ ५ ॥

॥ ६६१ ॥

इतुलें करीं भलत्या परी । परद्रव्य परनारी ।
सांडुनि अभिलाष अंतरीं । वर्त्तें वेव्हारीं सुखरूप ॥ १ ॥
न करीं दंभाचा सायास । शांती राहे बहुवस ।
जिव्हे सेवीं सुगंधरस । न करीं आळस रामनामीं ॥ २ ॥
जनमित्र होई सकळांचा । अशुभ न बोलावी वाचा ।
संग न धरावा दुर्जनाचा । करीं संतांचा सायास ॥ ३ ॥
करिसी देवाविण आस । अवघी होईल निरास ।
तृष्णा वाढविसी बहुवस । कधीं सुखास न पवसी ॥ ४ ॥
धरूनि विश्वास करीं धीर । करितां देव हा चि निर्धार ।
तयाचा वाहे योगक्षेमभार । नाहीं अंतर तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ६६२ ॥

संसारसिंधु हा दुस्तर । नुलंघवे उलंघितां पार ।
बहुत वाहाविलें दूर । न लगे चि तीर पैल थडी ॥ १ ॥
॥ धृ. ॥ किती जन्म जाला फेरा । गणित नाहीं जी दातारा ।
पडिलों आवर्तीं भोंवरा । बहुता थोरा वोळँसिया ॥ ध्रु ॥
वाढलों परी नेणती बुद्धी । नाहीं परतली धरिली शुद्धि ।
मग म्यां विचारावें कधीं । ऐसी संधी सांडुनियां ॥ २ ॥

---

१ त. न द्यावा.—२ दे क. पं. सुख.—३ त. वेग हरी भजनी.—४ त. धरीं.—५ पं पाबसी.—६ पं अंतपार.—७ क. बोळखिया.

अनेक स्थानीं आहार निद्रा । भयमैथुनाचा चि थारा ।
बाळत्व तारुण्य जरा । प्रधान पुरा भोग तेथें ॥ ३ ॥
ऐसीं उलंघूनि आलों स्थळें । बहु भोवंडिलों काळें ।
आतां हें उगवावें जाळें । [1]उजेडा बळें दिवसाच्या ॥ ४ ॥
[2]सांडीन या संसाराची वाट । बहु येणें भोगविले कष्ट ।
दावी सत्या ऐसें नष्ट । तुका ह्मणे भ्रष्ट जालों देवद्रोही ॥ ५ ॥

॥ ६६३ ॥

विठ्ठल भीमातीरवासी । विठ्ठल पंढरीनिवासी ।
विठ्ठल पुंडलिकापासीं । कृपादानाविसीं उदार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विठ्ठल स्मरणा कोंवळा । विठ्ठल गौरवीं आगळा ।
आधार ब्रह्मांडा सकळा । विठ्ठल लीळाविग्रही ॥ ध्रु. ॥
उभा चि परी न मनी सीण । नाहीं [3]उद्धरितां भिन्न ।
समर्थाचे घरीं एकें[4] अन्न । आर्तभूता क्षणोक्षणा सांभाळी ॥ २ ॥
रुचीचे प्रकार । आणिताती आदरें ।
कोठें ही न पडे अंतर । [5]थोरां थोर धाकुट्यां धाकुटा ॥ ३ ॥
करितां बळ धरितां नये । झोंबतां डोळे मनें च होय ।
आपुल्या उद्देशाची सोय । जाणे ह्रदयनिवासी ॥ ४ ॥
यान्हा तरी आल्या अंतर तेथें । तों नाहीं भरिलें रितें ।
करितों सेवन [6]आइतें । तुका ह्मणे चित्तें चित्त मेळवूनी ॥ ५ ॥

---

१ पं. उजेडाचे बळें. क. उजेडावें बळें.—२ पं सांडुनियां.—३ पं. त. उद्धरिता.—४ पं. एक चि.—५ पं. थोरास ही थोर.—६ पं. आतें.

॥ ६६४ ॥

ताप हें हरण श्रीमुख । हरी भवरोगा ऐसें दुःख ।
अवलोकितां उपजे सुख । उभें सन्मुख दृष्टीपुढें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न पुरे डोळियांची धणी । सखोल कृपेंची च खाणी ।
स्तवितां न पुरे वेदवाणी । तो हा समचरणी कृपानिधी ॥ ध्रु. ॥
रामकृष्णध्यान वामननारसिंहीं । उग्र आणि सौम्य कांहीं च नाहीं ।
सांपडे भरलीये वाही । भाव शुद्ध पाहीं याचें भातुकें ॥ २ ॥
गुणगंभीर चतुर सुजाण । शूर धीर उदार नारायण ।
व्यापक तरी त्रिभुवन । मनमोहन लावण्य हें ॥ ३ ॥
ठाण हें साजिरें सुंदर । अविनाश अविकार ।
अनंत आणि [1]अपार । तो हा कटीं कर [2]धरिताहे ॥ ४ ॥
जयाची वाणी सुमनमाळा । परमामृतजिव्हाळा ।
अनंता अंगीं अनंत कळा । तुका जवळा चरण[3]सेवेंक ॥ ५ ॥

॥ ६६५ ॥

कान्हो[*]बा ०नाट अभंग ७.

अगा ये वैकुंठनायका । अगा ये त्रैलोक्यतारका ।
अगा जनार्दना जगव्यापका । अगा पाळका भक्तांचिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अगा ये वसुदेवदेवकीनंदना । अगा ये गोपिकारमणा ।
अगा बळिबंध वामना । अगा निधाना गुणनिधी ॥ ध्रु. ॥
अगा ये द्रौपदीबांधवा । अगा ये सखया पांडवा ।

---

१ त. पं. अपरांपर.—२ त. धरिताहे.—३ दे. चरण सेवे. * पं. हा शब्द नाहीं.

अगा जीवाचिये जीवा । अगा माधवा मधुसूदना ॥ २ ॥
अगा महेश्वरा महाराजा । अगा श्रीहरी गरुडध्वजा ।
अगा सुंदरा सहस्रभुजा । पार मी तुझा काय वर्णूं ॥ ३ ॥
अगा अंबऋषिपरंपरा । निरालंबा निर्विकारा ।
अगा गोवर्धन धरणीधरा । अगा माहेरा दीनाचिया ॥ ४ ॥
अगा धर्मराया धर्मशीळा । कृपासिंधु कृपाळा ।
अगा प्रेमाचिया कल्लोळा । सकळकळाप्रवीणा ॥ ५ ॥
अगा चतुरा सुजाणा । मधुरागिरा सुलक्षणा ।
अगा उदारा असुरमर्दना । राखें शरणा तुकयाबंधु ॥ ६ ॥

॥ ६६६ ॥

उभा देखिला भीमातीरीं । कर मिरवले कटावरी ।
पाउलें तरी सम चि साजिरीं । नाम तरी अनंत अतिगोड ॥ १ ॥
शंखचक्रांकित भूषणें । जडितमेखळा त्रिद्रत्नें ।
पीतांबर उटी शोभे गोरेपणें । लोपलीं तेणें रवितेजें ॥ २ ॥
श्रवणीं कुंडलें देती ढाळ । दशांगुळीं मुद्रिका माळ ।
दंतओळी हिरे झळाळ । मुख निर्मळ सुखरासी ॥ ३ ॥
कडीं कडदोरा वांकी वेळा । बाहीं बाहुवटे पदक गळां ।
मृगनाभी रेखिला टिळा । लवती डोळां विद्युल्लता ॥ ४ ॥
सुंदरपणाची साम्यता । काय वर्णूं ते पावे आतां ।
तुकयाबंधु ह्मणे रे अच्युता । धन्य ते मातापिता प्रसवली ॥ ५ ॥

१ दे. निळारंभ. त. निळारंभ.—२ त. बाहीवटे.—३ वं. माळा.

॥ ६६७ ॥

एक मागणें त्दृषीकेशी । चित्त द्यावें सांगतों वचनासी ।
मज अंतर तुझ्या चरणासी । न पडे ऐसी कृपा करीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नको दुजी बुद्धि आणीक । रिद्धिसिद्धी परलोक ।
तूं स्वामी मी सेवक । खंडणा नको करूं ऐसी ॥ ध्रु ॥
मना येईल तो जन्म देईं । भलते कुळीं भलते ठायीं ।
तें मी सांकडें घालीत नाहीं । त्दृदयींहुनी तूं[1] न वजें ॥ २ ॥
इतुलें करीं भलत्या परी । भलत्या भावें तुझे द्वारीं ।
राहेन दास होऊनि कामारी । वदो वैखरी नित्य नाम ॥ ३ ॥
नको विचारूं दुसरें आतां । शरण आलों जी पंढरीनाथा ।
तुकयाबंधु ह्मणे रे अच्युता । आहेसि तूं दाता दानशूर ॥ ४ ॥

॥ ६६८ ॥

कई देखतां होईन डोळीं । सकळां भूतीं मूर्ति सांवळी ।
जीवा नांव भूमंडळीं । जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा कृपा करील नारायण । जीव जगाचा होईन ।
प्रेमसागरीं बुडईन । होईल स्नान अनुतापीं ॥ ध्रु ॥
ऐसा कई येईन दैवास । दृश्य नासोनि जाईल आस ।
सदा संतचरणीं देहाचा वास । सेवीन शेष धणीवरी ॥ २ ॥
कई नवसा येतील अंकुर । सुखा नाहींसा होईल पार ।
अमृत तें पृथ्वीजळ सागर । वाहातीं पूर आनंदाचे ॥ ३ ॥

---

१ पं. तुवां न वजावें.

प्रसन्न दया क्षमा शांति । कई नवविधा होईल भक्ति ।
भोगिनि वैराग्यसंपत्ति । मनोरथ कळती तई पुरले ॥ ४ ॥
तुकयाबंधु ह्मणे सांग । नव्हे तुजविण निरसेना पांग ।
ह्मणोनि घातलें साष्टांग । पांडुरंगा वरी[1] चरणा ॥ ५ ॥

॥ ६६९ ॥

तूं बळिया शिरोमणी । आहेसि माजी ये त्रिभुवनीं ।
रिघालों पाठीं तुझी ह्मणउनी । आतां करीन मी असेल तें ॥ १ ॥
॥ धु. ॥ तूं देवा प्रतापदिनकर । सुरा असुरांचा सुर ।
महावीरां वीर धनुर्धर । मी तों पामर काय तेथें ॥ ध्रु ॥
कृपासिंधु दीनवत्सल । फोडिली देवाची बंदशाळ ।
संहारूनि राक्षसदळ । शरणागत राजीं स्थापिला ॥ २ ॥
उपक्रम[2] करावा बहुत । तरी तूं जाणसी धर्मनीत ।
उचित काय तें अनुचित । राखें शरणागत आलों आतां ॥ ३ ॥
किती म्यां काय विनवावें । शरण आलों जीवें भावें ।
तुकयाबंधु ह्मगे करावें । क्षेम अवघें येणें काळें ॥ ४ ॥

॥ ६७० ॥

देवा मी चांडाळ चांडाळ । ह्मणतां लागताहे वेळ ।
नसे पाहातां भूमंडळ । ऐसा अमंगळ खळ दुसरा ॥ १ ॥
जन्मा उपजलियापासुनी । असत्य कर्म तें अज्ञुनी ।
सत्य आचरण नेणें स्वप्नीं । निखळ खाणी अवगुणांची ॥ २ ॥

---

१ प चरणावरी –२ दे. त. क. उपकर्म.

भक्ति दया अथवा कथा । कार्नी न साहवे वार्ता ।
अखंड विषयांची वेथा । अधम पुरता अधमाहुनी ॥ ३ ॥
काम क्रोध दंभ अहंकार । गर्व ताठा मद मत्सर ।
यांचें तरी माहेरघर । परउपकार वैरी तैसा ॥ ४ ॥
निंदा द्वेष घात विश्वास । करितां नाहीं केला आळस ।
करूं नये [1]ते केले संतउपहास । अ[2]भक्ष तें ही भक्षिलें ॥ ५ ॥
पाळिलें नाहीं पितृवचन । सदा परद्वारीं परधनीं ध्यान ।
बोलों नये घडलें ऐसें [3]अन्योन्यविण । दासीगमन आदिकरूनी ॥ ६ ॥
कायामनें वाचाइंद्रियांशीं । सकळ पापांची च राशी ।
तुकयाबंधु ह्मणे ऐसियासी । आलों त्दृषीकेशी तुज शरण ॥ ७ ॥

॥ ६७१ ॥

काय काय करितों या मना । परी नाइके नारायणा ।
करूं नये त्याची करी विवंचना । पतं[4]ना नेऊं आदरिलें ॥ १ ॥
भ[5]लतिया सर्वे धांवे सैराट । वाट आडवाट दरे दरकुट ।
न विचारी कुडें कांहीं कपट । घात बळकट मांडियेला ॥ २ ॥
न पुरती भ्रमणा दाही दिशा । सप्त ही पाताळ आकाशा ।
घाली उडी बळें चि देखोनि फांसा । केलों या देशा पाहुणा ॥ ३ ॥
चेतवूनि इंद्रियें सकळ । आशा तृष्णा कल्पना काम क्रोध काळ ।
दुराविली शुद्ध बुद्धि केली राळ । ऐसें चांडाळ अनिवार हें ॥ ४ ॥
आतां काय ऐसें करावें यासी । बहु जाचिलों केलों कासाविसी ।

---

१ क. ते केले.—२ दे. त. क. अभक्ष भक्ष तें ही भक्षिलें.—३ दे. अनोविन. त. भणोवि-न.—४ क. पं. नेऊं पतना.—५ दे. त. भलतिये सर्वा. क भक्तियेसवा.

तुकयाबंधु ह्मणे त्दृषीकेशी । धांव मज ऐसी परी जाली ॥ ५ ॥

नाटाचे अभंग समाप्त ६३.

॥ ६७२ ॥

*अखंडक्षीराब्धी भरितें आलें । अध्यात्मविद्येचें भांडार उघडिलें ।
सूर्यकोटीस तेज फांकलें । ध्यानीं प्रगटलें भक्तांचिया ॥ १ ॥
अनादि ब्रह्मज्ञानाचें गुज । श्रवणीं अवचित पडिलें सहज ।
परमनिर्वाणाचें बीज । गुंडाळिलें निजसर्वभाग्यें ॥ २ ॥
मंत्र महामंत्र मंगळनिधी । सत्संगदर्शन प्रगटलें आधीं ।
वैराग्यविवेकाची बुद्धी । नामामृतसिद्धी साधिलें तें ॥ ३ ॥
क्षमादयाशांतिचें निजसुख । सच्चित्सुखें बोलला पुंडलीक ।
अनंतसुखाचा हारिख । उगवला देख पंढरीये ॥ ४ ॥
नेणें भवभक्तीची निरपेक्षता । नेणें भूतदयेची ममता ।
तुका ह्मणे पंढरीनाथा । संग साधुसंतां देईं आतां ॥ ५ ॥

॥ ६७३ ॥

क्षीराब्धिवासा शेषशयना । लीळाविग्रहा गोपिकारमणा ।
सगुणस्वरूप भक्तभूषणा । गुणनिधाना गुप्तरूपा ॥ १ ॥
अनंत अवतार धरितिया ॥ अखंडस्वरूपा करुणालया ।
अमरपाळका देवराया । हरीं भवभया भक्तांचिया ॥ २ ॥
सर्वव्यापका सर्वातीता । गजेंद्ररक्षका वैकुंठनाथा ।
भोळ्या भक्तांसि सौख्यदाता । तुजविण सर्वथा असे चि ना ॥ ३ ॥
चित्तचाळका चैतन्यघना । भक्तकैवारी असुरमर्दना ॥

* त. ६७२,६७३,६७४,६७५, हे चार अभंग जास्ती आहेत.

भक्तअभिमानी नारायणा । जगज्जीविना पांडुरंगा ॥ ४ ॥
ब्रह्मादिकांचा निजजनिता । सकळकारण अकर्ता ।
अणुरेणुव्याप्यभरिता । पावन पतिता तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ६७४ ॥

अखंडकर्मा कर्मप्रकाशका । मजसाटीं कां रे जालासि मुका ।
धर्मा धर्मप्रतिपाळका । सर्वचाळका सर्वातीता ॥ १ ॥
न देखसी वर्णाश्रममर्यादा । त्याचा सर्वस्वें करिसी कामधंदा ।
कधीं न लाजसी तूं गोविंदा । कां रे मुकुंदा बोल आतां ॥ २ ॥
मत्स्यकूर्मादिअवतारांसाठीं । श्रमले असतील जगजेठी ।
करितां घडमोड सृष्टी । जालासि कष्टी काय जागें ॥ ३ ॥
किती म्यां विनवावें श्रीपती । पुन्हा पुन्हा यावें काकुलती ।
पुरे आतां तुझी संगती । करुणामूर्ती काय जालें ॥ ४ ॥
काय म्यां तुजसी करावें आतां । कां रे कोपलासी पंढरीनाथा ।
सकळ दुःख निवारिता । पावन पतिता तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ६७५ ॥

वासुदेवा दिनानाथा । कमललोचना श्रीअच्युता ।
निजभक्तांसि सौख्यदाता । तुजविण सर्वथा असे चि ना ॥ १ ॥
विठला अनंता विश्वपती । विराट्स्वरूपा वामनमूर्ती ।
ब्रह्मादिकर्ता वैकुंठपती । अगम्यस्थिती वेदशास्त्रा ॥ २ ॥
अद्वैतअखंडभरिता । विश्वबाहु अपरिमिता ।

विश्वचक्षु विश्वदेवता । आदिपिता ब्रह्मयाचा ॥ ३ ॥
भक्ताधीना भवभयभंगा । परमपुरुषा पांडुरंगा ।
अनादि अखिलअंतरंगा । संगा असंगा वेगळा चि ॥ ४ ॥
हें विराट्स्वरूप भोळिया भक्तांसी । सर्वथा न कळे हृषीकेशी ।
सगुण रूप धरूनि त्यांसी । लावीं भजनासी तुका ह्मणे* ॥ ५ ॥

॥ ६७६ ॥

काय खावें आतां कोणीकडे जावें ।
गांवांत राहावें कोण्या बळें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोपला पाटील गांवचे हे लोक ।
आतां घाली भीक कोण मज ॥ ध्रु ॥
आतां येणें चवी सांडिली ह्मणती ।
निवाडा करिती दिवाणांत ॥ २ ॥
भल्या लोकीं यास सांगितली मात ।
केला माझा घात दुर्बळाचा ॥ ३ ॥
तुका ह्मणे याचा संग नव्हे भला ।
शोधीत विठ्ठला जाऊं आतां ॥ ४ ॥

॥ ६७७ ॥

संत मागे पाणी नेदी एक चूळ ।
दासीस आंघोळ ठेवी पाणी ॥ १ ॥

---

* तें येथे "नाट अभंग समाप्त" असें आहे

॥ ध्रु. ॥ संतासी देखोनी होय पाठमोरा ।
दासीचिया पोरा चुंबन देतो ॥ १ ॥
संतासी देखोनि करितो ढवाळ्या ।
भावें धुतो चोळ्या दासीचिया ॥ २ ॥
तुका ह्मणे त्याच्या तोंडावरी थुंका ।
जातो यमलोका भोगावया ॥ ३ ॥

॥ ६७८ ॥

एक प्रेमगुज ऐकें जगजेठी । आठवली गोष्टी सांगतसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एक मृग दोन्ही पाडसांसहित । आनंदें चरत होती वनी ॥ ध्रु. ॥
अवचिता तेथें पारधी पावला । घेऊनियां आला श्वानें दोन्ही ॥ २ ॥
एकीकडे त्याणें चिरिल्या वाघुरा । ठेविलें श्वानपुत्रा एकीकडे ॥ ३ ॥
एकीकडे तेणें वोणवा लाविला । आपण राहिला एकीकडे ॥ ४ ॥
चहूंकडोनियां मृगें वेढियेलीं । स्मरों ते लागलीं नाम तुझें ॥ ५ ॥
रामा कृष्णा हरी गोविंदा केशवा । देवाचिया देवा पावें आतां[1] ॥ ६ ॥
कोण रक्षी आतां ऐसिये संकटीं । बापा जगजेठी तुजविण ॥ ७ ॥
आइकोनि[2] तुह्मी तयांचीं वचनें । कृपाअंतःकरणें कळवळिलां ॥ ८ ॥
आज्ञा तये काळीं केली पर्जन्यासी । वेगीं पावकासी विझवावें ॥ ९ ॥
ससें एक तेथें उठवुनी[3] पळविलें । तया पाठीं गेलीं[4] श्वानें दोन्ही ॥ १० ॥
मृगें चमकोनी[5] सत्वर चाललीं । गोविंदें रक्षिलीं ह्मणोनियां ॥ ११ ॥
ऐसा तूं कृपाळु दयाळु आहेसी । आपुल्या भक्तांसी[6] जीवलग ॥ १२ ॥

१ पं. आह्मां.—२ पं. ऐकोनिया.—३ पं. उठोनि चालिलें.—४ पं. गेले श्वान दोन्ही.—५ पं. चवकोनी.—६ पं. दासांसी.

ऐसी तुझी कीर्ति जीवीं आवडती । रखुमाईच्या पती तुका ह्मणे ॥ १३ ॥

॥ ६७९ ॥

आशाबद्ध वक्ता । धाक[1] श्रोतयाच्या चित्ता ॥ १ ॥
॥ धु. ॥ वांयां गेलें तें भजन । उभयतां लोभी मन ॥ धृ ॥
बहिर्मुख एके ठायीं । तैसें जालें तया दोहीं ॥ २ ॥
माप तैसी गोणी । तुका ह्मणे रितीं दोन्ही ॥ ३ ॥

॥ ६८० ॥

विठ्ठला रे तूं उदाराचा राव । विठ्ठला तूं जीव या जगाचा ॥ १ ॥
॥धु.॥विठ्ठला रे* तूं उदाराची रासी । विठ्ठला तुजपाशीं सकळसिद्धी ॥धृ॥
विठ्ठला रे तुझें नाम बहु गोड । विठ्ठला[2] रे कोड पुरविसी ॥ २ ॥
विठ्ठला रे तुझें श्रीमुख चांगलें । विठ्ठला लागलें ध्यान मनीं ॥ ३ ॥
विठ्ठला रे वाचे बोला वहुरस । विठ्ठला रे सोस घेतला जीवें ॥ ४ ॥
विठ्ठला रे शोक करीतसे तुका । विठ्ठला तूं ये[3] कां झडकरी ॥ ५ ॥

॥ ६८१ ॥

बाहिर[4] पडिलों आपुल्या कर्तव्यें । संसारासि जीवें वेटाळिलों ॥ १ ॥
॥ धु. ॥ एकामध्यें[5] एक नाहीं मिळों येत । ताक नवनीत निवडीलें ॥धृ॥
जालीं दोन्ही नामें एका चि मथनीं । दुसरिया गुणीं वेगळालीं ॥ २ ॥
तुका ह्मणे दाखविल्या मुक्ताफळीं । शिंपले[6] चि स्वस्थळीं खुंटलिया ॥ ३ ॥

॥ ६८२ ॥

बरवा[7] बरवा बरवा रे देवा तूं । जीवाहूनि आवडसी जीवा रे देवा तूं ॥ १ ॥

---

१ पं. भय.—२ पं. विठ्ठला रे तूं कोड पुरविसी.—३ पं. येगा—४ त बाहेरी.—५ पं. एकामधीं.—६ त. शिंपल्या.—७ पं बरवा बरवा देवा तूं । जीवाहूनि आवडासि देवा तूं.—* पं. हा शब्द नाहीं.

॥ ध्रु. ॥ पाहातां वदन संतुष्ट लोचनें।
जाले आइकतां गुण श्रवण[*] रे देवा ॥ ध्रु ॥
अष्ट[२] अंगें तनु त्रिविध ताप गेला सीग ।
वर्णितां लक्षण रे देवा ॥ २ ॥
मन जालें उन्मन अनुपम[३] ग्रहण ।
तुकयाबंधु ह्मणे महिमा नेणें रे ॥ ३ ॥

॥ ६८३ ॥

सोइरियासि करी पाहुणेरु[४] बरा ।
काढितो ठोंबरा संतांलागीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गाईसि देखोनि बदबदा मारी ।
घोडयाची चाकरी गोड लागे ॥ ध्रु ॥
पानफुल[५] वेश्येसी नेतसे उदंड । देखों[६] नेदी खांड ब्राह्मणासी ॥ २ ॥
बाइलेच्या गोता आवडिनें पोसी । माता पितियासी दवडितो ॥ ३ ॥
तुका ह्मणे थुंका त्याच्या तोंडावरी । जातो यमपुरी भोगावया ॥ ४ ॥

॥ ६८४ ॥

सोलीव जें सुख अतिसुखाहुनी । उभे[७] हें अंगणीं वैष्णवांच्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥वृंदावन सडे चौक रंग माळा । नाचे तो सोहोळा देखोनियां ॥ ध्रु ॥
भूषणमंडित सदा सर्वकाळ । मुद्रा आणि माळ तुळसी कंठीं ॥ २ ॥
नामओघ मुखीं अमृताचें सार । मस्तक पवित्र सहित रजें ॥ ३ ॥
तुका ह्मणे मोक्ष भक्तांचिया मना । नये हा वासना त्याची करी ॥ ४ ॥

---

१ पं. वचन.—२ दे. पं. अष्टै.—३ पं. अनुपम्य गहन—.४ पं. पाहुणेर.—५ पं. फुलें पानें.—६ पं. देवें.—७ पं. तें.—* पं. हा शब्द नाहीं.

॥ ६८५ ॥

तीर्थे केलीं कोटीवरी । नाहीं देखिली पंढरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जळो त्याचें ज्यो[1]लेंपण । न देखे चि समचरण ॥ ध्रु ॥
योग याग अनंत केले । नाहीं समचरण देखिले ॥ २ ॥
तुका ह्मणे विठ्ठलपायीं । अनंत तीर्थे घडिलीं पाहीं ॥ ३ ॥

॥ ६८६ ॥

कोणतें कारण राहिलें यामुळें । जें म्यां तुज बळें कष्टवोवें[2] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं जात जीव नाहीं होत हानी । सहज तें मनीं आठवलें ॥ ध्रु ॥
नाहीं कांहीं चिंता मरतों उपवासीं । अथवा त्या ह्मैसी गाई व्हाव्या ॥ २ ॥
हें तों तुज कळों येतसे अंतरीं । लौं[3]खणीक वरी साच भाव ॥ ३ ॥
तुका ह्मणे देवा नासिवंतासाटीं । पायांसवें तुटी करिती तुझ्या ॥ ४ ॥

॥ ६८७ ॥

रामा अयोध्येच्या राया । दिनानाथा रे सखया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाप ताप विघ्न हरीं । दिनानाथा सुख करीं ॥ ध्रु ॥
भि[4]लटीचिया रे उच्छिष्टा । स्वीकारिसी[5] रे तूं भ्रष्टा ॥ २ ॥
मी तों सलगीचें मूल । तुका ह्मणे तूं सखोल ॥ ३ ॥

॥ ६८८ ॥

आं[6]मिषाचिये आं[7]से गळ गिळी मासा । फुटोनियां घसा मरण पावे ॥ १ ॥
मरणाचे वेळे[8] करी तळमळ । आठवी कृपाळ तये वेळीं ॥ २ ॥
अंतकाळीं ज्याच्या नाम आलें मुखा । तुका ह्मणे सुखा पार नाहीं ॥ ३ ॥

---

१ पं. जालेंपण.–२ त. कष्टावेलें.–३ पं. लापणीक.–४ त. पं. भिल्लटिचिया –५ पं. स्वीकारिसी तूं रे भ्रष्टा.–६ दे. क. अंविसाच्चिया. त. आविसाचिये.–७ दे. त. क. असे.–८ पं बेळीं.

॥ ६८९ ॥

तुजवरी ज्याचें मन । दरुशन दे त्याचें ॥ १ ॥

॥ धु. ॥ कैसा जाती शुद्ध भाव । हात पाव ना वृत्ती ॥ ध्रु ॥

अवघियांचा करूनि मेळा । तुज डोळां रोखिलें ॥ २ ॥

तुका ह्मणे तुज आड । लपोनि कोड दावीं देवा ॥ ३ ॥

॥ ६९० ॥

विश्वव्यापी माया । तिणें झाकुळिलें छाया ॥ १ ॥

॥ धु. ॥ सत्य गेलें भोळ्यावारी । अविवेचेंची चाली थोरी ॥ ध्रु ॥

आपुलें चि मन । करवी आपणां बंधन ॥ २ ॥

तुका ह्मणे देवा । तुह्मी कोडीं हीं उगवा ॥ ३ ॥

॥ ६९१ ॥

पोटीं जन्मती रोग । तरि कां ह्मणावे आप्तवर्ग ॥ १ ॥

॥ धु. ॥ रानीं वसती औषधी । तरि कां ह्मणाव्या निपराधी ॥ २ ॥

तैसें शरीराचें नातें । तुका ह्मणे सर्व आतें ॥ ३ ॥

॥ ६९२ ॥

नव्हे शब्द एक देशी । सांडी गवशी कोणाला ॥ १ ॥

॥ धु. जाली माझी वैखरी । विश्वंभरी व्यापक ॥ ध्रु ॥

मोकलिलें जावें बाणें । भाता जेणें वाईलें ॥ २ ॥

आतां येथें कैचा तुका । बोले सिका स्वामीचा ॥ ३ ॥

---

१ दे. त. दरुषण.—२क. अवघेचि.

॥ ६९३ ॥

गायनाचे रंगीं । शक्ति अद्भुत हे अंगीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ हें तों देणें तुमचें देवा । घ्यावी अखंडित सेवा ॥ ध्रु ॥

अंगीं प्रेमाचें भरतें । नाहीं उतार चढतें ॥ २ ॥

तुका ह्मणे वाणी । नाम अमृताची खाणी ॥ ३ ॥

॥ ६९४ ॥

माप *ह्मणे मी मवितें । भरी धणी ठेवी रितें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ देवा अभिमान नको । माझेठायीं देऊं सेंकों ॥ ध्रु ॥

देशीं चाले सिका । रितें कोण लेखी रंका ॥ २ ॥

हातीं सूत्रदोरी । तुका ह्मणे त्याची थोरी ॥ ३ ॥

॥ ६९५ ॥

कोण सांगायास । गेलें होतें देशोदेश ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ नेलें वाऱ्या हातीं माप । समर्थ तो माझा बाप ॥ ध्रु ॥

कोणाची हे सत्ता । जाली वाचा वदविता ॥ २ ॥

तुका ह्मणे या निश्चयें । माझें निरसलें भय ॥ ३ ॥

॥ ६९६ ॥

सकळिकांच्या पायां माझी विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ अहो श्रोते वक्ते सकळ ही जन । बरें पारखुन बांधा गांठी ॥ ध्रु॥

फोडिलें भांडार धन्याचा हा माल । मी तंव हामाल भारवाही ॥ ३ ॥

तुका ह्मणे चाली जाली चहूं देशीं । उतरला कसीं खरा माल ॥ ४ ॥

---

१ त. भातें.—२ पं. परम अमृताची खाणी ।. त. नामामृताची खाणी ।.—३ पं. शकों.

* त. हा शब्द नाहीं.

॥ ६९७ ॥

कोण त्याचा पार पावला धुंडितां ।
पुढें विचारितां विश्वंभरा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अणुरेणु सूक्ष्मस्थूळा पार नाहीं ।
श्रुती नेती त्या ही खुंटलिया ॥ ध्रु ॥
फळांत कीटक येवढें आकाश ।
ऐसीं तरुवरास अनेक किती ॥ २ ॥
दाविलें अनंतें अर्जुनासि पोटीं ।
आणीक त्या सृष्टि कृष्णलोक ॥ ३ ॥
तुका ह्मणे लागा संतांचिये कासे ।
ठाव घेतां कैसे वांचा जीवें ॥ ४ ॥

॥ ६९८ ॥

जें जें कांहीं करितों देवा । तें तें सेवा समर्पे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भेद नाहीं सर्वात्मना । नारायणा तुज मज ॥ ध्रु ॥
आह्मी दुजें नेणों कोणा । हें चि मना मन साक्ष ॥ २ ॥
तुका ह्मणे जगन्नाथा । हें अन्यथा नव्हे कीं ॥ ३ ॥

॥ ६९९ ॥

स्तुति करूं तरी नव्हे चि या वेदा ।
तेथें माझा धंदा कोणीकडे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परी हे वैखरी गोडावली सुखें ।

रसना रस मुखें इच्छीतसे ॥ ध्रु ॥
रूप वर्णावया कोठें पुरे मती ।
रोमीं होती जाती ब्रह्मांडें हीं ॥ २ ॥
तुका ह्मणे तूं ऐसा एक साचा ।
ऐसी तंव वाचा जाली नाहीं ॥ ३ ॥

॥ ७०० ॥

तुज वर्णी ऐसा तुज विण नाहीं ।
दुजा कोणी तीहीं त्रिभुवनीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सहस्रमुखें शेष सिणला बापुडा ।
चिरलिया धडा जिव्हा त्याच्या ॥ ध्रु ॥
अव्यक्ता अलक्षा अपारा अनंता ।
निर्गुणा सच्चिदा नारायणा ॥ २ ॥
रूप नाम घेसी आपुल्या स्वइच्छा ।
होसी भाव तैसा त्याकारणें ॥ ३ ॥
तुका ह्मणे जरी दाविसी आपणा ।
तरि च नारायणा कळों येसी ॥ ४ ॥

॥ ७०१ ॥

पूर आला आनंदाचा । लाटा उसळती प्रेमाच्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बांधूं विठ्ठलसांगडी । पोहुनि जाऊं पैल थडी ।
अवघे जन गडी । घाला उडी भाई नो ॥ ध्रु ॥

---

१ त. साचिता.

हें तों नाहीं सर्वकाळ । अमुप अमृताचें[1] जळ ॥ २ ॥
तुका ह्मणे थोरा पुण्यें । ओघ आला पंथें येणें ॥ ३ ॥

॥ ७०२ ॥

आणीक दुसरें मज नाहीं आतां । नेमिलें[2] या चित्तापासुनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पांडुरंग मनीं पांडुरंग ध्यानीं । जाग्रतीं स्वप्नीं पांडुरंग ॥ ध्रु ॥
पडिलें वळण इंद्रियां सकळां । भाव तो निराळा नाहीं दुजा ॥ २ ॥
तुका ह्मणे नेत्रीं केलें ओळखण । साजिरें तें[3] ध्यान विटेवरी ॥ ३ ॥

॥ ७०३ ॥

मी तों सर्वभावें अनधिकारी । होइल कैसी परी नेणों देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पुराणींचे अर्थ आणितां मनांस[4] । होय कासावीस[5] जीव माझा ॥ ध्रु ॥
इंद्रियांचीं[6] आह्मी पांगिलों[7] अंकितें । त्यांचे रंगीं चित्त रंगलेंसे ॥ २ ॥
एकाचें ही मज न घडे दमन । अवघीं नेमून कैसीं राखों ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज तारीं पंढरीराया । नाहीं तरी वांयां गेलों दास ॥ ४ ॥

॥ ७०४ ॥

लक्षूनियां योगी पाहाती आभास । तें दिसे आह्मांस दृष्टीपुढें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कर दोनी कटीं राहिलासे उभा । सांवळी हे प्रभा अंगकांती ॥ ध्रु ॥
व्यापूनि वेगळें राहिलेंसे दुरी । सकळां अंतरीं निर्विकार ॥ २ ॥
रूप नाहीं रेखा नाम ही जयासी । आपुल्या[8] मानसीं शिव ध्याय ॥ ३ ॥
अंत नाहीं पार वर्णा नाहीं थार । कुळ याति शिर हस्त पाद ॥ ४ ॥

---

१ क. अमृतजळ.—२ क. न मिळे.—३ त हें.—४ त मानसीं.—५ त. कासावीसी.—
६ पं. इंद्रियाचे आह्मी पांगिलों अंकित.—७ त. पांगिलीं —८ दे. क. त. आपुल्या.

अचेत चेतलें भक्तीचिया सुखें । आपुल्या कौतुकें तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ७०५ ॥

कैसें करूं ध्यान कैसा पाहों तुज । वर्म दावीं मज याचकासी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ कैसी भक्ति करूं सांग तुझी सेवा । कोण्या भावें देवा आतुडसी ॥ ध्रु ॥

कैसी कीर्ती वांणूं[1] कैसा लक्षा आणूं । जाणूं हा कवणु[2] कैसा तुज ॥ २ ॥

कैसा गाऊं गीतीं[3] कैसा ध्याऊं चित्तीं । कैसी स्थिती मती दावीं मज ॥ ३ ॥

तुका ह्मणे जैसें दास केलें देवा । तैसें हें अनुभवा आणीं मज ॥ ४ ॥

॥ ७०६ ॥

निगमाचें वन । नका शोधूं करूं सीण ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ या रे गौळियांचे घरीं । बांधलें तें दावें वरी ॥ ध्रु ॥

पीडलेती भ्रमें । वाट न कळतां वर्मे ॥ २ ॥

तुका ह्मणे भार । माया टाका अहंकार ॥ ३ ॥

॥ ७०७ ॥

मन वोळी मना । बुद्धि बुद्धी क्षण क्षणां ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ मी च मज राखण जालों । ज्याणें तेथें चि धरिलों ॥ ध्रु ॥

जें जें जेथें उठी । तें तें तया हातें कुंटी[4] ॥ २ ॥

भांजिली[5] खांजनी[6] । तुका साक्ष उरला दोन्ही ॥ ३ ॥

॥ ७०८ ॥

ब्रह्म न लिंपे त्या मेळें । कर्माअकर्मा वेगळें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तो चि एक तया जाणे । पावे अनुभविलें खुणें ॥ ध्रु ॥

शौच अशौचाचे संधीं । तन आळा तना चिं* मधीं ॥ २ ॥

पापपुण्यां नाहीं ठाव । तुका ह्मणे सहज भाव ॥ ३ ॥

---

१ क. वानूं.—२ दे. कवण—३ दे. किती. त. कीर्ती.—४ पं. त. कुटी.—५ पं. भाजिली.—६ क. खाजनी. त. खाजणी.—* पं. हा शब्द नाहीं.

॥ ७०९ ॥

काय दरा करील वन । समाधान नाहीं जंव ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तरी काय तेथें असती थोडीं । काय जोडी तयांसी ॥ ध्रु ॥

रिघतां धांवा पेंवामध्यें । जोडे सिद्धि ते ठायीं ॥ २ ॥

काय भस्म करील राख । अंतर पोक[2] नाहीं तों ॥ ३ ॥

वर्णाआश्रमाचे धर्म । जाती श्रम जालिया ॥ ४ ॥

तुका ह्मणे सांग पाश । निरसे आस तें हित ॥ ५ ॥

॥ ७१० ॥

तें ही नव्हे जें करितां कांहीं । ध्यातां ध्यायीं तें ही नव्हे ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तें ही नव्हे जें जाणवी जना । वाटे मना तें[3] ही नव्हे ॥ ध्रु ॥

त्रास मानिजे कांटाळा । अशुभ वाचाळा तें ही नव्हे ॥ २ ॥

तें[4] ही नव्हे जें भोंवतें भोंवे । नागवें धांवे तें ही नव्हे ॥ ३ ॥

तुका ह्मणे एक चि आहे । सहजि पाहें सहज ॥ ४ ॥

॥ ७११ ॥

बोलें बोलतां वाटे सोपें । करणी करितां टीर कांपे ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ नव्हे वैराग्य सोपारें । मज बोलतां न वाटे खरें ॥ ध्रु ॥

विष खावें ग्रासोग्रासीं । धन्य तो चि एक सोसी ॥ २ ॥

तुका ह्मणे करूनि दावी । त्याचे पाय माझे जीवीं ॥ ३ ॥

॥ ७१२ ॥

होईन भिकारी । पंढरीचा वारकरी ॥ १ ॥

---

१. दे. पं. त. रिगतां.—२ दे. त. क. पाख.—३ दे. तेंनव्हे.—४ पं. 'तें ही' याच्यांबद्दल 'नाहीं.'—५ त. पं. बोल बोलतां सोपे.—६ दे. त. न वटे.

॥ धु. ॥ हा चि माझा नेम धर्म । अवघें विठोबाचें नाम ॥ ध्रु ॥
हे चि माझी उपासना । लागेन संतांच्या चरणा ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । करीन ते भोळी सेवा ॥ ३ ॥

॥ ७१३ ॥

सांटविला हरी । जींहीं ह्रदयमंदिरीं ॥ १ ॥
॥ धु. ॥ त्यांची सरली वेरझार । जाला सफळ व्यापार ॥ ध्रु ॥
हरी आला हाता । मग कैंचीं भय चिंता ॥ २ ॥
तुका ह्मणे हरी । कांहीं उरों नेदी उरी ॥ ३ ॥

॥ ७१४ ॥

मोक्ष तुमचा देवा । तुह्मी दुर्लभ तो ठेवा ॥ १ ॥
॥ धु. ॥ मज भक्तीची आवडी । नाहीं अंतरीं ते गोडी ॥ ध्रु ॥
आपल्या प्रकारा । करा जतन दातारा ॥ २ ॥
तुका ह्मणे भेटी । पुरे एक चि शेवटीं ॥ ३ ॥

॥ ७१५ ॥

नामपाठ मुक्ताफळांच्या ओवणी । हें सुख सगुणीं अभिनव ॥ १ ॥
॥ धु. ॥ तरी आह्मी जालों उदास निर्गुणा । भक्तांचिया मना मोक्ष नये ॥ ध्रु ॥
द्यावें घ्यावें ऐसों येथें उरे भाव । काय ठाया ठाव पुसोनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां अभयदान करा । ह्मणा विश्वंभरा दिलें ऐसें ॥ ३ ॥

॥ ७१६ ॥

भवसिंधूचें काय कोडें । दावी वाट चाले पुढें ॥ १ ॥

---

१ दे. क. लागन.—२ क. त. सकळ.—३ दे. त. क. ऐसें.

॥ ध्रु. ॥ तारूं भला पांडुरंग । पाय भिजों नेदी अंग ॥ ध्रु ॥
मागें उतरिले बहुत । पैल तिरीं साधुसंत ॥ २ ॥
तुका ह्मणे लाग वेगें । जाऊं तयांचिया मागें ॥ ३ ॥

॥ ७१७ ॥

नाहीं साजत हा मोठा । मज अळंकार खोटा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ असें तुमचा रजरेण । संतां पायींचीं वाहाण ॥ ध्रु ॥
नाहीं स्वरूपीं ओळखी । भक्तिभाव करीं देखीं ॥ २ ॥
नाहीं शून्याकारीं । क्षर ओळखी अक्षरीं ॥ ३ ॥
नाहीं विवेक या ठायीं । आत्मा अनात्मा तें* काई ॥ ४ ॥
कांहीं नव्हे तुका । पांयां पडेने हें+ ऐका ॥ ५ ॥

॥ ७१८ ॥

सत्य साच खरें । नाम विठोबाचें बरें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जेणें तुटती बंधनें । उभयलोकीं कीर्ति जेणें ॥ ध्रु ॥
भाव ज्याचे गांठी । त्यासी लाभ उठाउठी ॥ २ ॥
तुका ह्मणे भोळा । जिंकूं जाणे कळिकाळा ॥ ३ ॥

॥ ७१९ ॥

सत्य तो आवडे । विकल्पानें भाव उडे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आह्मी तुमच्या कृपादानें । जाणों शुद्ध मंद सोनें ॥ ध्रु ॥
आला भोग अंगा । न लवूं उसीर त्या त्यागा ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । अंजन ते तुझी सेवा ॥ ३ ॥

---

१ त. पं.पडणें. दे. पडनें. *दे. त. हा शब्द नाहीं. + पं. 'हें' हा शब्द नाहीं.

॥ ७२० ॥

करावें चिंतन । तें चि बरें न भेटून ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ बरवा अंगीं राहे भाव । तेंग[1] तो चि जाणा देव ॥ छ ॥

दर्शनाची[2] उरी । अवस्था चि अंग धरी ॥ २ ॥

तुका ह्मणे मन । तेथें[3] सकळ कारण ॥ ३ ॥

॥ ७२१ ॥

जें जें जेथें पावे । तें तें समर्पावें सेवे ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ सहज पूजा या चि नांवें । गळित अभिमानें व्हावें ॥ छ ॥

अवघें भोगितां गोसावी । आदीं आवसानीं जीवीं ॥ २ ॥

तुका ह्मणे सिण । न धरितां नव्हे भिन्न ॥ ३ ॥

॥ ७२२ ॥

नसे तरी मनीं नसो । परी वाचे तरी वसो ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ देह पडो या चिंतनें । विठ्ठलनामसंकीर्तनें[4] ॥ छ ॥

दंभास्थिती भलत्या भावें । मज हरिजन ह्मणावें ॥ २ ॥

तुका ह्मणे काळें तरी । मज सांभाळील हरी ॥ ३ ॥

॥ ७२३ ॥

नये जरी कांहीं । तरी भलतें चि वाहीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ह्मणविल्या दास । कोणी न धरी वेठीस ॥ छ ॥

समर्थाच्या नांवें । भलतैसें विकावें ॥ २ ॥

तुका ह्मणे सत्ता । वरी असते बहुतां ॥ ३ ॥

---

१ पं. तोंगे.—२ दे. क. दर्शणाची.—३ दे. क. मनो.—४ दे. विठ्ठलनामें.

॥ ७२४ ॥

न संडवे अन्न । मज न सेववे वन ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ह्मणउनी नारायणा । कींव भाकितों करुणा ॥ ध्रु ॥

नाहीं अधिकार । कांहीं घोकाया अक्षर ॥ २ ॥

तुका ह्मणे थोडें । आयुष्य अवघें चि कोडें ॥ ३ ॥

॥ ७२५ ॥

एकांचीं उत्तरें । गोड अमृत मधुरें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ऐशा देवाच्या विभुती । भिन्न प्रारब्धाची गती ॥ ध्रु ॥

एकांचीं वचनें । कडु अत्यंत तीक्ष्णें ॥ २ ॥

प्रकाराचें तीन । तुका ह्मणे केलें जन ॥ ३ ॥

॥ ७२६ ॥

वचनें ही नाड । न बोले तें मुकें खोड ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ दोहीं वेगळें तें हित । बोलीं अबोलणीं नीत ॥ ध्रु ॥

अंधार प्रकाशी । जाय दिवस पावे निशी ॥ २ ॥

बीज पृथिवीच्या पोटीं । तुका ह्मणे दावी दृष्टी ॥ ३ ॥

॥ ७२६ ॥

विचारा वांचून । न पवीजे समाधान ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ देह त्रिगुणांचा बांधा । माजी नाहीं गुण सुदा ॥ ध्रु ॥

देवाचिये चाडे । देवा द्यावें जें जें घडे ॥ २ ॥

तुका ह्मणे होतें । बहु गोमटें उचितें ॥ ३ ॥

---

१ क. पं. वचन.—२ क. वेगळ.

॥ ७२८ ॥

तुटे भवरोग । संचितक्रियमाणभोग ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ऐसें विठोबाचें नाम । उच्चारितां खंडे जन्म ॥ ध्रु ॥

वर्सो न सके पाप । पळे त्रिविध तो ताप ॥ २ ॥

तुका ह्मणे माया । होय दासी लागे पायां ॥ ३ ॥

॥ ७२९ ॥

मुसावलें अंग । रंगीं मेळविला रंग ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ एकीं एक दृढ जालें । मुळा आपुलिया आलें ॥ ध्रु ॥

सागरीं थेंबुडा । पडिल्या निवडे कोण्या वाटा ॥ २ ॥

तुका ह्मणे नवें । नव्हे जाणावें हें देवें ॥ ३ ॥

॥ ७३० ॥

अनुतापें दोष । जाय न लगतां निमिष ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ परि तो राहे विसावला । आदीं अवसानीं भला ॥ ध्रु ॥

हें चि प्रायश्चित्त । अनुतापीं न्हाय चित्त ॥ २ ॥

तुका ह्मणे पापा । शिवों नये अनुतापा ॥ ३ ॥

॥ ७३१ ॥

चहूं आश्रमांचे धर्म । न राखतां जोडे कर्म ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तैसी नव्हे भोळी सेवा । एक भाव चि कारण देवा ॥ ध्रु ॥

तपें इंद्रियां आघात । क्षेणें[1] एका वाताहात ॥ २ ॥

मंत्र चळे थोडा । तरि धडे[2] चि होय वेडा ॥ ३ ॥

---

१ क. क्षणें एक. पं. क्षणा एका.—२ दे. क. धडे चि.

व्रतें करितां सांग । तरी एक चुकतां भंग ॥ ४ ॥
धर्म सत्त्व चि कारण । नाहीं तरी केला सिण ॥ ५ ॥
भूतदयेसि आघात । उंचनीच[१] वाताहात ॥ ६ ॥
तुका ह्मणे दुजें । विधिनिषेधाचें ओझें ॥ ७ ॥

॥ ७३२ ॥

सोडिला संसार । माया तयावरि फार ॥ १ ॥
॥ धु. ॥ धांवत चाले मागें मागें । सुखदुःख साहे अंगें ॥ ध्रु ॥
यानें घ्यावें नाम । तीसीकरणें त्याचें काम ॥ २ ॥
तुका ह्मणे भोळी । विठ्ठलकृपेची कोंवळी ॥ ३ ॥

॥ ७३३ ॥

बैसों खेळूं जेवूं । तेथें नाम तुझें गाऊं ॥ १ ॥
॥ धु. रामकृष्णनाममाळा । घालूं ओवुनियां गळां ॥ ध्रु ॥
विश्वास हा धरूं । नाम बळकट करूं ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां । आह्मां जीवन शरणागतां ॥ ३ ॥

॥ ७३४ ॥

पाठीं पोटीं देव । कैचा हरिदासां भेव ॥ १ ॥
॥ धु. ॥ करा आनंदें कीर्तन । नका आशंकितमन ॥ ध्रु ॥
एथें कोठें काळ । करील देवापाशीं बळ ॥ २ ॥
तुका ह्मणे धनी । संपुरता[२] काय वाणी ॥ ३ ॥

---

१ क. उंच निंच.—२ क. संपुरतां. दे. सपुरतां.

॥ ७३५ ॥

मनोमय पूजा । हे चि पंढीयें केशीराजा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ घेतो कल्पनेचा भोग । न मानेती बाह्य रंग ॥ ध्रु ॥

अंतरींचें जाणे । आदिवर्तमान खुणे ॥ २ ॥

तुका ह्मणे कुडें । कोठें सरे त्याच्या पुढें ॥ ३ ॥

॥ ७३६ ॥

जाणे भक्तीचा जिव्हाळा । तो चि देवेचा पुतळा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आणीक नये माझ्या मना । हो का पंडित शाहाणा ॥ ध्रु ॥

नामरूपीं जडलें चित्त । त्याचा दास मी अंकित ॥ १ ॥

तुका ह्मणे नवविध । भक्ति जाणे तो चि शुद्ध ॥ ३ ॥

॥ ७३७ ॥

याजसाटीं वनांतरा । जातों सांडुनियां घरा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ माझें दिठावेल प्रेम । बुद्धि होईल निष्काम ॥ ध्रु ॥

अद्वैताची वाणी । नाहीं ऐकत मी कानीं ॥ २ ॥

तुका ह्मणे अहंब्रह्म । आड येऊं नेदीं भ्रम ॥ ३ ॥

॥ ७३८ ॥

बुडतां आवरीं । मज भवाचे सागरीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ नको मानूं भार । पाहों दोषांचे डोंगर ॥ ध्रु ॥

आहे तें सांभाळीं । तुझी कैसी ब्रीदावळी ॥ २ ॥

तुका ह्मणे दोषी । मी तों पातकांची राशी ॥ ३ ॥

---

१ पं. पंढरीये.— २ पं. देवाचा.—३ त. पाहोन.

॥ ७३९ ॥

अक्षई तें झालें । आतां न मोडे रचिलें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ पाया पडिला खोले ठायीं । तेथें पुढें चाली नाहीं ॥ध्रु ॥

होतें विखुरलें । ताळा जमे झडती आलें ॥ २ ॥

तुका ह्मणे बोली । पुढें कुंटित चि जाली ॥ ३ ॥

॥ ७४० ॥

तुझे थोर थोर । भक्त करिती विचार ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ जपतपादि साधनें । मज चिंतवेना मनें ॥ ध्रु ॥

करुणावचनें । म्यां भाकावीं तुह्मां दीनें ॥ २ ॥

तुका ह्मणे घेई । माझें थोडें फार ठायीं ॥ ३ ॥

॥ ७४१ ॥

लावुनि काहाळा । सुखें करितों सोहळा[1] ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ सादवीत गेलों जना । भय नाहीं सत्य जाणां ॥ ध्रु ॥

गात नाचत विनोदें । टाळघागऱ्यांच्या छंदें ॥ २ ॥

तुका ह्मणे भेव । नाहीं पुढें येतो देव ॥ ३ ॥

॥ ७४२ ॥

मुक्त कासया ह्मणावें । बंधन तें नाहीं ठावें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ सुखें करितों कीर्तन । भय विसरलें मन ॥ ध्रु ॥

देखिजेना नास । घालूं कोणावरी कास ॥ २ ॥

तुका ह्मणे साहे । देव आहे तैसा आहे ॥ ३ ॥

---

१ दे. त. सोहोळा.

॥ ७४३ ॥

ओनाम्याच्या काळें । खडे मांडेविले बाळें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तें चि पुढें पुढें काई । मग लागलिया सोई ॥ ध्रु ॥

रज्जु सर्प होता । तोंवरी चि न कळतां ॥ २ ॥

तुका ह्मणे साचें । भय नाहीं बागुलाचें ॥ ३ ॥

॥ ७४४ ॥

आतां पुढें धरीं । माझे आठव वैखरी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ नको बडबडूं भांडे । कांहीं वाउगें तें रांडे ॥ ध्रु ॥

विठ्ठल विठ्ठल । ऐसे सांडुनियां बोल ॥ २ ॥

तुका ह्मणे आण । तुज स्वामीची हे जाण ॥ ३ ॥

॥ ७४५ ॥

काय नव्हे करितां तुज । आतां राखें माझी लाज ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ मी तों अपराधाची राशी । शिखा अंगुष्ट तोंपाशीं ॥ ध्रु ॥

त्राहें त्राहें त्राहें । मज कृपादृष्टी पाहें ॥ २ ॥

तुका ह्मणे देवा । सत्य घ्यावी आतां सेवा ॥ ३ ॥

॥ ७४६ ॥

वंदीन मी भूतें । आतां अवघीं चि* समस्तें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तुमची करीन भावना । पदोपदीं नारायणा ॥ ध्रु ॥

गाळुनियां भेद । प्रमाण तो ऐसा वेद ॥ २ ॥

तुका ह्मणे मग । नव्हे दुजयाचा संग ॥ ३ ॥

---

१ पं. वेळे.—२ त. मांडियेले. पं. मांडवले.— * त. पं. हा शब्द नाहीं.

॥ ७४७ ॥

पूजा पुज्यमान । कथे उभे हरिजन ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ज्याची कीर्ती वाखाणिती । तेथें ओतली ते मुर्ती ॥ ध्रु ॥

देहाचा विसर । केला आनंदें संचार ॥ २ ॥

गेला अभिमान । लाज बोळविला मान ॥ ३ ॥

शोक मोह चिंता । याची नेणती ते वार्ता ॥ ४ ॥

तुका ह्मणे सखे । विठोबा च ते सारिखे ॥ ५ ॥

॥ ७४८ ॥

भाव तैसें फळ । न चले देवापाशीं बळ ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ धांवें जातीपाशीं जाती । खुण येरयेरां चित्तीं ॥ ध्रु ॥

हिरा हिरकणी । काढी आंतुनि [1]अहिरणी ॥ २ ॥

तुका ह्मणे के[2]लें । [3]मन शुद्ध हें चांगलें ॥ ३ ॥

॥ ७४९ ॥

वरि बोला रस । कथी ज्ञान माजी फोस ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ऐसे लटिके जे ठक । तयां इ[4]हं ना पर लोक ॥ ध्रु ॥

परिस एक सांगे । अंगा धुळी हे न लगे ॥ २ ॥

तुका ह्मणे हाडें । कुतऱ्या लाविलें झगडें ॥ ३ ॥

॥ ७५० ॥

हे चि तुझी पूजा । आतां करीन केशीराजा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ [5]अवघ्या तुझीं पदें । नमस्कारीन अभेदें ॥ ध्रु ॥

---

१ त. दे. पं. आहिरणी.—२ त. पं. भलें.—३ त. मन शुद्ध जींहीं केलें. पं. मन शुद्ध तींहीं केलें.--४ दे. त. येहे.—५ क. दे. अवघीं तुझींच हें पदें.

न वर्जितदिशा । जाय तेथें चि सरिसा ॥ २ ॥
नव्हे एकदेशी । तुका ह्मणे गुणदोषीं ॥ ३ ॥

॥७५१ ॥

आपलें तों कांहीं । येथें सांगिजेसे नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परि हे वाणी वायचळ । छंद करविते बरळ ॥ ध्रु ॥
पंचभूतांचा हा मेळा । देह सत्यत्वें निराळा ॥ २ ॥
तुका ह्मणे भुली । इच्या[1] उफराट्या चाली ॥ ३ ॥

॥ ७५२ ॥

विठ्ठल नावाडा फुकाचा । आळविल्या साटीं वाचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कटीं कर जैसे तैसे । उभा राहिला न बैसे ॥ ध्रु ॥
न पाहे सिदोरी । जाती[2] कुळ न विचारी ॥ २ ॥
तुका ह्मणे भेटी । हाक देतां उठाउठीं ॥ ३ ॥

॥ ७५३ ॥

कृपावंत किती । दीनें[3] बहु आवडती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्यांचा भार वाहे माथां । करी योगक्षेमचिंता ॥ ध्रु ॥
भुलों नेदी वाट । करीं धरूनि दावी नीट ॥ २ ॥
तुका ह्मणे जीवें । अनुसरतां एकां[4] भावें ॥ ३ ॥

॥ ७५४ ॥

नेणती वेद श्रुति कोणी । आह्मां भाविकां वांचुनी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रूप आवडे आह्मांशी । तैसी जोडी ऱ्हषीकेशी ॥ ध्रु ॥

---

१ पं. इची उफराटी चाली.—२ पं. याती.—३ पं. दीन.—४ पं. एक्या.

आह्मी भावें बळिवंत । तुज घालूं ह्रदयांत ॥ २ ॥
तुका ह्मणे तुज धाक । देतां पावसील हाक ॥ ३ ॥

॥ ७५५ ॥

मन गुंतलें लुलयां । जाय धांवोनि त्या ठाया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मागें परतावी[1] तो बळी । शूर एक भूमंडळीं ॥ ध्रु ॥
येऊनियां घाली घाला । नेणों काय होई[2] तुला ॥ २ ॥
तुका ह्मणे येणें । बहु नाडिले शाहाणे ॥ ३ ॥

॥ ७५६ ॥

घेई[3] माझे वाचे । गोड नाम विठोबांचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मी घ्या रे डोळे सुख । पाहा विठोबाचें मुख ॥ ध्रु ॥
तुह्मी ऐका रे कान । माझ्या विठोबाचे गुण ॥ २ ॥
मना तेथें धांव घेई । राहें विठोबाचे पायीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे जिवा । नको सोडूं या केशवा ॥ ४ ॥

॥ ७५७ ॥

धणी न पुरे गुण गातां । रूप दृष्टी न्याहाळितां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बरवा बरवा पांडुरंग । कांति सांवळी सुरंग ॥ ध्रु ॥
सर्वमंगळाचें सार । मुख सिद्धीचें भांडार ॥ २ ॥
तुका ह्मणे सुखा । अंतपार नाहीं लेखा ॥ ३ ॥

॥ ७५८ ॥

जरि मी नव्हतों पतित । तरि तूं पावन कैंचा येथ ॥ १ ॥

---

१ दे. त. परती. पं. परतवी.—२ त. पं. होईल.—३ 'घेईघेई' असें लोकांच्या ह्मणण्यांत आहे; पण तसें कोणत्याही प्रतींत आढळत नाहीं.

॥ ध्रु. ॥ ह्मणोनि माझें नाम आधीं । मग तूं पावन कृपानिधी ॥ ध्रु ॥
लोहो महिमान परिसा । नाहीं तरीं दगड[1] जैसा ॥ २ ॥
तुका ह्मणे याचकभावें । कल्पतरु मान[2] पावे ॥ ३ ॥

॥ ७५९ ॥

एक भाव चित्तीं । तरीं न लगे कांहीं युक्ती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कळों आलें जीवें । मज माझियाचि भावें ॥ ध्रु ॥
आठव चि पुरे । सुख अवघें मोहो रे[3] ॥ २ ॥
तुका ह्मणे मन । पूजा इच्छी नारायण ॥ ३ ॥

॥ ७६० ॥

मज संतांचा आधार । तूं एकलें निर्विकार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाहा विचारूनि देवा । नको आह्मांसवें दावा ॥ ध्रु ॥
तुज बोल न बोलवे । आह्मां भांडायाची सवे ॥ २ ॥
तुका ह्मणे तरी । ऐक्यभाव[4] उरे उरी ॥ ३ ॥

॥ ७६१ ॥

तुज मागणें तें देवा । आह्मां तुझी चरणसेवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आन नेघों देसी तरी । रिद्धि सिद्धि मुक्ति चारी ॥ ध्रु ॥
संतसंगति सर्वकाळ । थोर प्रेमाचा सुकाळ ॥ २ ॥
तुका ह्मणे नाम । तेणें पुरे माझें काम ॥ ३ ॥

---

१ पं. दगडा ऐसा.–२ पं. नाम.–३ त. मोहोरें –४ पं. एका भावेंन उरे उरी । त. ऐक भाव उरे उरी.

॥ ७६२ ॥

तुझा शरणागत । जन्मोजन्मींचा अंकित ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आणीकं[1] नेणं कांहीं हेवा । तुजवांचूनि केशवा ॥ ध्रु. ॥
हें चि माझें गाणें । तुझें नामसंकीर्तन ॥ २ ॥
तुझ्या नामाचीं भूषणें । तुका ह्मणे ल्यालों लेणें ॥ ३ ॥

॥ ७६३ ॥

उतरलों पार । सत्य झाला हा निर्धार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुझें नाम धरिलें कंठीं । केली संसारासी तुटी ॥ ध्रु. ॥
आतां नव्हे बाधा । कोणेविशीं कांहीं कदा ॥ २ ॥
तुका ह्मणे कांहीं । आतां उरलें ऐसें नाहीं ॥ ३ ॥

॥ ७६४ ॥

क्रियामतिहीन । एक मी गा तुझें दीन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देवा करावा सांभाळ । वारीं माझी तळमळ ॥ ध्रु. ॥
नको माझे ठायीं । गुणदोष घालूं कांहीं ॥ २ ॥
अपराधाच्या कोटी । तुका ह्मणे घोलीं[2] पोटीं ॥ ३ ॥

॥ ७६५ ॥

नाहीं निर्मळ जीवन । काय करील साबण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसी चित्तशुद्धि नाहीं । तेथें बोध करील काई ॥ ध्रु. ॥
वृक्ष[3] न धरी पुष्पफळ । काय करील वसंतकाळ ॥ २ ॥
वांजे न होती लेकरें । काय करावें भ्रतारें ॥ ३ ॥

---

१ पं आणीक कांहीं नेणें देवा .–२ पं.– घाला.–३ दे. वृक्षा.

नपुंसका पुरुषासी । काय करील बाइल त्यासी ॥ ४ ॥
प्राण गेलिया शरीर । काय करील वेव्हार ॥ ५ ॥
तुका ह्मणे जीवनेंविण । पीक नव्हे नव्हे जाण ॥ ६ ॥

॥ ७६६ ॥

नवां नवसांचीं । जालों तुह्मासी वाणीचीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोण तुझें नाम घेतें । देवा पिंडदान देतें ॥ ध्रु ॥
कोण होतें मागें पुढें । दुजें बोलाया रोकडें ॥ २ ॥
तुका ह्मणे पांडुरंगा । कोणा घेतासि वो संगा ॥ ३ ॥

॥ ७६७ ॥

एका बीजा केला नास । मग भोगिलें कणीस ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कळे सकळां हा भाव । लाहानथोरांवरी जीव ॥ ध्रु ॥
लाभ नाहीं फुकासाटीं । केल्याविण जीवासाटीं ॥ २ ॥
तुका ह्मणे रणीं । जीव देतां लाभ दुणी ॥ ३ ॥

॥ ७६८ ॥

आयुष्य गेलें वांयांविण । थोर झाली नागवण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां धांवें धांवें तरी । काय पाहातोसि हरी ॥ ध्रु ॥
माझे तुझे या चि गती । दिवस गेले तोंडीं माती ॥ २ ॥
मन वाव घेऊं नेदी । बुडवूं पाहे भवनदी ॥ ३ ॥
पडिला विषयाचा घाला । तेणें नागविलें मला ॥ ४ ॥
शरण आलों आतां धांवें । तुका ह्मणे मज पावें ॥ ५ ॥

---

१ पं. कोण.—२ दे. भोगेल.—३ क. ऐसें. त. आविष्य. दे. ऐश.

॥ ७६९ ॥

सोसोनि विपत्ती । जोडी दिली तुझे हातीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्याचा हा चि उपकार । अंतीं आह्मांशीं वेव्हार ॥ ध्रु ॥
नामरूपा केला ठाव । तुज कोण ह्मणतें देव ॥ २ ॥
तुका ह्मणे हरी । तुज ठाव दिला घरीं ॥ ३ ॥

॥ ७७० ॥

आपुलें मागतां । काय नाहीं आह्मां सत्ता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परि या लौकिकाकारणें । उरीं [1]ठेविलें बोलणें ॥ ध्रु ॥
ये चि आतां घडी । करूं बैसों ते चीं [2]फडी ॥ २ ॥
तुका ह्मणे करितों तुला । ठाव नाहींसें विठ्ठला ॥ ३ ॥

॥ ७७१ ॥

असो आतां किती । तुज यावें काकुलती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझें प्रारब्ध हें गाढें । तूं बापुडें तयापुढें ॥ ध्रु ॥
सोडवीन आतां । ब्रीदें तुझीं पंढरीनाथा ॥ २ ॥
तुका ह्मणे बळी । तो गांढ्याचे कान पिळी ॥ ३ ॥

॥ ७७२ ॥

काय नव्हे केलें । एका चिंतितां विठ्ठलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सर्वसाधनांचें सार । भवसिंधु उतरी पार ॥ ध्रु ॥
योगयागतपें । केलीं तयानें अमुपें ॥ २ ॥
तुका ह्मणे जपा । मंत्र [3]तीअक्षरी सोपा ॥ ३ ॥

---

१ हे. क. त. ठेविली.—२ क. फडीं.—३ त. त्रिअक्षरी. हे. क. वीं अक्षरीं.

॥ ७७३ ॥

हो कां दुराचारी । वाचे नाम जो उच्चारी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्याचा दास मी अंकित । कायावाचामनेंसहित ॥ ध्रु ॥
नसो भाव चित्तीं । हरिचे गुण गातां गीतीं ॥ २ ॥
करी[1] अनाचार । वाचे हरिनामउच्चार ॥ ३ ॥
हो कां भलतें कुळ । शुचि अथवा चांडाळ ॥ ४ ॥
ह्मणवी हरिचा दास । तुका ह्मणे धन्य त्यास ॥ ५ ॥

॥ ७७४ ॥

हाकेसरिसी उडी । घालूनियां स्तंभ फोडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसी कृपावंत कोण । माझे विठाईवांचून ॥ ध्रु ॥
करितां आठव । धांवोनियां घाली कव ॥ २ ॥
तुका ह्मणे गीतीं* गातां । नामें द्यावी सायुज्यता ॥ ३ ॥

॥ ७७५ ॥

लोह चुंबकाच्या बळें । उभें राहिलें निराळें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसा तूं चि आह्मांठायीं । खेळतोसी अंतर्बाहीं ॥ ध्रु ॥
भक्ष अग्नीचा तो दोरा । त्यासि वांचवी मोहरा ॥ २ ॥
तुका ह्मणे अधीलपणें । नेली लांकडें चंदनें ॥ ३ ॥

॥ ७७६ ॥

डोई वाढवूनि केश । भूतें आणिती अंगास ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरी ते नव्हति संतजन । तेथें नाहीं आत्मखुण ॥ ध्रु ॥
मेळवूनि नरनारी । शकुन सांगती नानापरी ॥ २ ॥

---

१ पं. करी. * त. हा शब्द नाहीं.

तुका ह्मणे मैंद । नाहीं त्यापासीं गोविंद ॥ ३ ॥

॥ ७७७ ॥

गाढवांचे[1] घोडे । आह्मी करूं दृष्टि पुढें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चघळी वाहाणा । माघारिया बांडा सुना ॥ ध्रु ॥
सोंगेसंपादणी[2] । तरि करूं शुद्ध वाणी ॥ २ ॥
तुका ह्मणे खळ । करूं समयीं निर्मळ ॥ ३ ॥

॥ ७७८ ॥

बाईल मेली मुक्त जाली । देवें माया सोडविली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विठो तुझें माझें राज्य । नाहीं दुसऱ्याचें काज ॥ ध्रु ॥
पोर मेलें बरें जालें । देवें मायाविरहित केलें ॥ २ ॥
माता मेली मज देखतां । तुका ह्मणे हरली चिंता ॥ ३ ॥

॥ ७७९ ॥

योग तप या चि नांवें । गळित व्हावें अभिमानें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करणें तें हें चि करा । सत्यें बरा व्यापार ॥ ध्रु ॥
तरि खंडे येरझार । निघे भार देहाचा ॥ २ ॥
तुका ह्मणे मानामान । हें बंधन नसावें ॥ ३ ॥

॥ ७८० ॥

करी संध्यास्नान । वारी खाउनियां अन्न ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तया नाहीं लाभहानी । आदा वेंचाचिये मौनीं[3] ॥ ध्रु ॥
मजुराचें धन । विळा दोर चि जतन ॥ २ ॥

---

१ त. गाढवाचें घोडें.—२ दे. त. सोंगसंपादनी.—३ पं. मनीं.

तुका ह्मणे नाहीं । अधीरासी देव कांहीं ॥ ३ ॥

॥ ७८१ ॥

वाखर घेउनि आलें । त्यासी तरवारेनें[1] हालें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ नव्हे आपुलें उचित । करूनि टाकावें फजित ॥ ध्रु ॥

अंगुळिया मोडी । त्यासी काय मिळे घोडीं ॥ २ ॥

नपुंसकासाठीं । तुका ह्मणे न लगे जेठी ॥ ३ ॥

॥ ७८२ ॥

वर्णाश्रम करिसी चोख । तरि तूं पावसी उत्तम लोक ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तुजला[2] तें नाहीं ठावें । जेणें अंगें चि ब्रह्म व्हावें ॥ ध्रु ॥

जरि तूं जालासी पंडित । करिसी शब्दाचें पांडित्य ॥ २ ॥

गासी तान मान बंध । हाव भाव गीत छंद ॥ ३ ॥

जाणसील तूं स्वतंत्र । आगमोक्त पूजायंत्र ॥ ४ ॥

साधनाच्या[3] ओढी । डोळियांच्या मोडामोडी ॥ ५ ॥

तुका ह्मणे देहीं । संत[4] जाहाले विदेही ॥ ६ ॥

॥ ७८३ ॥

प्रेमसूत्र दोरी । नेतो तिकडे जातों हरी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ मनेंसहित वाचा काया । अवघें दिलें पंढरीराया ॥ ध्रु ॥

सत्ता सकळ तया हातीं । माझी कींव काकुलती ॥ २ ॥

तुका ह्मणे ठेवी तैसें । आह्मी राहों त्याचे इच्छे ॥ ३ ॥

---

१ दे. त. तरवारेणें.—२ पं. त. परि तें तुज नाहीं ठावें । जेणें अंगें ब्रह्म व्हावें ।.—३ पं. साधनाच्या ओढाओढी.—४ पै. संत जाले ते विदेही.

॥ ७८४ ॥

पाववील ठाया । पांडुरंग चिंतिलिया ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ त्यासी चिंतिलिया मनीं । चिंता करी गंवसणी ॥ ध्रु ॥

पावावया फळ । अंगीं असावें हें बळ ॥ २ ॥

तुका ह्मणे तईं । सिद्धि वोळगती पायीं ॥ ३ ॥

॥ ७८५ ॥

धन्य भावशीळ । ज्याचें हृदय निर्मळ ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ पूजी प्रतिमेचे देव । संत ह्मणती तेथें भाव ॥ ध्रु ॥

विधिनिषेध नेणती । एक निष्ठा धरूनी चित्तीं ॥ २ ॥

तुका ह्मणे तैसें देवा । होणें लागे त्यांच्या भावा ॥ ३ ॥

॥ ७८६ ॥

आधीं च आळशी । वरी गुरूचा उपदेशी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ मग त्या कैंची आडकाठी । विधिनिषेधाची भेटी ॥ ध्रु ॥

नाचरवे धर्म । न करवे विधिकर्म ॥ २ ॥

तुका ह्मणे ते गाढव । घेती मेनासवें धांव ॥ ३ ॥

॥ ७८७ ॥

नाचे टाळी पिटी । प्रेमें अंग धरणीं लोटी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ माझे सखे ते सज्जन । भोळे भाविक हरिजन ॥ ध्रु ॥

न धरिती लाज । नाहीं जनासवें काज ॥ २ ॥

तुका ह्मणें दाटे । कंठ नेत्रीं जळ लोटे ॥ ३ ॥

---

१ त. मार्गी..—२ पं. मनामागें.

॥ ७८८ ॥

टिळा टोपी माळा देवाचें गवाळें। वागवी वोंगळें[1] पोटासाटीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुळसी खोवी कानीं दर्भ खोवी शेंडी। लटिकी धरी बोंडी नासिकाची ॥ ध्रु ॥
कीर्तनाचे वेळे रडे पडे लोळे। प्रेमेंविण डोळे[2] गळताती ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसे माविचे मइंद। त्यांपाशीं गोविंद नाहीं नाहीं ॥ ३ ॥

॥ ७८९ ॥

धन्य देहूं गांव पुण्य भूमि ठाव। तेथें नांदे देव पांडुरंग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धन्य क्षेत्रवासी लोक[3] ते दैवाचे। उच्चारिती वाचे नामघोष ॥ ध्रु ॥
कर कटीं उभा विश्वाचा जनिता। वामांगीं ते[4] माता रखुमादेवी ॥ २ ॥
गरुड पारीं उभा जोडुनियां कर। अश्वत्थ समोर उत्तरामुख ॥ ३ ॥
दक्षिणे शंकर लिंग हरेश्वर। शोभे गंगातीर इंद्रायणी ॥ ४ ॥
लक्ष्मीनारायण बल्लोळाचें[5] बन। तेथें अधिष्ठान सिद्धेश्वर ॥ ५ ॥
विघ्नराज द्वारीं बहिरव बाहेरी। हनुमंत शेजारीं सहित दोघे ॥ ६ ॥
तेथें दास तुका करितो कीर्तन। ह्रदयीं चरण विठोबाचे ॥ ७ ॥

शाक्तावर--अभंग १३.

॥ ७९० ॥

टवकारूनि दृष्टि लावुनियां रंग। दावी झगमग डोळ्यांपुढें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणती शिष्यासी लागली समाधी। लटकी चि उपाधी झकविती ॥ ध्रु ॥

---

१ दे. त. वोंगळ.—२ पं. गळे दाटताती.—३ त. लोक हे दैवाचे. दे. क. लोक दइवाचे.—४ त. हे.—५ पं. बलाळाचें.

दीपाचिया ज्योती कोंडियेलें तेज । उपदेश सांजरात्रीमाजी ॥ २ ॥
रांगोळिया चौक शृंगारुनी वोजा । आवरण पूजा यंत्र करी ॥ ३ ॥
पडदा लावोनियां दीप चहूं कोनीं । बैसोनि आसनीं मुद्रा दावी ॥ ४ ॥
नैवेद्यासी ह्मणे करावें पक्वान्न । पात्रासी दिव्यान्न परवडी ॥ ५ ॥
जाला उपदेश कवळ घ्या रे मुखीं । आपोशन शेखीं[1] बुडविलें ॥ ६ ॥
पाषांड करोनी मांडिली जीविका । बुडवी भाविकां लोकांप्रती ॥ ७ ॥
कायावाचामनें सोडवी संकल्प । गुरु गुरु जप प्रतिपादी ॥ ८ ॥
शुद्ध परमार्थ बुडविला तेणें । गुरुत्वभूषणें भोग भोगी ॥ ९ ॥
विधीचा ही लोप बुडविला वेद । शास्त्रांचा ही बोध हरविला ॥ १० ॥
योगाची धारणा नाहीं प्राणायाम । सांडी यम नेम नित्यादिक ॥ ११ ॥
वैराग्याचा लोप हरिभजनीं विक्षेप । वाढविलें पाप मतिलंडें ॥ १२ ॥
तुका ह्मणे गेलें गुरुत्व गुखाडीं । पूर्वजांसी धाडी नर्कवासा ॥ १३ ॥

॥ ७९१ ॥

शाक्त गधडा जये देशीं । तेथें राशी पापाच्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सुकृताचा उदो केला । गोंधळ घाला इंद्रियें ॥ ध्रु ॥
क्रोधरूपें वसे काम । तीचें नाम जपतसे ॥ २ ॥
मद्यभक्षण मांगिणजाती । विटाळ चित्तीं सांटविला ॥ ३ ॥
स्तवुनियां पूजी रांड । न लजे[2] भांड दाढीसी । ४ ॥
तुका ह्मणे भगवती । नेइल अंतीं आपणापें ॥ ५ ॥

---

१ दे. शखीं.—२ पं. लगे.

॥ ७९२ ॥

राजा प्रजा द्वाड देश। शाक्त वास करिती तो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अधर्माचें उबडं[1] पीक । धर्म रंक त्या गांवीं ॥ ध्रु ॥
न पिके भूमि कांपे भारें। मेघ वारें पीतील ॥ २ ॥
तुका ह्मणे अवघीं दुःखें। येती सुखें वस्तीसी ॥ ३ ॥

॥ ७९३ ॥

ऐसें[2] कलियुगाच्या मुळें। जालें धर्माचें वाटोळें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सांडुनियां रामराम। ब्राह्मण ह्मणती दोमदोम ॥ ध्रु ॥
शिर्वो नये तीं निळीं। वस्त्रें पांघरती काळीं ॥ २ ॥
तुका ह्मणे वृत्ति। सांडुनि गदा मागत जाती ॥ ३ ॥

॥ ७९४ ॥

अवघ्या पापें घडला एक । उपासक शक्तीचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्याचा विटाळ नको अंगा। पांडुरंगा माझिया ॥ ध्रु ॥
काम क्रोध मद्य अंगीं। रंगला रंगीं अवगुणी ॥ २ ॥
करितां पाप न धरी शंका। ह्मणे तुका कोणी ही ॥ ३ ॥

॥ ७९५ ॥

वारितां बळें धरितां हातीं। जुलुमें जाती नरकामधीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रंडीदासाप्रति कांहीं। उपदेश तो ही चालेना ॥ ध्रु ॥
जन्म केला वाताहात। थोर घात येठायीं[3] ॥ २ ॥
तुका ह्मणे पंढरीनाथा। तुझी कथा दूषीती ॥ ३ ॥

---

१ पं. उबेड.–२ पं. ऐका.–३ पं. ते ठायीं.

॥ ७१६ ॥

शाक्तांची शूकरी माय । विष्ठा खाय बिदींची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तिची त्या पडली[1] सवे । मागें धांवे ह्मणोनि ॥ ध्रु ॥
शाक्तांची गाढवी माय । भुंकत जाय वेसदारा ॥ २ ॥
तुका ह्मणे शिंदळीचे । बोलतां वाचे निंद्य ते ॥ ३ ॥

॥ ७१७ ॥

हरिहर सांडुनि देव । धरिती भाव क्षुल्लकीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐका त्यांची विटंबणा । देवपणा[2] भक्तांची ॥ ध्रु ॥
अंगीं कवडे घाली गळां । परडी कळाहीन हातीं ॥ २ ॥
गळां गांठा हिंडे दारीं । मनुष्य परी कुतरीं तीं ॥ ३ ॥
माथां सेंदुर दांत खाती । जेंगट हातीं सटवीचें ॥ ४ ॥
पूजिती[3] विकट दोंद । पशु सोंड गजाची ॥ ५ ॥
ऐशा छंदें चुकलीं वाटा । भाव[4] खोटा भजन ॥ ६ ॥
तुका ह्मणे विष्णुशिवा । वांचुनि देवा भजती ते[5] ॥ ७ ॥

॥ ७१८ ॥

कांद्यासाटीं जालें ज्ञान । तेणें जन नाडिलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काम क्रोध बुचबुची । भुंके पुची व्यालीची ॥ ध्रु ॥
पूजेलागीं द्रव्य मागे । काय सांगे शिष्यातें ॥ २ ॥
तुका ह्मणे कैंचें ब्रह्म । अवघा भ्रम विषयांचा ॥ ३ ॥

---

१ पं. लागली.—२ न. देवपणा त्या भक्तांची.—३ पं. पूजिती विकट दोंद तोंड.—४ त. भाव खोटा तें भजन.—५ त. तं. देहूच्या प्रतीत "तीं" असा पाठ होता तो चांगला होता, पण तो बदलून "ते" असा केला आहे.

॥ ७९९ ॥

सांडुनियां पंढरिराव । कवणातें ह्मणों देव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बहु लाज वाटे चित्ता । आणिकांतें देव ह्मणतां ॥ ध्रु ॥
सांडुनियां हिरा । कोणें वेचाव्या त्या गारा ॥ २ ॥
तुका ह्मणे हरिहर । ऐसीं सांडुनियां धुर ॥ ३ ॥

॥ ८०० ॥

बहुतें गेलीं वांयां । न भजतां पंढरीराया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करिती कामिकांची सेवा । लागोन मागोन खात्या देवा ॥ ध्रु ॥
अवघियांचा धनी । त्यासी गेलीं विसरोनि ॥ २ ॥
तुका ह्मणे अंतीं । पडती यमाचिया हातीं ॥ ३ ॥

॥ ८०१ ॥

असो आतां ऐसा धंदा । तुज गोविंदा आठवूं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रक्षिता तूं होसी जरी । तरि काय येरीं करावें ॥ ध्रु ॥
काया वाचा मन पायीं । राहे ठायीं करूं तें ॥ २ ॥
तुका ह्मणे गाइन गीतीं । रूप चित्तीं धरूनियां ॥ ३ ॥

॥ ८०२ ॥

नाहीं आह्मी विष्णुदास । करीत आस कोणांची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कां हे नष्ट करिती निंदा । नेणों सदा आमुची ॥ ध्रु ॥
असों[1] भलते ठायीं मनें । समाधानें आपुलिया ॥ २ ॥

---

१ पं. ऐसे.

तुका ह्मणे करूं देवा । तुझी सेवा धंदा तो ॥ ३ ॥

॥१३॥

॥ ८०३ ॥

पाखांडयांनीं पाठी पुरविला दुमाला । तेथें मी विठ्ठला काय बोलों ॥१॥

॥ ध्रु. ॥ कांद्याचा खाणार चोजवी कस्तुरी । ओपुलें भिकारी अर्थ नेणे ॥ ध्रु ॥

न कळे तें मज पुसती छळूनी । लागतां चरणीं न सोडिती ॥ २ ॥

तुझ्या पायांविण दुजें नेणें कांहीं । तूं चि सर्वांठायीं एक मज ॥ ३ ॥

तुका ह्मणे खीळ पडो त्यांच्या तोंडा । किती बोलों भांडां वादकांशीं ॥ ४ ॥

॥ ८०४ ॥

कलियुगीं कवित्व करिती पाषांड । कुशळ हे भांड बहु जाले ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ द्रव्य दारा चित्तीं प्रजांची आवडी । मुं[3]खें वडबडी कोरडा चि ॥ ध्रु ॥

दं[4]भ करी सोंग मानावया जग । मुखें बोले त्याग मनीं नाहीं ॥ २ ॥

वेदाज्ञे करोनि न करिती स्वहित । नव्हती अलिप्त देहाहुनी ॥ ३ ॥

तुका ह्मणे दंड सों[5]हील यमाचे । न करी जो वाचे बोले तैसें ॥ ४ ॥

॥ ८०५ ॥

विषयाचें सुख एथें वाटे गोड । पुढें अवघड यमदंड ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ मारिती तोडिती झोडिती निष्ठुर । यमाचे किंकर बहुसाल ॥ ध्रु ॥

अ[6]सिपत्रीं तरुवरखैराचे इंग[7]ळ । निघतील ज्वाळ तेलपाकीं ॥ २ ॥

---

१ पं. करूं.–२ पं. आपण.–३ पं. मुखीं वडवडी भलते चि.–४ दे. क. त. डंव.–५ दे. साहिले.–६ पं. असिपत्र तरुवर.–७ दे. पं. त. विंगळ

तप्तभूमीवरि लोळविती पाहीं । अग्निस्तंभ बाहीं कवळविती ॥ ३ ॥

ह्मणऊनि तुका येतो काकुलती । पुरे आतां याती गर्भवास ॥ ४ ॥

॥ ८०६ ॥

अल्प माझी मती । ह्मणोनि येतों काकुलती ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आतां दाखवा दाखवा । मज पाउलें केशवा ॥ ध्रु ॥

धीर माझ्या मना । नाहीं नाहीं नारायणा ॥ २ ॥

तुका ह्मणे दया । मज करा अभागिया ॥ ३ ॥

॥ ८०७ ॥

वाटुली पाहातां सिणले डोळुले । दाविसी पाउलें कैं[2] वो डोळां ॥ १ ॥

तूं माय माउली कृपेची साउली । विठ्ठले पाहिली वास तुझी ॥ २ ॥

तुका ह्मणे माझ्या आ[3]सावल्या बाह्या । तुज क्षेम द्यां[4]या पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ८०८ ॥

देह हा सादर पाहां[5]वा निश्चित । सर्व सुख एथें नाम आहे ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ब्रह्म जें देखणें द्वैत जेव्हां गेलें । शरीर तें जालें ब्रह्मरूप ॥ ध्रु ॥

यजन याजन तप व्रतें[6] करिती । विकल्पें नागवती शुद्ध पुण्यां[7] ॥ २ ॥

तुका ह्मणे सर्व सुख एथें आहे । भ्रांति दूर पाहें टाकुनियां ॥ ३ ॥

॥ ८०९ ॥

तुझे वर्णूं गुण ऐसी नाहीं मती । राहिल्या त्या श्रुती मौन्यपणें ॥ १ ॥

मौन्यपणें वाचा थोंटावल्या चारी । ऐसें तुझें हरी रूप आहे ॥ ध्रु ॥

रूप तुझें ऐसें डोळां न देखवे । जेथें हें झकवे ब्रह्मादिक ॥ २ ॥

---

१ पं. चालविती पायीं.—२ दे. त. कइं.—३ दे. असांवल्या.—४ क. देया. पं. द्येया.—
५ पं. पाहावया.— ६ क. त. व्रत.—७ पं. पुण्यें.

ब्रह्मादिकां[1] देवां[2] कर्माची कचाटी । ह्मणोनि आटाटी फार त्यांसी ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुझे गुण नाम रूप । आहेसी अमुप वाणूं कांई[3] ॥ ४ ॥

॥ ८१० ॥

मनवाचातीत तुझें हें स्वरूप । ह्मणोनियां माप भक्ति केलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भक्तीचिया मापें मोजितों अनंता । इतरानें तत्वता न मोजवे ॥ ध्रु ॥
योग याग तपें देहाचिया योगें । ज्ञानाचिया लागें न सांपडसी[4] ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी भोळ्या भावें सेवा । घ्यावी जी केशवा करितों ऐसी ॥ ३ ॥

॥ ८११ ॥

देवा ऐसा शिष्य देई । ब्रह्मज्ञानी निपुण पाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जो कां भावाचा आगळा । भक्तिप्रेमाचा पुतळा ॥ ध्रु ॥
ऐशा युक्ति ज्याला बाणे । तेथें वैराग्याचें ठाणें ॥ २ ॥
ऐसा जाला हो शरीरीं[5] । तुका लिंबलोण करी ॥ ३ ॥

॥ ८१२ ॥

जंव[6]वरी नाहीं देखिली पंढरी । तोंव[7]री वर्णिसी[8] थोरी वैकुंठींची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मोक्षसिद्धि तेथें हिंडे दारोदारीं । होऊनि कामारी दीनरूप ॥ ध्रु ॥
वृंदावन सडे चौक रंग माळा । अभिनव[9] सोहोळा घरोघरीं ॥ २ ॥
नामघोष कथापुराणकीर्तनीं । ओविया कांडणीं पांडुरंग ॥ ३ ॥
सर्व सुख तेथें असे सर्वकाळ । ब्रह्म तें केवळ नांदतसे ॥ ४ ॥

---

१ दे. क. त. ब्रह्मादिक.—२ दे. क. पं. देवा.—३ पं. काय—४ दे. क. सांपडेसी.—५ दे. शरीरि.—६ दे. त. जंव नाहीं.—७ पं. तंववरि.—८ त. वर्णिसील.—९ दे. त. पं. अभिन्नव.

तुका ह्मणे जें न साधे सायासें । तें हें प्रत्यक्ष दिसे विटेवरि ॥ ५ ॥

॥ ८१३ ॥

दुःख वाटे ऐसी ऐकों नये गोष्टी । जेणें घडे तुटी तुझ्या पायीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येतो कळवळा देखोनियां घात । करितां फजित नाइकती ॥ध्रु.॥
काय करूं देवा ऐसी नाहीं शक्ति । दंडुनि पुढती वाटे लावूं ॥ २ ॥
तुका ह्मणे मज दावूं नको ऐसे । दृष्टीपुढें पिसे पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ ८१४ ॥

शूकरासी विष्ठा मानें सावकास । मिष्टान्नाची त्यास काय गोडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेवी अभक्तांसी आवडे पाखांड । न लगे त्यां गोड परमार्थ ॥ध्रु.॥
श्वानासी भोजन दिलें पंचामृत । तरी त्याचें चित्त हाडावरि ॥ २ ॥
तुका ह्मणे सर्पा पाजिलिया क्षीर । वमितां विखार विष जालें ॥ ३ ॥

॥ ८१५ ॥

रासभ धुतला महा तीर्थांमाजी । नव्हे जैसा तेजी शामकर्ण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेवीं खळा काय केला उपदेश । नव्हे चि मानस शुद्ध त्याचें ॥ध्रु.॥
सर्पासी पाजिलें शर्करापीयूष । अंतरींचें विष जाऊं नेणे ॥ २ ॥
तुका ह्मणे श्वाना क्षिरीचें भोजन । सवें चि वमन जेवी तया ३ ॥

॥ ८१६ ॥

जेवीं नवज्वरें तापलें शरीर । लागे तया क्षीर विषातुल्य ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेवीं परमार्थ जीहीं दुराविला । तयालागीं झाला सन्निपात ॥ध्रु.॥
कामिनी जयाच्या जाहाली नेत्रासी । देखी तो चंद्रासी पीतवर्ण ॥ २ ॥

---

१ पं. ऐकोनियां. दे. एकोनियें. क. ऐकोनिये.—२ त. विषतुल्य.—३ दे. "कामिण." असें नवीन केलें आहे.

तुका ह्मणे मद्यपानाची आवडी । न रुचे त्या गोडी नवनीताची ॥ ३ ॥

॥ ८१७ ॥

आतां असों मना अभक्तांची कथा । न होई दुश्चिता हरिनामीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ नये त्याची कदा गोष्टी करूं मात । जिव्हे प्रायश्चित्त त्याच्या नांवें ॥ ध्रु ॥

प्रभातें न घ्यावें नांव माकडाचें । तैसें अभक्ताचें सर्वकाळ ॥ २ ॥

तुका ह्मणे आतां आठवूं मंगळ । जेणें सर्व काळ सुखरूप ॥ ३ ॥

॥ ८१८ ॥

नाम आठवितां सद्गदित कंठीं । प्रेम वाढे पोटीं ऐसें करीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ रोमांच जीवन आनंदाश्रु नेत्रीं । अष्टांग ही गात्रीं प्रेम तुझें ॥ध्रु

सर्व ही शरीर वेचो या कीर्तनीं । गाऊं निशिदिनीं नाम तुझें ॥ २ ॥

तुका ह्मणे दुजें न करीं कल्पांतीं । सर्वदा विश्रांति संतां पाईं ॥ ३ ॥

॥ ८१९ ॥

जननी हे जाणे बाळकाचें वर्म । सुख दुःख धर्म जें जें कांहीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ अंधापुढें जेणें दिधला आधार । त्याचा हा विचार तो चि जाणे ॥ ध्रु ॥

शरणागता जेणें घातलें पाठीशीं । तो जाणे तेविशीं राखों तया ॥ २ ॥

कासे लागे तया न लेगती सायास । पोहोणारा त्यास पार पावी ॥ ३ ॥

तुका ह्मणे जीव विठ्ठलाचे हातीं । दिला त्याची गति तो चि जाणे ॥ ४ ॥

॥ ८२० ॥

नका वांटूं मन विधिनिषेधांसी । स्मरावा मानसीं पांडुरंग ॥ १ ॥

---

१ त. आनंदाश्रू.—२ पं. लागती.

॥ ध्रु. ॥ खादलिया अन्ना मासी बोलों[1] नये । अवघें चि जाये एका घांसें ॥ ध्रु ॥

जोडी होते परी ते बहु कठिण । करितां जतन सांभाळावें ॥ २ ॥

तुका ह्मणे येथें न मना[2] विषाद । निर्वेविण व्याध तुटों नये ॥ ३ ॥

॥ ८२१ ॥

नको होऊं देऊं भावीं अभावना । या चि नांवें जाणा बहु दोष ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ मेघवृष्टि येथें होते अनिवार । जिव्हाळया[3] उखर लाभ नाड ॥ ध्रु ॥

उत्तमा विभागें कनिष्ठाची इच्छा । कल्पतरु तैसा फळे त्यासी ॥ २ ॥

तुका ह्मणे जिणें बहु थोडें आहे । आपुलिया पाहें पुढें बरें ॥ ३ ॥

॥ ८२२ ॥

त्याग तंव मज न वजतां केला । कांहीं च विठ्ठला मनांतूनि ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ भागलिया आला उबग सहज । न धरितां काज जालें मनीं ॥ ध्रु ॥

देह जड जालें ऋणाच्या आभारें । केलें संवसारें कासावीस ॥ २ ॥

तुका ह्मणे गेला आळसकिळस । अकर्तव्य दोष निवारले ॥ ३ ॥

॥ ८२३ ॥

मढें झांकुनियां करिती पेरणी । कुणबियाचे वाणी लवलाहें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तयापरी करीं स्वहित आपुलें । जयासी फावलें नरदेह ॥ ध्रु ॥

ओटीच्या परिस मुठीचें तें वाढे । यापरि कैवाडें स्वहिताचें ॥ २ ॥

---

१ दे. बोळों.—२ त. माना.—३ दे. जिव्हाळ्यां.

नाहीं काळसत्ता आपुलिये हातीं । जाणते हे गुंती उगविती ॥ ३ ॥
तुका ह्मणे पाहें आपुली सूचना । करितो शाहाणा मृत्युलोकीं ॥ ४ ॥

॥ ८२४ ॥

राजा चाले तेथें वैभव सांगातें । हें काय लागतें सांगावें त्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोणी कोणा एथें न मनी जी फुका । कृपेविण एका देवाचिया ॥ ध्रु ॥
शृंगारिलें नाहीं तगोंयेत वरि । उमटे लौकरि जैसें तैसें[2] ॥ २ ॥
तुका ह्मणे घरीं वसे नारायण । कृपेचीं ते खुण सौम्या[3] येते ॥ ३ ॥

॥ ८२५ ॥

वत्स पळे धेनु धांवे पाठीलागीं । प्रीतीचा तो अंगीं आविर्भाव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शिकविलें काय येईल कारणा । सूत्र ओढी मना आणिकांच्या ॥ ध्रु ॥
सांडिलें तें नाहीं घेत मेळवितां । ह्मणऊनि लाता मागें सारी ॥ २ ॥
तुका ह्मणे आग्रह करावा न लगे । सांगतसे अंगें अनुभव ॥ ३ ॥

॥ ८२६ ॥

देवाच्या संबंधें विश्व चि सोयरें । सूत्र ओढे दोरें एका एक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आहाच हें नव्हे विटायासारिखें । जवि जीवनीं देखें सामाक्लें ॥ ध्रु
आणिकांचें सुख दुःख उमटे अंतरीं । एथील इतरीं तेणें न्यायें ॥ २ ॥
तुका ह्मणे ठसावलें शुद्ध जाती । शोभा चि पुढती विशेषता ॥ ३ ॥

---

१ त. ती.–२ दे. तैतें.३– क. दिसों.४– दे. पं. क. त. आयुर्भाव.

॥ ८२७ ॥

अवघा वेंचलों इंद्रियांचे ओढी । जालें तें तें घडी निरोपिलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ असावा जी ठावा सेवेसी विचार । आपुला म्यां भार उतरिला ॥ ध्रु.॥
कायावाचामनें तो चि निजध्यास । एथें जालों ओस भक्तिभावें ॥ २ ॥
तुका ह्मणे करूं येईल धावणें । तरि नारायणें सांभाळावें ॥ ३ ॥

॥ ८२८ ॥

राहो आतां हें चि ध्यान । डोळां मन लंपटो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोंडकोंडुनि धरीन जीवें । देहभावें ओंवाळीन ॥ ध्रु. ॥
होईल येणें कळसा आलें । स्थिरावलें अंतरीं ॥ २ ॥
तुका ह्मणे गोजिरिया । विठोबा पायां पडों या ॥ ३ ॥

॥ ८२९ ॥

आदि मध्य अंत दाखविला दीपें । हा तों आपणापें यत्न बरा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दोसत्वें[1] दाविलें धन्याचें भांडार । तोंतों नव्हे सार एथुनियां ॥ ध्रु.॥
उपायानें सोस नासला सकळ । सत्ते[2] सत्ताबळ अंगा आलें ॥ २ ॥
तुका ह्मणे दृष्टि सकळांचे शिरीं । वचन चि करी बैसोनियां ॥ ३ ॥

॥ ८३० ॥

सौदविलें[3] वाण । पैस घातला दुकान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जें ज्या पाहिजे जे काळीं । आहे सिद्ध चि जवळी ॥ ध्रु. ॥
निवडिलें साचें । उत्तममध्यमकनिष्ठाचें ॥ २ ॥
तुका बैसला दुकानीं । दावी[4] मोला ऐसी वाणी ॥ ३ ॥

१ दे. क. त. दाशत्वें पं. दास्यत्वें. —२ त. सत्ये.—३ पं. सौटविला वान.—४ पं. मोला ऐसी दावि वानि.

॥ ८३१ ॥

लागलिया मुख स्तनां । घाली पान्हा माउली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उभयतां आवडी लाडें । कोडें कोड पुरतसे ॥ ध्रु ॥
मेळवितां अंगें अंग । प्रेमें रंग वाढतो ॥ २ ॥
तुका ह्मणे जड भारी । अवघें शिरीं जननीचे ॥ ३ ॥

॥ ८३२ ॥

अवगुण तों कोणीं[1] नाहीं प्रतिष्ठिले । मागें होत आले शिष्टाचार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दुर्बळाच्या नांवें पिटावा डांगोरा । हा तों[2] नव्हे बरा सत्यवाद ॥ ध्रु ॥
मद्य आणि मधु एकरासी नांवें । तरि कां[3] तें खावें आधारें त्या ॥ २ ॥
तुका ह्मणे माझा उच्छिष्ट प्रसाद । निवडी भेदाभेद वृष्टिन्यायें ॥ ३ ॥

॥ ८३३ ॥

भूतीं भगवंत । हां[*] तों जाणतों संकेत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भारी मोकलितों बाण । ज्याचा त्यासी कळे गुण ॥ ध्रु ॥
करावा उपदेश । निवडोनि तरि दोष ॥ २ ॥
तुका ह्मणे वांटे । चुकतां आडरानें कांटे ॥ ३ ॥

॥ ८३४ ॥

आह्मां हें कौतुक[4] जगा द्यावी नीत । करावे फजित चुकती ते ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कासयाचा बाध एकाच्या निरोपें । काय व्हावें कोपें जगाचिया ॥ ध्रु ॥

---

१ त. 'कोणी नाहीं' यांच्याबद्दल 'नाहीं कोणी.' पं. कांहीं नाहीं.–२ क. त. तो.–३ त. पं. 'कां तें' याबद्दल 'तें कां'.–४ दे. त. क. कवतुक.– * पं. हा शब्द नाहीं.

अविद्येचा येथें कोठें परिश्रम । रामकृष्णनाम ऐसे बाण ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें खऱ्याचा विकरा । न सरती येरा खोट्या परी ॥ ३ ॥

॥ ८३५ ॥

दर्पणासी नखेंटें लाजे । शुद्ध खिजे देखोनि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें अवगुणांच्या बाधें । दिसे सुदें विपरीत ॥ ध्रु ॥
अंधळ्यास काय हिरा । गारा चि तो सारिखा ॥ २ ॥
तुका ह्मणे भुंके सुनें । ठाया नेणे ठाव तो ॥ ३ ॥

॥ ८३६ ॥

नावडे तरि कां येतील हे भांड । घेउनियां तोंड काळें येथें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नासोनियां जाय रस यासंगती । खळाचे पंगती नारायणा ॥ ध्रु ॥
तोंडावाटा नर्क काढी अमंगळ । मिष्टान्ना विटाळ करी सुनें ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं संतांची मर्यादा । निंदे तो चि निंदा मायझवा ॥ ३ ॥

॥ ८३७ ॥

लेकरा आईतें पित्याची जतन । दावी निजधन सर्व जोडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्यापरि आमचा जालासे सांभाळ । देखिला चि काळ नाहीं आड ॥ ध्रु ॥
भुकेचे संनिध वसे स्तनपान । उपायाची भिन्न चिंता नाहीं ॥ २ ॥
आळवूनि तुका उभा पैलथडी । घातली या उडी पांडुरंगें ॥ ३ ॥

---

१ पं. नकटें,—२ दे. " सुणें " असें मागुन केलें आहे.

॥ ८३८ ॥

शुद्ध चर्या हें चि[*] संताचें पूजन । लागत चि धन नाहीं वित्त ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ सगुणाचे सोई सगुण विश्रांती । आपण चि येती चोजवीत ॥ ध्रु ॥

कीर्तनीं[1] चि वोळे कृपेचा वोरस । दुरीपणें वास संनिधता ॥ २ ॥

तुका ह्मणे वर्म सांगतों सेवंगें[2] । मन लावा लागें वहिताच्या ॥ ३ ॥

॥ ८३९ ॥

जीवींचें जाणावें या नांवें आवडी । हेंकड तें ओढी अमंगळ ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ चित्ताच्या संकोचें कांहीं च न घडे । अतिशयें वेडे चार ते[3] चि ॥ ध्रु ॥

काळाविण कांहीं नाहीं रुचों येत । करूनि संकेत ठेवियेला ॥ २ ॥

तुका ह्मणे कळे वचनें चांचणी । काय बोलवूनि वेळोवेळां ॥ ३ ॥

॥ ८४० ॥

कामातुर चवी सांडी । बरळ तोंडीं बरळे ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ रंगलें तें अंगीं दावी । विष देववी आसडे ॥ ध्रु ॥

धनसोसें लागे वेड । ते बडबड शमेना ॥ २ ॥

तुका ह्मणे वेसनें दोन्ही । नर्कखाणी भोगावया ॥ ३ ॥

॥ ८४१ ॥

कृष्णांजनें[4] जाले सोज्ज्वळ लोचन । तेणें दिले वान[5] निवडुनी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ निरोपाच्या मापें करी[6] लडबड । त्याचें त्यानें[7] गोड नारायणें ॥ ध्रु ॥

---

१ पं. कीर्तनेची.—२ त. सवंग.—३ दे. तो.—४ पं. कृष्णांजन.—५ पं. त. वाण.—६ पं. करीलबडबड दे. करीं.—७ प. त. तणे. * पं 'चि' हा शब्द नाहीं.

भाग्यवंतांघरीं करितां विश्वासें। कार्य त्यासरिसें होईजेतें ॥ २ ॥

तुका ह्मणे पोट भरे बेस्वोजा। निज ठाव निजा निजस्छानीं ॥ ३ ॥

८४२

मैंद आला पंढरीस। हातीं घेउनि प्रेमपाश ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ पुढें नाडियलें जग। नेतो लागों नेदी माग ॥ ध्रु ॥

उभारोनि बाहे। दृष्टादृष्टी वेधीताहे ॥ २ ॥

वैकुंठीहुनि येणें। केलें पंढरीकारणें ॥ ३ ॥

पुंडलिकें थारा। देउनि आणिलें या चोरा ॥ ४ ॥

तुका ह्मणे चला। तुह्मी आह्मी धरूं त्याला ॥ ५ ॥

॥ ८४३ ॥

भांडवी माउली कवतुकें बाळा। आपणा सकळां साक्षित्वेसीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ माझी माझी ह्मणे एकएकां मारी। हें तों नाहीं दुरी उभयतां ॥ ध्रु ॥

तुझें थोडें भातें माझें बहु फार। छंद करकर वाद मिथ्या ॥ २ ॥

तुका ह्मणे एके ठायीं आहे वर्म। हें चि होय श्रम निवारितें ॥ ३ ॥

॥ ८४४ ॥

लटकियांची आशा। होतों पडिलों वळसा।

होउनियां दोषा। पात्र मिथ्या अभिमानें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ बरवी उघडली दृष्टी। नाहीं तरी होतों कष्टी।

आक्रंदते सृष्टी। मात्र या चेष्टांनीं ॥ ध्रु ॥

---

१ पं. कार्ये.—२ दे. क. आणिलें चोरा.—३ पं. एकमेका.—४ दे. लटिकियाच्या. पं. लटिक्याच्या.

मरणाची नाहीं शुद्धी । लोभीं प्रवर्तली बुद्धी ।
परती तों कधीं । घडे चि ना माघारीं ॥ २ ॥
सांचूनि मेरे धन । लावी पोरांसी भांडण ।
नाहीं नारायण । तुका ह्मणे स्मरीला ॥ ३ ॥

॥ ८४५ ॥

जवळी मुखापाशीं । असतां नेघे अहर्निशीं[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भवनिर्दाळण नाम । विठ्ठल विठ्ठल नासी काम ॥ ध्रु ॥
सुखाचें शेजार । करूं कां नावडे घर ॥ २ ॥
तुका ह्मणे ठेवा । कां हा न करी चि बरवा ॥ ३ ॥

॥ ८४६ ॥

बरवें देशोवर[2] जालें । काय बोलें बोलावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लाभें लाभ दुणावला । जिव धाला दर्शनें[3] ॥ ध्रु ॥
भाग्यें जाली संतभेटी । आवडी पोटीं होती ते ॥ २ ॥
तुका ह्मणे श्रम केला । अवघा आला फळासी ॥ ३ ॥

॥ ८४७ ॥

सांगतां हें नये सुख । कीर्तीं मुख न पुरे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आवडीनें सेवन करूं । जीवींचें धरूं जीवीं च ॥ ध्रु ॥
उपमा या देतां लाभा । काशा शोभा सारिखी ॥ २ ॥
तुका ह्मणे नुचलीं डोई । ठेविली पायीं संतांचे ॥ ३ ॥

---

१ दे. आहिर्नेसी. पं, अहिर्णिसी. त. आहीर्णीसी.–२ दे. त. पं. देशाउर.–३ दे. त. दरुषणें.

॥ ८४८ ॥

[१]आपुलाला लाहो करूं । केणें भरूं हा विठ्ठल ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भाग्य पावलों या ठाया । आतां काया कुरवंडी ॥ ध्रु ॥
[२]पुढती कोठें घडे ऐसें । बहुतां दिसें फावलें ॥ २ ॥
तुका ह्मणे जाली जोडी । चरण घडी न [३]विसंबें ॥ ३ ॥

॥ ८४९ ॥

उजळलें भाग्य आतां । अवघी चिंता वारली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संतदर्शनें हा लाभ । पद्मनाभ जोडला ॥ ध्रु ॥
संपुष्ट [४]हा ह्रदयपेटी । करूनि पोटीं सांटवूं ॥ २ ॥
तुका ह्मणे होता ठेवा । तो या भावा सांपडला ॥ ३ ॥

॥ ८५० ॥

[५]आह्मां आपुलें नावडे संचित । [६]चरफडे चित्त कळवळ्यानें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न कळतां जाला [७]खोळंब मारगा । जगीं जालों जगा बहुरूपी ॥ध्रु॥
कळों आलें बरें उघडले डोळे । कर्णधार मिळे तरि बरें ॥ २ ॥
तुका ह्मणे व्हाल ऐकत करुणा । तरि नारायणा उडी घाला ॥ ३ ॥

॥ ८५१ ॥

बरगासाटीं खादलें शेण । मिळतां अन्न न संडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ फजित तो केला लाहे । ताडण साहे गौरव ॥ ध्रु ॥
ओढाळाची ओंगळ ओढी । उगी खोडी नवजाय ॥ २ ॥
तुका फजीत करी [८]बुच्या । विसरे कुच्या खोडी तेणें ॥ ३ ॥

---

१ पं. आपुला लाहो.–२ दे. त. पुडती.–३ दे. क. विसंभें.–४ पं. हे.–५ त. आह्मांसी आपुलें नावडे स्वहित.–६ दे. त. पं. चरफडी –७ पं. खोळंबा.–८ पं. बुका.

॥ ८५२ ॥

धांव घालीं आई । आतां पाहातेसी काई ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धीर नाहीं माझे पोटीं । जालें वियोगें हिंपुटी[1] ॥ ध्रु॰ ॥
करावें सीतळ । बहु जाली हळहळ ॥ २ ॥
तुका ह्मणे डोई । कधीं ठेवीन हे पायीं ॥ ३ ॥

॥ ८५३ ॥

तुह्मां ठावा होता देवा । माझे अंतरींचा हेवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होती काशानें सुटका । तरि हे वैकुंठनायका ॥ ध्रु॰ ॥
नसतें सांभाळिलें । जरि तुह्मीं आश्वासिलें ॥ २ ॥
तुका ह्मणे कृपाळुवा । बरवा केला सावाधावा ॥ ३ ॥

॥ ८५४ ॥

देऊं ते उपमा । आवडीनें पुरुषोत्तमा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाहातां काशा तूं सारिखा । तिहीं लोकांच्या जनका ॥ ध्रु॰ ॥
आरुष हे वाणी । गोड करूनि घेतां कानीं ॥ २ ॥
आवडीनें खेळे । तुका पुरेवावे सोहाळे[3] ॥ ३ ॥

॥ ८५५ ॥

दर्शनाची आस । आतां न साहे उदास ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जीव आला पायांपाशीं । येथें असें कलिवरेंसीं ॥ ध्रु॰ ॥
कांहीं च नाठवे । ठायीं बैसलें नुठवे[4] ॥ २ ॥
जीव असतां पाहीं । तुका ठकावला ठायीं ॥ ३ ॥

---

१ दे. हिपुटीं.—२ पं. फुकाचे.—३ दे. पं. सोह्याळे.—४ पं. नुठावे.

॥ ८५६ ॥

भोगावरि आह्मीं घातला पाषाण । मरणा मरण आणियेलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विश्व तूं व्यापक काय मी निराळा । काशासाठीं बळा येऊं आतां ॥ ध्रु. ॥
काय सारूनियां काढावें बाहेरी । आणूनि भितरी काय ठेवूं ॥ २ ॥
केला तरि उरे वाद चि कोरडा । बळें घ्यावी पीडा स्वपनींची ॥ ३ ॥
आवघे चि वाण आले तुह्मां घरा । मजुरी मजुरा रोज कीर्दी ॥ ४ ॥
तुका ह्मणे कांहीं नेणें लाभ हानी । असेल तो धनी राखो वाडा ॥ ५ ॥

॥ ८५७ ॥

कां हो एथें काळ आला आह्मां आड । तुह्मांपाशीं नाड करावया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कां हो विचाराचें पडिलें सांकडें । काय ऐसें कोडें उपजलें ॥ ध्रु. ॥
कां हो उपजेना द्यावी ऐशी भेटी । काय द्वैत पोटीं धरिलें देवा ॥ २ ॥
पाप फार किंवा जालासी दुर्बळ । मागिल तें बळ नाहीं आतां ॥ ३ ॥
काय जालें देणें[2] निघालें दिवाळें । की बांधलासि बळें ऋणेंपायीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे कां रे ऐसी केली गोवी । तुझी माझी ठेवी निवडुनियां ॥ ५ ॥

॥ ८५८ ॥

काय देह घालूं करवती कर्मरी[3] । टाकूं या भितरी अग्नीमाजी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय सेवूं वन शीत उष्ण तान[4] । साहों कीं मोहन[5] धरूनी बैसों ॥ ध्रु. ॥
काय लावूं अंगीं भस्म उधळण । हिंडूं देश कोण खुंट चारी ॥ २ ॥

---

१ त. कीर्ती.—२ पं. नेणें.—३ दे. करमरी.—४ पं. ताहान.—५ पं. मौन.

काय त्यजूं[1] अन्न करूनि उपास । काय करूं नास जीवित्वाचा ॥ ३ ॥
तुका ह्मणे काय करावा उपाव[2] । ऐसा देईं भाव पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ८५९ ॥

दंभें कीर्ति पोट भरे मानी जन । स्वहित कारण नव्हे कांहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंतरती तुझे पाय मज दुरी । धरितां हे थोरी जाणिवेची ॥ ध्रु ॥
पिंडाच्या पाळणें धांवती विकार । मज दावेदार मजमाजी ॥ २ ॥
कैसा करूं घात आपुला आपण । धरूनि गुमान लोकलाज ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज दावी तो सोहळा[3] । देखें पाय डोळां तुझे देवा ॥ ४ ॥

॥ ८६० ॥

धिग जिणें[4] त्याचा स्वामी हीन वर । मरण तें वर[5] भलें मग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आइका[6] जी देवा ऐसी आहे नीत । काय तें उचित सांभाळावें ॥ ध्रु ॥
देशोदेशीं धाक जयाच्या उत्तरें । तयाचें कुतरें परि भलें ॥ २ ॥
तुका म्हणे हें कां सुचलें उत्तर । जाणोनि अंतर ओळखावें ॥ ३ ॥

॥ ८६१ ॥

आतां गाऊं[7] तुज ओविया मंगळी[8] । करूं गदारोळी हरिकथा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होसि निवारिता आमुचें सकळ । भय तळमळ पापपुण्य ॥ ध्रु ॥
भोगिले भोग लावूं तुझे अंगीं । अलिप्त या जगीं होउनि राहों ॥ २ ॥
तुका ह्मणे ह्मी लाडिकीं लेंकरें । न राहों अंतरें[9] पायांविण ॥ ३ ॥

---

१ दे. क. त. तजूं.–२ पं. उपाय.–३ दे. त. सोहेळा.–४ पं. त. जीणें.–५ दे. बर. पं. बरें –६ दे. ऐका जी.–७ पं. तुज गाऊं.–८ दे. मंगळीं –९ दे. त. पं. अंतरे.

॥ ८६२ ॥

सर्व सुखें आजी एथें चि वोळलीं । संतांचीं देखिलीं चरणांबुजें ॥ १ ॥
सर्वकाळ होतों आठवीत मनीं । फिटली ते धणी येणें काळें ॥ २ ॥
तुका ह्मणे वाचा राहिली कुंटित । पुढें जालें चित्त समाधान ॥ ३ ॥

॥ ८६३ ॥

विठ्ठल सोयरा सज्जन सांगाती । विठ्ठल या चित्तीं बैसलासे ॥ १ ॥
॥ धु. ॥ विठ्ठलें हें अंग व्यापिली ते काया । विठ्ठल हे[1] छाया माझी मज ॥ ध्रु ॥
बैसला विठ्ठल जिव्हेचिया माथां । न वदे अन्यथा आन दुजें ॥ २ ॥
सकळां इंद्रियां मन एक प्रधान । तें ही करी ध्यान विठोबाचें ॥ ३ ॥
तुका ह्मणे या विठ्ठलासी आतां । नये विसंबतां माझें मज ॥ ४ ॥

॥ ८६४ ॥

होय[3] वारकरी । पाहें पाहें रे पंढरी ॥ १ ॥
॥ धु. ॥ काय करावीं साधनें । फळ अवघें चि तेणें ॥ ध्रु ॥
अभिमान नुरे । कोड अवघें चि पुरे ॥ २ ॥
तुका ह्मणे डोळां । विठो[4] बैसला सांवळा ॥ ३ ॥

॥ ८६५ ॥

पंढरीसी जाय । तो विसरे बापमाय ॥ १ ॥
॥ धु. ॥ अवघा होय पांडुरंग । राहे धरूनियां अंग ॥ ध्रु ॥
न लगे धन मान । देहभावें उदासीन ॥ २ ॥

---

१ त. ही.—२ पं. तुका ह्मणे या हो विठलासी आवा. त. तुका ह्मणे या विठोबासी आतां.—
३ पं. होय होय. दे. होयं वारेकरी पांहें पांहें रे०.—४ पं. विठु. त. विठल.

तुका ह्मणे मळ । नासी तात्काळ तें स्थळ ॥ ३ ॥

॥ ८६६ ॥

बळें बाह्यात्कारें संपादिलें सोंग । नाहीं जाला त्याग अंतरींचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें येतें नित्य माझ्या अनुभवा । मनासी हा ठावा समाचार ॥ ध्रु. ॥
जागृतीचा नाहीं अनुभव स्वप्नीं । जातों विसरूनि सकळ हें ॥ २ ॥
प्रपंचाबाहेरि नाहीं आलें चित्त । केले करी नित्य वेवेसाय ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज भोरप्या चि परी । जालें सोंग वरी आंत तैसें ॥ ४ ॥

॥ ८६७ ॥

ह्मणवितों दास ते नाहीं करणी । आंत वरी दोन्ही भिन्न भाव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गातों नाचतों तें दाखवितों जना । प्रेम नारायणा नाहीं अंगीं ॥ ध्रु. ॥
पाविजे तें वर्म न कळे चि कांहीं । बुडालों या डोहीं दंभाचिया ॥ २ ॥
भांडवल काळें हातोहातीं नेलें । माप या लागलें आयुष्यासी ॥ ३ ॥
तुका ह्मणे वांयां गेलों ऐसा दिसें । होईल या हांसें लौकिकाचें ॥ ४ ॥

॥ ८६८ ॥

न कळतां काय करावा उपाय । जेणें राहे भाव तुझ्या पायीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येऊनियां वास करिसी ह्रुदयीं । ऐसें घडे कई कासयानें ॥ ध्रु. ॥
साच भावें तुझें चिंतन मानसीं । राहे हें करिसी कैं गा देवा ॥ २ ॥
लटिकें हें माझें करूनियां दुरी । साच तूं अंतरीं येउनि राहें ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज राखावें पतिता । आपुलिया सत्ता पांडुरंगा ॥ ४ ॥

---

१ क. नाहीं. २ पं. वेवसाव.

॥ ८६९ ॥

चिंतिलें तें मनिंचें जाणे । पुरवी[1] खुणे अंतरींचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रात्री न कळे दिवस न कळे । अंगीं खेळे दैवत हें ॥ ध्रु ॥
नवसियाचे नव रस । भोगी त्यास भिन्न नाहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे सम चि देणें । समचरण उभा असे ॥ ३ ॥

॥ ८७० ॥

उद्धाराचा[2] संदेह नाहीं । याचा कांहीं सेवकां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पांडुरंग अभिमानी । जीवदानी कोंवसा ॥ ध्रु ॥
बुडतां जळीं जळतां अगीं । ते प्रसंगीं राखावें ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मांसाटीं । कृपा पोटीं वागवी ॥ ३ ॥

॥ ८७१ ॥

काय विरक्ति[3] कळे आह्मां । जाणों एका नामा विठोबाच्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाचों[4] सुखें वैष्णवमेळीं । टाळघोळीं आनंदें ॥ ध्रु ॥
शांति क्षमा दया मी काय जाणें । गोविंद कीर्तनेंवांचूनियां ॥ २ ॥
*कासया उदास असों देहावरी । अमृतसागरीं बुडोनियां ॥ ३ ॥
कासया एकांत सेवूं तया वना । आनंद तो जनामाजी असे ॥ ४ ॥
तुका[5] ह्मणे आह्मां ऐसा भरवसा । विठ्ठल सरसा चालतसे ॥ ५ ॥

---

१ पं. पुरवी नवस.—२ दे. त. क. उधाराचा.—३ त. काय विरक्ति ते.—४ क. नाचों सुख. पं. नाचों प्रेमसुखें वैष्णवांचे मेळीं । दिंडी टाळघोळीं आनंदें या ॥ त. नाचो पै सुख वैष्णवमळी । सदा टाळघोळीं आनंदेंसी.—५ पं. तुका ह्मणे मज आहे हा भरवसा । * क. हें कडवें नाहीं, व पं. " कासया एकांत " याच्या मागून आहे.

॥ ८७२ ॥

जेथें वैष्णवांचा वास । धन्य भूमी पुण्य देश ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दोष नाहीं ओखदासी । दूत सांगे[1] यमापाशीं ॥ ध्रु ॥
गरुडटकयांच्या[2] भारें । भूमि गर्जे जयजयकारें[3] ॥ २ ॥
सहज तयां जनां छंद । वाचे गोविंद गोविंद ॥ ३ ॥
तुळसीवनें रंगमाळा । अवघा वैकुंठसोहळा ॥ ४ ॥
तुका ह्मणे भेणें । काळ नये तेणें राणें ॥ ५ ॥

॥ ८७३ ॥

माझ्या* विठोबाचा कैसा प्रेमभाव । आपण चि देव होय गुरु ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पढियें देहभावें पुरवितो वासना । अंतीं तें आपणापाशीं न्यावें ॥ध्रु ॥
मागें पुढें उभा राहे सांभाळीत । आलिया आघात निवारावे ॥ २ ॥
योगक्षेम त्यांचें[4] जाणे जडभारी । वाट दावी करीं धरूनियां ॥ ३ ॥
तुका ह्मणे नाहीं विश्वास ज्या मनीं । पाहावें पुराणीं विचारूनी ॥ ४ ॥

॥ ८७४ ॥

सकळ धर्म मज विठोबाचें नाम । आणीक तें वर्म नेणें कांहीं ॥ १ ॥
काय जाणों संतां निरविलें देवें । करिती या भावें कृपा मज ॥ २ ॥
तुका ह्मणे माझा कोण अधिकार । तो मज विचार कळों यावा ॥ ३ ॥

---

१ त. सागती .–२ पं. गरुडटकियांच्या.–३ दे. त. जेजेकारें.–४ दे. त्यांचें पं. त्यांचा.

* या व मागील अभंगांच्या मध्यें " तुका सज्जन तिनसूं कहियें । जीनथें प्रेम दुनाये । दुर्जन तेरा मुख काला । थीता प्रेम घटाये " हा दोहरा दे. क. पाठांत आहे.

॥ ८७५ ॥

उदंड शाहाणे होतें[1] तर्कवंत । पैरि[2] या नेणवे अंत विठोबाचा ॥ १ ॥
उदंडों[3] अक्षरां करोत भरोवरी । पैरि[4] ते नेणवे थोरी विठोबाची ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं भोळेपणाविण । जाणीव ते[5] सिण रितें माप ॥ ३ ॥

॥ ८७६ ॥

आधारावांचुनी । काय सांगसी[6] काहाणी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ठावा नाहीं पंढरीराव । तोंवरी अवघें चि वाव ॥ ध्रु ॥
मानिताहे कोण । तुझें कोरडें ब्रह्मज्ञान ॥ २ ॥
तुका ह्मणे ठेवा । जाणपण एक सवा ॥ ३ ॥

॥ ८७७ ॥

अनाथांची तुह्मां दया । पंढरीराया येतसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसी ऐकोनियां कीर्ति । बहु विश्रांति पावलों ॥ ध्रु ॥
अनाथांच्या धांवा घरा । नामें करा कुडावा ॥ २ ॥
तुका ह्मणे सवघड हित । ठेवूं चित्त पायांपें ॥ ३ ॥

॥ ८७८ ॥

येथें नाहीं उरों आले अवतार । येर ते पामर जीव किती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विषयांचे झणी व्हाल लोलिंगत । चेवलिया अंत न लगे मज ॥ ध्रु ॥
वाहोनियां भार कुंथसील ओझे तें चि माझें थीता त्याग ॥ २ ॥
तुका ह्मणे कैसी नाहीं त्याची लाज । संतीं केशीराज साधियेला ॥ ३ ॥

---

१ पं. होती.–२ पं. परी नेणवे चि०.–३ पं. उदंड अक्षरे.–४ पं. परी नेणवे चि०.५ क. त. पं. तो.–६ क. सांगशील.

॥ ८७९ ॥

हीं च त्यांचीं पंचभूतें । जीवन भातें प्रेमाचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कळवळा धरिला संतीं । ते निगुती कैवाड ॥ ध्रु ॥
हा च काळ वर्तमान । साधन ही संपत्ती ॥ २ ॥
तुका ह्मणे दिवसरातीं । हें चि खाती अन्न ते ॥ ३ ॥

॥ ८८० ॥

दीप न देखे अंधारा । आतां हें चि करा जतन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नारायण नारायण । गांठी धन बळकट ॥ ध्रु ॥
चिंतामणिपाशीं चिंता । तत्वता ही नयेल ॥ २ ॥
तुका ह्मणे उभयलोकीं । हे चि निकी सोमग्री ॥ ३ ॥

॥ ८८१ ॥

धन्य काळ संतभेटी । पायीं मिठी पडिली तो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संदेहाची सुटली गांठी । जालें पोटीं शीतळ ॥ ध्रु ॥
भवनदीचा जाला तारा । या उत्तरा प्रसादें ॥ २ ॥
तुका ह्मणे मंगळ आतां । कोण दाता याहूनि ॥ ३ ॥

॥ ८८२ ॥

दिनरजनीं हा चि धंदा । गोविंदाचे पवाडे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संकल्पिला देह देवा । सकळ हेवा तये ठायीं ॥ ध्रु ॥
नाहीं अवसान घडी । सकळ जोडी इंद्रियां ॥ २ ॥
कीर्ति मुखें गर्जे तुका । करी लोकां सावध ॥ ३ ॥

---

१ पं. सत्वता.—२ दे. त. पं. सामोग्री.—३ त. उतारा.

॥ ८८३ ॥

खरें नानवट निक्षेपीचें[१] जुनें । काढिलें ठेवणें समर्थाचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मजुराच्या हातें मापाचा उकल । मी तों येथें फोल सत्ता त्याची ॥ ध्रु ॥
कुलाळाच्या[२] हातें घटाच्या[३] उत्पत्ति । पाठवी त्या जाती पाकस्थळा ॥२॥
तुका ह्मणे जीवन तें नारायणीं । प्रभा जातें[४] कीर्णीं प्रकाशाची ॥ ३ ॥

॥ ८८४ ॥

गंगेचिया अंतीविण[५] काय चाड । आपुलें तें कोड तृषेपाशीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विठ्ठल हे मूर्ति साजिरी सुंदर । घालीं[६] निरंतर ह्रदयपुटीं ॥ ध्रु ॥
कारण तें असे नवनीतापाशीं । गबाळ तें सोसी इतर कोण ॥ २ ॥
बाळाचे सोईतें घांस घाली माता । अट्टाहास[७] चिंता नाहीं तया ॥ ३ ॥
गाऊं नाचों करूं आनंदसोहळा । भाव चि आगळा[८] नाहीं हातां[९] ॥ ४ ॥
तुका ह्मणे अवघें जालें एकमय । परलोकींची काय चाड आतां ॥ ५ ॥

॥ ८८५ ॥

स्त्रीपुत्रादिकीं राहिला आदर । विषयीं पडिभर अतिशय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां सोडवणें[५] धांवा नारायणा । मज हे वासना अनावर ॥ ध्रु ॥
येउनियां आड ठाके लोकलाज । तें हें दिसे काज अंतरलें ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मां जेथें जेथें गोवा । तेथें तुह्मीं देवा सांभाळावें ॥ ३ ॥

---

१ दे. त. निक्षुपीचें.–२ क. पं. कुल्लाळाच्या.–३ पं. घटाची.–४ क. "प्रभा जाते" याच्याबद्दल "प्रभाते."–५ पं. अंतेविण.–६ पं. घालूं.–७ दे. त. आटाहास.–८ पं. वेगळा नाहीं आतां. त. नाहीं हांता.–९ दे. त. हाता–५ पं. सोडवण्या.

॥ ८८६ ॥

पडिलों भोवनीं । होतों बहु चिंतवनी ॥ १ ॥
॥ धु. ॥ होतों चुकलों मारग । लाहो केला लागें वेगें ॥ धृ ॥
इंद्रियांचे संदी । होतों सांपडलों बंदीं ॥ २ ॥
तुका ह्मणे बरें जालें । विठ्ठलसें वाचे आलें ॥ ३ ॥

॥ ८८७ ॥

बरें जालें आलीं ज्याचीं त्याच्या घरा ।
चुकला पांऱ्हेरा ओढाळांचा. ॥ १ ॥
॥ धु. बहु केलें दुखी त्यांचिया सांभाळें ।
आतां तोंड काळें तेणें लोभें ॥ धृ ॥
त्यांचिया अन्यायें भोगों माझें अंग ।
सकळ ही लाग द्यावा लागे ॥ २ ॥
नाहीं कोठें स्थिर राहों दिलें क्षण ।
आजिवरी सिण पावलों तो ॥ ३ ॥
वेगळाल्या खोडी केली तडातडी । सांगावया घडी नाहीं सुख ॥ ४ ॥
निरवूनि तुका चालिला गोवारें । देवापाशीं भार सांडवूनि ॥ ५ ॥

॥ ८८८ ॥

न करावी आतां पोटासाटीं चिंता । आहे त्या संचिता भार लावूं ॥ १ ॥
॥ धु. ॥ दृष्टि ते घालावी परमार्थाठायीं । क्षुल्लका उपायीं सिण जाला ॥ धृ ॥

---

१ दे. क. भोवणीं.—२ दे. क. चिंतवणी.—३ पं. वेग.—४ क. पान्हेरा.—५ क. भोग.

येथें तंव नाहीं घेइजेसें सवें । कांहीं नये जीवें वेचों मिथ्या ॥ २ ॥
खंडणें चि नव्हे उद्वेगें[1] वेरझारीं । बापुडे संसारीं सदा असों ॥ ३ ॥
शेवटा पाववी नावेचें[2] बैसणें । भुजाबळें कोणें कष्टी व्हावें ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां सकळांचें सार । करावा व्यापार तरी ऐसा ॥ ५ ॥

॥ ८८९ ॥

आमच्या हें आलें भागा । जिव्हार[3] या जगाचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धरूनियां ठेलों जीवें । बळकट भावें एकविध ॥ ध्रु ॥
आणूनियां केला रूपा । उभा सोपा जवळी ॥ २ ॥
तुका ह्मणे अंकित केला । खालीं आला वचनें ॥ ३ ॥

॥ ८९० ॥

खरें भांडवल सांपडलें गांठी । जेणें नये तुटी उदमासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संवगाचें[4] केणें सांपडलें घरीं । भरूनि वैखरी सांटविलें ॥ ध्रु॥
घेतां देतां लाभ होतसे सकळां । सदेवां[6] दुर्बळा भाव तैसा ॥ २ ॥
फडा आलिया तो न वजे निरासे । जरि कांहीं त्यास न कळतां ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां जालीसे निश्चिती । आणीक तें चित्तीं न धरूं दुजें ॥ ४ ॥

॥ ८९१ ॥

पदोपदीं दिलें अंग । जालें सांग कारण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रुधवूनि ठेलों ठाव । जागा वाव सकळ ॥ ध्रु ॥
पुढती चाली मनालाहो । वाढे देहो संतोष ॥ २ ॥

---

१ पं. उद्योग.—२ दे. नावेचें बैसनें. क. नावचें बैसोनें.—३ दे. क. त. जीव्हार.—४ दे. क. पं. संवगाचें —५ त. पं. माप केलें.—६ पं. सदेव. त. सदेवां दुर्बळां लाभ तैसा.

तुका ह्मणे क्षरभागीं । जालों जगीं व्यापक ॥ ३ ॥

॥ ८९२ ॥

निवडुनि दिलें नवनीत । संचित ते भोगीत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां पुढें भावसार[1] । जीवेंना थार[2] पाहावया ॥ ध्रु ॥
पारखियाचे पडिलें[3] हातीं । चांचपती आंधळीं ॥ २ ॥
तुका ह्मणे सेवन घडे । त्यासी जोडे लाभ हा[4] ॥ ३ ॥

॥ ८९३ ॥

उचित न कळे इंद्रियाचे ओढी । मुखें बडबडी शिकलें तें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपण जाऊन न्यावीं[5] नरकास । बळें बेताळीस कुळें जग ॥ ध्रु ॥
अबोलणें बोले डोळे झांकुनियां । बडबडी वांयां दंभासाटीं ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी तेथील पारखी । नाचे देखोवेखीं जाणों खरें ॥ ३ ॥

॥ ८९४ ॥

एक मन तुझ्या अवघ्या भांडवला । वांटितां तें तुला येई[6] कैसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणउनि दृढ धरीं पांडुरंग । देहा लावीं संग प्रारब्धाचा ॥ ध्रु ॥
आणिका संकल्पा नको गोऊं मन । तरी च कारण साध्य होय ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसें जाणावें उचित । तरी सहज स्थित येईल कळों ॥ ३ ॥

॥ ८९५ ॥

गावे ह्मणउनि गीत । धरुनि राहे तैसें चित्त ॥ १ ॥

---

१ पं. भवसार.—२ त. जीव थार.—३ त. पडिलों.—४ त. हा लाभ.—५ त. न्यावें आणिकांस. पं. न्यावें नरकास.—६ त. पं. येईल.

॥ ध्रु. ॥ हें चि थोर अवघड आहे । अन्न देखोनि भूक राहे ॥ छ ॥
ऐकावी लुण कथा । राहे तैसें धरूनि चित्ता ॥ २ ॥
तुका ह्मणे धणी । नव्हे जेविल्यावांचुनि ॥ ३ ॥

॥ ८९६ ॥

कळेल हे खुण । तरि दावी नारायण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सत्य संतांपाशीं राहे । येरां भय आड आहे ॥ छ ॥
अणुंचिया[3] ऐसें । असे भरलें प्रकाशें ॥ २ ॥
इंद्रियांचे धनी । ते हे जाती समजूनि ॥ ३ ॥
तर्क कुतर्क वाटा । नागवण घटापटा ॥ ४ ॥
तुका ह्मणे ल्यावें । डोळां अंजन बरवें ॥ ५ ॥

॥ ८९७ ॥

जातो न येतिया वाटा । काय निरवितो करंटा ॥ १ ॥ ध्रु. ॥
कैसा जालासे बेश्रम । लाज नाहीं न ह्मणे राम ॥ छ ॥
पाहे वैरियाकडे । डोळे वासुनियां रडे ॥ २ ॥
बांधुनियां यमा हातीं । दिलें[4] नाहीं त्याची खंती ॥ ३ ॥
नाहीं यांचें काम । ऐसें जाणे तो अधम ॥ ४ ॥
अझुन तरि मुका । कां रे जालासि ह्मणे तुका ॥ ५ ॥

॥ ८९८ ॥

वांटा घेई लवकरि । मागें अंतरसी दुरी ।
केली भरोवरी । सार नेती आणिक ॥ १ ॥

---

१ पं. ह्मणे.–२ पं. कळेल.–३ दे. त. अनुचिया.–४ पं. दिलें.

॥ ८९८ ॥

॥ ध्रु. ॥ ऐसीं भांबावलीं किती । काय जाणों नेणों किती ।
समय नेणती । माथां भार वाहोनि ॥ ध्रु ॥
नाहीं सारिलें तोंवरी । धांव घेई वेग करीं ।
घेतलें पदरीं । फावलें तें आपुलें ॥ २ ॥
फट लंडी ह्मणे तुका । एक न साहावे धका ।
तरि च या सुखा । मग कैसा पावसी ॥ ३ ॥

॥ ८९९ ॥

चालावा पंथ तो पाविजे त्या ठाया । ऐकिल्या वांयां वारता त्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐका जी वोजे पडतसें पायां । भावाचि तें जायावाट नव्हे ॥ ध्रु ॥
व्याली कुमारीचा अनुभवें अनुभव । सांगतां तो भाव येत नाहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें पाहिजे आराले । बिंबीं निवळलें तरि भासे ॥ ३ ॥

॥ ९०० ॥

काय नाहीं लवत झाडें । विसरे वेडें देहभाव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जया न फळे उपदेश । धस ऐसा त्या नांवें ॥ ध्रु ॥
काय नाहीं असत जड । दगड तो अबोलणा ॥ २ ॥
तुका ह्मणे कुचर दाणा । तैसा ह्मणा डेंग हा ॥ ३ ॥

॥ ९०१ ॥

देखीचा दिमाख शिकोनियां दावी । हिऱ्या ऐसी केवीं गारगोटी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मर्यादा ते जाणं अरे अभागिया । देवाच्या ऐसिया सकळ मूर्ति ॥ ध्रु ॥

---

१ हे. भांमावलीं.—२ पं. मिती—३ त. पं. आइकिल्या.—४ पं. बिंब.—५ जाणा.६— पं. जाणें.

काय पडिलेंसी लटिक्याचे भरी । वोंवाळुनि थोरी परती सांडीं ॥ २ ॥
तुका ह्मणे पुढें दिसतसे घात । करितों फजित ह्मणउनी ॥ ३ ॥

॥ १०२ ॥

संसाराचा[1] माथां भार । कांहीं पर न ठेवीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भक्तीची ते जाती ऐसी । सर्वस्वासी मुकावें ॥ ध्रु ॥
भिक्षा[2] आणि वेवसाव । काला करितो गाढव ॥ २ ॥
करूनि वस्ती बाजारीं । ह्मणवी[3] कासया निस्पृही ॥ ३ ॥
प्रसादा आडुनि कवी । केलें तुप पाणी तेवीं[4] ॥ ४ ॥
तुका ह्मणे होईं शूर[5] । किंवा निसुर मजुर ॥ ५ ॥

॥ १०३ ॥

तेज्या इशारती । तटा फोके[6] वरी घेती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय सांगावें त्याहुनी । ऐका रे धरा मनीं ॥ ध्रु ॥
नव्हे भांडखोर । ओढूनि धरूं पदर ॥ २ ॥
तुका ह्मणे तोंड । काळें करा खालीं मुंड ॥ ३ ॥

॥ १०४

मागें संतीं होतें जें जें सांगितलें । तें येऊं लागलें अनुभवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आचारभ्रष्ट होती[7] लोक कळी । पुण्य क्षीण बळी जालें पाप॥ध्रु॥
वर्णधर्म कोणी न धरी विटाळ । घालिती गोंधळ एके ठायीं ॥ २ ॥
वेदाचे पाठक सेवितील मद्य । न देखती भेद विषयीं भांड ॥ ३ ॥
तुका ह्मणे किती करावे फजित । ते चि छंद नित्य बहु होती ॥ ४ ॥

---

१ पं. संसाराच्या.—२ दे भिक्षाणी वेवसाव ।—३ पं. कैसा ह्मणवी निस्पृही ।—४ त. पं. जेवीं.—५ दे. सुर.—६ पं. फोकावरी.—७ त. "होती लोक" याच्याबद्दल "लोक होती."

॥ १०५ ॥

अक्षरांचा श्रम केला । फळा आला तेणें तो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघियाचा तळ धरी । जीवा उरी नुरउनी ॥ ध्रु ॥
फेळलें[1] तें लवे भारें । पिक खरें[2] आलें तईं ॥ २ ॥
तुका[3] ह्मणे देवा । पुढें भाव साराया ॥ ३ ॥

॥ १०६ ॥

उचित जाणावें मुख्य धर्म आधीं । चित्तशुद्ध बुद्धी ठायीं स्थीर ॥ १ ॥
न घलावी[4] धांव मनाचिये ओढी । वचन आवडी संताचिये ॥ २ ॥
अंतरीं या राहे वचनाचा विश्वास । न लगे उपदेश तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ १०७ ॥

जीवन हे मुक्त नर जाले पावन । तजा[6] हो दुर्जनसंगति ही ॥ १ ॥
बहुत अन्न विष मोहरीच्या मानें । अवघें चि तेणें विष होय ॥ २ ॥
तुका ह्मणे जेणें आपुलें स्वहित । तैसी करीं नीत विचारूनि ॥ ३ ॥

॥ १०८ ॥

द्रव्याचा तो आह्मी धरितों विटाळ । तया पाठी काळ लाग करी ॥ १ ॥
करोनियां हें चि राहिलों[7] जविन । एक नारायण नाम ऐसें ॥ २ ॥
तुका ह्मणे हें चि करूनि जतन । आलिया ही दान याचकासी ॥ ३ ॥

१०९

द्रव्याचिया मागें कळिकाळाचा लाग । ह्मणोनियां संग खोटा त्याचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निरयाचें मूळ घालुनियां मागें । मांडिली प्रसंगें कथा पुढें ॥ ध्रु ॥

---

१ त. फळें।—२ त. भरलें.—३ पं. बरे —४ त. पं. तुका ह्मणे हागे देव ।—५ पं. घालावी.—
६ पं. त्यजावे. त. तजा हे.—७ त. राहिलें.

आजिच्या प्रसंगें हा चि लाभ घ्यावा । पुढील भार देवावरी घाला ॥ २ ॥

प्रालब्ध कांहीं न पालटे सोसें । तृष्णेचें हें पिसें वांयांविण ॥ ३ ॥

तुका ह्मणे घेई राहे ऐसें धन । सादर श्रवण करोनियां ॥ ४ ॥

॥ ९१० ॥

रडे अळंकार दैन्याचिये[1] कांतीं । उतमा विपत्तिसंगें[2] घडे ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ एकाविण एक अशोभ्य[3] दातारा । कृपेच्या सागरा पांडुरंगा ॥ ध्रु ॥

रांधूं नेणे तया पुढील आइतें । केलें तें सोइतें वांयां जाय ॥ २ ॥

तुका ह्मणे चिंतामणि शेळी गळा । पावे अवकळा ह्मणउनी ॥ ३ ॥

॥ ९११ ॥

दुःखाचे डोंगर लागती सोसावे । ऐसें तंव ठावें सकळांसीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ कांहीं न करिती विचार हिताचा । न करिती वाचा नामघोष ॥ ध्रु ॥

भोग कळों येतो मागिल ते जन्म । उत्तम मध्यम कनिष्ठ ते ॥ २ ॥

तुका ह्मणे येथें झांकितील डोळे । भोग देतेवेळे येइल कळों ॥ ३ ॥

॥ ९१२ ॥

सदैव तुह्मां अवघें आहे । हातपाय चालाया ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ मुखीं वाणी कानीं कीर्ति । डोळे मूर्ती देखाया ॥ ध्रु ॥

अंध बहिर ठकलीं किती । मुकीं होतीं पांगुळें ॥ २ ॥

---

१ दे. याच्यावर "विधवेचे संगती" असा पाठ घातला आहे.—२त. संगें.—३ दे. अशोभ.

घरास आगि लावुनि जागा । न पळे तो[1] गा वांचे ना ॥ ३ ॥
तुका ह्मणे जागा हिता । कांहीं आतां आपुल्या ॥ ४ ॥

॥ ९१३ ॥

ऐसे पुढती मिळतां आतां । नाहीं सत्ता स्वतंत्र ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणउनि फावलें तें घ्यावें । नाम गावें आवडी ॥ ध्रु ॥
संचित प्रारब्ध गाढें । धांवे पुढें क्रियमाण ॥ २ ॥
तुका ह्मणे घुबडा ऐसें । जन्म सरिसें शुकराचें ॥ ३ ॥

॥ ९१४ ॥

सर्वविशीं माझा त्रासलासे जीव । आतां कोण भाव निवडे[2] एक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संसाराची मज न साहे चि वार्ता । आणीक ह्मणतां माझें कोणी ॥ ध्रु ॥
देहसुख कांहीं बोलिले उपचार । विष तें आदर बंद[3] वाटे ॥ २ ॥
उपाधि दाटणी प्रतिष्ठा गौरव । होय माझा जीव कासावीस ॥ ३ ॥
तुका ह्मणे कांहीं आणीक न साहे । आवडती पाय वैष्णवांचे ॥ ४ ॥

॥ ९१५ ॥

आणीक कांहीं या उत्तराचें काज । नाहीं आतां मज बोलावया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भिन्न भेद हे भावनास्वभाव । नव्हे कांहीं देव एकविध ॥ ध्रु ॥
गुण दोष कोणें निवडावे धर्म । कोण जाणे कर्म अकर्म तें ॥ २ ॥
तरि च भलें आतां न करावा संग । दुःखांचा[4] प्रसंग तोडावया ॥ ३ ॥
तुका ह्मणे गुण गाई या देवाचे । घेई माझे वाचे हे चि धणी ॥ ४ ॥

॥ ९१६ ॥

आपुल्या विचार करीन जीवाशीं । काय या जनाशीं चाड मज ॥ १ ॥

---

१ पं. ते.–२ पं. निवडूं.–३ पं. बंध.–४ पं. दुःखाचे.

॥धु.॥ आपुलें स्वहित जाणती सकळें[1] । निरोधितां बळें दुःख वाटे ॥ध्रु॥
आइको नाइको कथा कोणी तरी । जाऊनियां घरीं निजो सुखें ॥ २ ॥
माझी कोण वोज जाला हा शेवट । देखोनियां वाट आणिकां लावूं॥ ३ ॥
तुका ह्मणे भाकूं आपुली करुणा । जयाची वासना तया फळे ॥ ४ ॥

॥ ९१७ ॥

धाई अंतरिंच्या सुखें । काय बडबड वाचा मुखें ॥ १ ॥
॥ धु. ॥ विधिनिषेध उर फोडी । जंव नाहीं अनुभवगोडी ॥ ध्रु ॥
वादे तळमळ उभयता । नाहीं देखिलें अनुभवितां ॥ २ ॥
अपुल्या मतें पिसें । परि तें आहे जैसेंतैसें ॥ ३ ॥
साधनाची सिद्धि । मौनें[2] करा स्थिर बुद्धि ॥ ४ ॥
तुका ह्मणे वादें । वांयां गेलीं ब्रह्मवृंदें ॥ ५ ॥

॥ ९१८ ॥

कुशळ गुंतले निषेधा । वादी प्रवर्तले वादा ॥ १ ॥
॥ धु. ॥ कैसी ठकलीं बापुडीं । दंभविषयांचे सांकडीं ॥ ध्रु ॥
भुस उपणुनि[3] केलें काय । हारपले दोन्ही ठाय ॥ २ ॥
तुका ह्मणे लागे हातां । काय मथिलें घुसळितां[4] ॥ ३ ॥

॥ ९१९ ॥

संतांचीं उच्छिष्टें बोलतों उत्तरें । काय म्यां गव्हारें जाणावें हें ॥ १ ॥
॥ धु. ॥ विठ्ठलाचें नाम घेतां नये शुद्ध । तेथें मज बोध काय कळे ॥ध्रु॥
करितों कवतुक बोबडा उत्तरीं ॥ ह्मणी मजवरि कोप धरा ॥ २ ॥

---

१ दे. सकळ.—२ त. मौन्य. दे. "मोन" असतां तें खोडून "मन" केलें आहे.—
३ पं. उफणुनि —४ पं. दे. गुसाळेतां.

काय माझी याति. नेणां हा विचार । काय मी तें फार बोलों नेणें ॥३॥
तुका ह्मणे मज बोलवितो देव । अर्थ गुह्य भाव तो चि जाणे ॥ ४ ॥

॥ ९२० ॥

चंदनाच्या वासें धरितील नाकें[1] । नावडे कनक न घडे हें ॥ १ ॥
साकरेची गोडी सारखी[2] सकळां । थोरां मोट्यां बाळां धाकुटियां ॥२॥
तुका ह्मणे माझें चित्त शुद्ध होतें । तरि का निंदितें जन मज ॥ ३ ॥

॥ ९२१ ॥

तुज ऐसा[3] कोण उदाराची रासी । आपुलें चि देसी पद दासा ॥ १ ॥
शुद्ध हीन कांहीं न पाहासी कुळ । करिसी निर्मळ वास देहीं ॥ २ ॥
भावें हें कदान्न खासी त्याचे घरीं । अभक्तांच्या[4] परी नावडती ॥ ३ ॥
न वजासी जेथें दुरी दवडितां । न येसी जो चित्ता योगियांच्या ॥ ४ ॥
तुका ह्मणे ऐसीं ब्रीदें तुझीं खरीं । बोलतील चारी वेद मुखें ॥ ५ ॥

॥ ९२२ ॥

तरि कां नेणते होते मागें ऋषी । तींहीं या जनासी दुराविलें ॥ १ ॥
वोळगती जया अष्टै[5] महासिद्धी । ते या जनबुद्धी नातळती ॥ २ ॥
कंदमूळें पाला धातूच्या पोषणा । खाँतील[6] वास राणां तरी केला ॥३॥
लावुनियां नेत्र उगे चि बैसले । न बोलत ठेले मौन्यमुद्रे[7] ॥ ४ ॥
तुका ह्मणे ऐसें करीं माझ्या चित्ता । दुरावीं अनंता जन दुरी ॥ ५ ॥

॥ ९२३ ॥

कोणाच्या आधारें करूं मी विचार । कोण देइल धीर माझ्या जीवा ॥ १ ॥

---

१ त. दे. नाकें.—२ तं दे. सारिखी.—३ त. पं. ऐसी.—४ त. दे. अभक्तांची परी नावडती.
५ दे. अष्टमासिद्धि.—६ पं. खाती.—७ त. मौन्यरूप.

शास्त्रज्ञ पंडित नव्हें मी वाचक । यातिशुद्ध एक ठाव नाहीं ॥ २ ॥
कलियुगीं बहु कुशळ हे जन । छळितील गुण तुझे गातां[१] ॥ ३ ॥
मज हा संदेह झाला दोहीं सवा । भजन करूं देवा किंवा नको ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां दुरावितां जन । किंवा हें मरण भलें दोन्ही ॥ ५ ॥

॥ ९२४ ॥

काय उणें जालें तुज समर्थासी । ऐसा मजपाशीं कोण दोष ॥ १ ॥
जो तूं माझा न करिसी अंगीकार । सांगेन वेव्हार संतांमधीं ॥ २ ॥
तुजविण रत आणिकांचे ठायीं । ऐसें कोण ग्वोही[२] दावीं मज ॥ ३ ॥
तुका ह्मणे काय धरूनी गुमान । सांग उगवून पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ९२५ ॥

काय करूं आन दैवतें । एका विण पंढरीनाथें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सरिता मिळाली सागरीं । आणिकां[३] नांवां कैची उरी ॥
अनेक दीपीचा प्रकाश । सूर्य उगवतां नाश ॥ २ ॥
तुका ह्मणे नेणें दुजें । एका विण पंढरीराजें ॥ ३ ॥

॥ ९२६ ॥

काय करूं कर्माकर्म । बरें सांपडलें वर्म ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होसी नामा च सा[४]रिखा । समजाविली नाहीं लेखा ॥ ध्रु ॥
नाहीं वेचावेच जाला । उरला आहेसी संचला ॥ २ ॥
तुका ह्मणे माझें । काय होईल तुह्मां ओझें ॥ ३ ॥

---

१ त. गातां तुझें.—२ दे. "ग्वाही" याचें "गोही" केलें आहे.—३ पं. आन.—४ दे. त. सारिका.

॥ १२७ ॥

एकाएकीं हातोफळी । ठाया बळी पावले तें* ॥ १ ॥
॥ धु. ॥ आह्मी देवा शक्तिहीनें[1] । भाकूं तेणें करुणा ॥ ध्रु ॥
पावटणी केला काळ । जया बळ होतें तें ॥ २ ॥
तुका ह्मणे वीर्यावीर । संतधीर समुद्र ॥ ३ ॥

॥ १२८ ॥

पुढिलाचें इच्छी फळ । नाहीं बळ तें अंगीं ॥ १ ॥
॥ धु. ॥ संत गेले तया ठाया । देवराया पाववीं ॥ ध्रु ॥
ज्येष्ठांचीं कां आह्मां जोडी । परवडी न लभों ॥ २ ॥
तुका ह्मणे करीं कोड । पुरवीं लाड आमुचा ॥ ३ ॥

॥ १२९ ॥

कैवल्याच्या तुह्मां घरीं । रासी हरी उदंडें[2] ॥ १ ॥
॥ धु. ॥ मजसाटीं कां जी वाणी । नव्हे[3] धणी विभागा ॥ ध्रु ॥
सर्वा गुणीं सपुरता । ऐसा पिता असोनी ॥ २ ॥
तुका ह्मणे पांडुरंगा । जालों सांगा सन्मुख ॥ ३ ॥

॥ १३० ॥

आपलाल्या तुह्मी रूपासी समजा । कासया[4] वरजा आरसिया ॥ १ ॥
॥ धु. ॥ हें तों नव्हे देहबुद्धीचें कारण । होइल नारायणें दान केलें ॥ ध्रु ॥
बब्रूचिया बाणें वर्मासि स्पर्शावें । हें तों नाहीं ठावें मोकालिया ॥ २ ॥
तुका ह्मणे बहु मुखें[5] या वचना । सत्याविण जाणा चाल नाहीं ॥ ३ ॥

---

१ त. पं शक्तिहीणें.—२ पं. उदंडा.—३ पं. नहों.—४ पं. कासीया.—५पं. मुख. *पं. हा शब्द नाहीं.

॥१३१॥

न मनावी चिंता तुह्मीं संतजनीं । हिरा स्पटिकमणी केंवि होय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पडिला प्रसंग स्थळा[1] त्या सारिखा । देखिला पारिखा भाव कांहीं ॥ ध्रु ॥
बहुतांसी भय एकाचिया दंडें । बहुते[2] या तोंडें वचनासी ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं वैखरी बा सर । करायाचे चार वेडे वेडे ॥ ३ ॥

॥ १३२ ॥

यथाविधि पूजा करी । सामोग्री[3] तोंवरि हे नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां माझा सर्व भार । तूं दातार चालविसी ॥ ध्रु ॥
मंगळ तें तुह्मी[4] जाणां । नारायणा काय तें ॥ २ ॥
तुका ह्मणे समर्पिला । तुज विठ्ठला देहभाव ॥ ३ ॥

॥ १३३ ॥

भवसिंधूचें हें तारूं । मज विचारूं पाहातां ॥ १ ॥
॥ ध्रु. चित्तीं तुझे धरिन पाय । सुख काय तें तेथें ॥ ध्रु ॥
माझ्या खुणा मनापाशीं । तें या रसीं बुडालें[5] ॥ २ ॥
तुका ह्मणे वर्म आलें । हातां भलें हें[6] माझ्या ॥ ३ ॥

॥ १३४ ॥

पाहातां श्रीमुख सुखावलें सुख । डोळियांची भूक न वजे माझी ॥ १ ॥
॥ ध्रु. जिव्हे गोडी तीन अक्षरांचा रस । अमृत जयास फिकें पुढें ॥ ध्रु ॥
श्रवणींची वाट चोखाळलीशुद्ध । गेले भेदाभेद वारोनियां[7] ॥ २ ॥

१ दे. स्तळा.—२ पं. बहुता.—३ पं. सामुग्री.— ४ पं. आह्मी जाणों.— ५ पं. बुडालों.—
६ पं. हें चि.—७ पं. निवारूनि.

महामळें मन होतें जें गांदलें । शुद्ध चोखाळलें स्पटिक जैसें ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझ्या जीवाचें जीवन । विठ्ठल निधान सांपडलें ॥ ४ ॥

॥ १३५ ॥

हा चि परमानंद आळंगीन बाहीं । क्षेम देतां ठायीं द्वैत तुटे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ बोलायासि मात मन निवे हर्षें[1] चित्त । दुणी वाढे प्रीत प्रेमसुख[2] ॥ध्रु.॥
जनांत भूषण वैकुंठीं सरतां[3] । फावलें स्वहिता सर्वभावें ॥ २ ॥
तुटला वेव्हार माया लोकाचार । समूळ संसार पारुषला ॥ ३ ॥
तुका ह्मणे[4] हा विठ्ठल चि व्हावा । आणिकी[5] या जीवा चाड नाहीं ॥ ४ ॥

॥ १३६ ॥

आमुची कृपाळू तूं होसी माउली । विठ्ठले साउली शरणागता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ प्रेमपान्हा स्तनीं सदा सर्वकाळ । दृष्टि हे निर्मळ अमृताची ॥ध्रु.॥
भूक तान दुःख वार्टो नेदीं सीण । अंतरींचा गुण जाणोनियां ॥ २ ॥
आशा तृष्णा माया चिंता दवडीं दुरी । ठाव आह्मां करीं खेळावया ॥ ३ ॥
तुका ह्मणे लावीं संताचा सांगात । जेथें न पवे हात कळिकाळाचा ॥ ४ ॥

॥ १३७ ॥

जेथें जावें तेथें कपाळ सरिसें । लाभ तो विशेषें[6] संतसंगें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पूर्व पुण्यें जरि होतीं सानुकूळ । अंतरायमूळ[7] नुपजे तेथें ॥ध्रु.॥
भाग्य तरी नव्हे धन पुत्र दारा । निकट वास बरा संतांपायीं ॥ २ ॥
तुका ह्मणे हे चि करावी मिरासी । बळी संतांपाशीं द्यावा जीव ॥ ३ ॥

---

१ दे. हरुषें. त. हर्षें. पं. हर्ष.—२ पं. प्रेमसुखें.—३ सरतां !—४ पं. ह्मणे तो हा.—५ पं आणीक.—६ त. पं. विशेष संतसंगें.—७ त. पं. अंतरायें मूळ.

॥ १३८ ॥

आतां कांहीं सोस न करीं आणीक । धरीन तें एक हें चि दृढ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जेणें भवसिंधु उतरिजे पार । तुटे[1] हा दुस्तर गर्भवास ॥ ध्रु ॥
जोडीन ते आतां देवाचे चरण । अविनाश धन परमार्थ ॥ २ ॥
तुका ह्मणे बरा जोडला हा देह । मनुष्यपणें[2] इहलोका आलों ॥ ३ ॥

॥ १३९ ॥

जतन करीन जीवें । शुद्धभावें करूनी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विठ्ठल विठ्ठल हें धन । जीवन[3] अंतकाळींचें ॥ ध्रु ॥
वरदळ[4] हें संचित सारूं । बरवा करूं उदिम हा ॥ २ ॥
तुका ह्मणे त्हृदयपेटी । ये संपुटीं सांटवूं ॥ ३ ॥

॥ १४० ॥

एवढा प्रभु भावें । तेणें संपुष्टीं राहावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होय भक्तीं केला तैसा । पुरवी धरावी ते इच्छा ॥ ध्रु ॥
एवढा जगदानी । मागे तुळसीदळ पाणी ॥ २ ॥
आला नांवा रूपा । तुका ह्मणे जाला सोपा ॥ ३ ॥

॥ १४१ ॥

भाग्यें ऐसी जाली जोडी । आतां घडी विसंभेनां[5] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विटेवरि समचरण । संतीं खुण सांगितली ॥ ध्रु ॥
अवघें आतां काम सारूं । हा चि करूं कैवाड ॥ २ ॥
तुका ह्मणे खंडूं खेपा । पुढें पापापुण्याच्या ॥ ३ ॥

---

१ पं. पुढें.— २ त. पं. मनुष्यपणा.— ३ त. अंत जीवन काळींचें.— ४ पं. वरदळ.—
५ त. विसंबेना. पं. विसंबों.

॥ १४२ ॥

पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण । आह्मां नारायण तैशापरी[1] ॥ १ ॥
सर्वभावें लोभ्या आवडे हें धन । आह्मां नारायण तैशापरी ॥ २ ॥
तुका ह्मणे एकविध जालें मन । विठ्ठला वांचून नेणे दुजें ॥ ३ ॥

॥ १४३ ॥

विठ्ठल गीतीं गावा विठ्ठल चित्तीं ध्यावा । विठ्ठल उभा पाहावा विटेवरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अनाथाचा बंधु विठ्ठल कृपासिंधु । तोडी भवबंधु यमपाश ॥ ध्रु. ॥
तो चि शरणागतां हा विठ्ठल मुक्तिदाता । विठ्ठल या संतांसमागमें ॥ २ ॥
विठ्ठल गुणनिधि विठ्ठल सर्व सिद्धि । लागली समाधि विठ्ठलनामें ॥ ३ ॥
विठ्ठलाचें नाम घेतां जालें सुख । गोडावलें मुख तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ १४४ ॥

विठो सांपडावया हातीं । ठावी जाली एके[2] गती ।
न धरीं भय चित्तीं । बळ किती तयाचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लागे आपण चि हातीं । किंव भाकावी काकुलती ।
करी मग चित्तीं । असेल तें तयाचे[3] ॥ ध्रु. ॥
एकलिया भावबळें । कैं सांपडे तो काळें ।
वैष्णवांच्या मेळें । उभा ठाके हाकेसी ॥ २ ॥
बांधा माझिया जीवासी । तुका ह्मणे प्रेमपाशीं ।
न सोडीं तयासी । सर्वस्वासी उदार ॥ ३ ॥

---

१ पं. तयापरी.—२ पं. एकी.—३ पं. तयापें. दे. त. तयाचें.

॥ १४५ ॥

वाट वैकुंठीं पाहाती । भक्त कैं पां येथें येती ।
तयां जन्ममरणखंती । नाहीं चित्तीं परलोक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धन्यधन्य हरिचे दास । तयां सुलभ गर्भवास ।
ब्रह्मादिक करिती आस । तीर्थां[1]वास भेटीची ॥ ध्रु ॥
कथाश्रवण व्हावयास । यमधर्मा थोर आस ।
पाहे रात्रदिवस । वाट कर जोडोनियां ॥ २ ॥
रिद्धिसिद्धी न पाचारितां । त्या धुंडिती हरिभक्तां ॥
मोक्षसौ[2]गुज्यता । वाट पाहे भक्तांची ॥ ३ ॥
असती जेथें उभे ठेले । सदा प्रेमसुखें धाले ।
आणीक ही उद्धरिले । महादोषी चांडाळ ॥ ४ ॥
सकळ करिती त्यांची आस । सर्वभावें ते उदास ।
धन्यभाग्य त्यांस । तुका ह्मणे दरुषणें ॥ ५ ॥

॥ १४६ ॥

सोनें दावी वरी तांबें तयापोटीं । खरियाचे साटीं विकूं पाहे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पारखी तो जाणे तयाचे जीवींचें । निवडी दोहींचें वेगळालें ॥ ध्रु ॥
क्षिरा नीरा कैसें होय एकपण । स्वां[3]दी तो चि भिन्न भिन्न काढी ॥ २ ॥
तुका ह्मणे थीता ना[4]गवला चि खोटा । अपमान मोटा पा[5]वईल ॥ ३ ॥

॥ १४७ ॥

फोडुनि सांगडी बांधली माजासी । पैल थडी कैसी पा[6]वे सहजीं ॥ १ ॥

---

१ त. तीर्थां आस.–२ दे. त. पं. सायोज्यता.–३ दे. स्वादीं.–४ पं. आपण.–५ पं. पावबील. ६ पं. पावेल.

॥ ध्रु. ॥ आपला घात आपण चि करी । आणिकां[1] सांगतां नाइके तरी॥ध्रु॥
भुकेभेणें विष घेऊं[2] पाहे आतां । आपल्या[3] चि घाता करूं पाहे ॥ २ ॥
तुका ह्मणे एक चालतील पुढें । तयांसी वांकडें जातां ठके ॥ ३ ॥

॥ १४८ ॥

उपकारासाटीं बोलों[4] हे उपाय । येणेंविण काय आह्मां[5] चाड ॥ १ ॥
बुडतां हे जन न देखवे[6] डोळां । येतो कळवळा ह्मणउनि ॥ २ ॥
तुका ह्मणे माझे देखतिल डोळे । भोग देते वेळे येईल कळों ॥ ३ ॥

॥ १४९ ॥

आठवे देव तो करावा उपाव । येर तजीं वाव खटपटा[7] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होई बा जागा होई बा जागा । वांउगा कां गा सिणसील[8] ॥ ध्रु ॥
जाणिवेच्या भारें भवाचिये डोहीं । बुडसी तों कांहीं[9] निघेसि ना ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा पावसील भावें । जागतां तें ठावें कांहीं नव्हे ॥ ३ ॥

॥ १५० ॥

माझ्या मुखावाटा नेयो[10] हें वचन । व्हावें हें संतान द्रव्य कोणां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ फुंकाचा[11] विभाग पतनदुःखासी । दोहींमुळें त्यासी तें चि सांधे[12] ॥ध्रु॥
नाईकावी[13] निंदा स्तुति माझ्या कानें । सादर या मनें होऊनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे देव असाध्य यामुळें । आशामोहजाळें गुंतलिया ॥ ३ ॥

॥ १५१ ॥

चित्त ग्वाही तेथें लौकिकाचें काई । स्वहित तें ठायीं आपणापें ॥१॥
॥ ध्रु. ॥ मनासी विचार तो चि साच भाव । व्यापक[14] हा देव अंतर्बाहीं॥ध्रु॥

---

१ पं. आणीक.—२ दे. त. देऊं.—३ आपला चि घाता. त. आपला चि घात.—४ पं. बोलतों हे —५ त. चाड आह्मां.—६ पं. देखवे हें डोळां.—७ पं. खटपट.—८ पं. कां सिणसील.—९ पं. कहीं.—१० पं. नये.—११ पं. सुखाचा.—१२ पं. साध्य.—१३ त. आइकावी.—१४ पं. व्यापला.

शुद्ध भावा न लगे सुचावा परिहार । उमटे साचार आणिके ठायीं ॥२॥
भोगित्यासी काज अंतरीचें गोड । बाहिरल्या चाड नाहीं रंगें ॥ ३ ॥
तुका ह्मणे भाव शुद्ध हें कारण । भाट नारायण होईल त्यांचा ॥ ४ ॥

॥ ९५२ ॥

नव्हती माझे बोल । अवघें करितो विठ्ठल ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कांहीं न धरावी खंती । हित होइल धरा चित्तीं ॥ ध्रु ॥
खोटी ते अहंता । वाट टाकिली सांगतां ॥ २ ॥
ज्याचें तो चि जाणे । मी मापाडें तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ९५३ ॥

वासनेच्या मुखीं अदळूनि भीतें । निर्वाहापुरतें कारण तें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ या नांवें अंतरा आला नारायण । चित्तसमाधान खुण त्याची ॥ध्रु॥
सर्वकाळ हा चि करणें विचार । विवेकीं सादर आत्मत्वाचे ॥ २ ॥
तुका ह्मणे जों जों भजनासी वेळे । अंगें तों तों कळे सन्निधता ॥३॥

॥ ९५४ ॥

चिंतनें अचिंत राहिलों निश्चळ । तें चि किती काळ वाढवावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अबोल्याचा काळ आतां ऐशावरी । वचनाची उरी उरली नाहीं ॥ ध्रु ॥
*करूं आला तों तों केला लवलाहो । उरों च संदेहो दिला नाहीं ॥ २॥
तुका ह्मणे मोह परते चि ना मागें । ह्मणउनि त्यागें त्याग जाला ॥ ३ ॥

॥ ९५५ ॥

निर्गुणाचे ध्यावें गुणासी दर्शन । एकाएकीं भिन्न भेद घडे ॥ १ ॥

---

१ पं. शुद्ध भाव–. २ त. पं. वोळे.–३ पं. आगें.–४ पं. ऐशापरी.–५ दे. संदेहे.–६ पं. निर्गुणासी. * पं. हें कडवें नाहीं

॥ध्रु.॥ तुह्मां आह्मां आतां न पडे यावरी । आह्मी तें चि बरी जेथें तेथें ॥ध्रु.॥
आपणापासुनी नसावें अंतर । वेचिलें उत्तर ह्मणउनि ॥ २ ॥
तुका ह्मणे अंगा आली कठिणता । आमच्या अनंता तुह्मां ऐसी ॥ ३ ॥

॥ १५६ ॥

तुज च पासाव जालोंसों निर्माण । असावें तें भिन्न कासयानें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाहावा जी ठायीं करूनि विचार । न्यून कोठें फार असे चि ना ॥ ध्रु. ॥
ठेविलिये ठायीं आज्ञेचें पाळण । करूनि जतन राहिलोंसें ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां बोलतसें स्पष्ट । जालों क्रियानष्ट तुह्माऐसा ॥ ३ ॥

॥ १५७ ॥

प्रीतिभंग माझा केला पांडुरंगा । भक्तिरस सांगा कां जी तुह्मीं ॥ १ ॥
॥ध्रु.॥ ह्मणऊनि कांहीं न ठेवीं चि उरी । आलों वर्मावरी एकाएकीं ॥ध्रु.॥
न देखों चि कांहीं परतीं माघारी । उरली ते उरी नाहीं मुळीं ॥ २॥
तुका ह्मणे आला अंतरासी खंड । तरि माझें तोंड खवळिलें ॥ ३ ॥

॥ १५८ ॥

लटिका ऐसा ह्मणतां देव । संदेहसा वाटतसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें आलें अनुभवा । मज ही सेवा करितां ॥ ध्रु. ॥
शून्याकारी बहु मोळा । भेंडोळा हे पवाडे ॥ २ ॥
तुका ह्मणे ताळी नाहीं । एके ठायीं चपळत्वें ॥ ३ ॥

॥ १५९ ॥

जैशासाटीं तैसें हावें । हें बरवें कळलेंसे ॥ १ ॥

---

१ दे. त. कठिन्यता.--२ त. पं. जालोंसे.—३ दे. त. नुन्य. पं. न्युन्य.—४ पं. परतो.—
५ त. अंतरा.—६ पं. लटिका देव ह्मणतां ऐसा

॥ ध्रु. ॥ उदास तूं नारायणा । मी ही ह्मणा तुह्मी च ॥ ध्रु ॥
ठका महाठक जोडा । जो धडफुडा लागासी ॥ २ ॥
एकांगी च भांडे तुका । नाहीं धोका जीवित्वें ॥ ३ ॥

॥ ९६० ॥

बहुतां रीती काकुलती । आलों चित्तीं न धरा च ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां काशासाटीं देवा । मिथ्या हेवा वाढवूं ॥ ध्रु ॥
तुह्मां आह्मां जाली तुटी । आतां भेटी चिंतनें ॥ २ ॥
तुका ह्मणे लाजिरवाणें । अधीर जिणें इच्छेचें ॥ ३ ॥

॥ ९६१ ॥

आश्चर्य तें एक जालें । मना आलें माझिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मढ्यापाशीं करुणा केली । तैसी गेली वृथा हे ॥ ध्रु ॥
नायावा तो कैसा राग । खोटें मग देखोनि ॥ २ ॥
तुका ह्मणे कैचा बोला । शोध विठ्ठला माझिया ॥ ३ ॥

॥ ९६२ ॥

मागायाची नाहीं इच्छा । जो मी ऐसा संकोचों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लटकियाची न करूं स्तुति । इच्छा चित्तीं धरूनि ॥ ध्रु ॥
हिशोबें तें आलें घ्यावें । हें तों ठावें सकळांसी ॥ २ ॥
तुका ह्मणे स्वामिसेवा । येथें देवा काशाची ॥ ३ ॥

॥ ९६३ ॥

पाठवणें पडणें पायां । उद्धार वांयां काशाचा ॥ १ ॥

---

१ पं. उदार.—२ पं. महाठका.—३ दे. त. आधर.—४ पं. पाटवणें.

॥ ध्रु. ॥ घडलें तें भेटीसवें । दिसेल बरवें सकळां ॥ ध्रु ॥
न घडतां दृष्टादृष्टी । काय गोष्टी कोरड्या ॥ २ ॥
अबोल्यानें असे तुका । अंतर ऐका साक्षीतें ॥ ३ ॥

॥ १६४ ॥

अभयाचें स्थळ । तें हें एक अचळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तरि धरिला विश्वास । ठेलों होउनियां दास ॥ ध्रु ॥
पुरली आवडी । पायीं लागलीसे गोडी ॥ २ ॥
तुका ह्मणे कंठीं नाम । अंगीं भेरलेंसे प्रेम ॥ ३ ॥

॥ १६५ ॥

संदेह निरसे तरि रुचिकर । फिक्यासी आदर चवी नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां नको मज खोटयानें फटवूं । कोठें येऊं जाऊं वेळोवेळां ॥ ध्रु ॥
गेला तरि काय जीवाचें सांकडें । वांचउनि पुढें काय काज ॥ २ ॥
तुका ह्मणे करीं निवडा जी बरें । केलीं तैसीं पोरें आळीपायीं ॥ ३ ॥

॥ १६६ ॥

वेद वाणी परि दुर्लभ अनुभव । चालीचा चि वाहो बहुतेक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आह्मी ऐसें कैसें राहावें निश्चळ । पाठिलागा काळ जिंतितसे ॥ ध्रु ॥
वाढवितां पोट दंभाचे पसारे । येतील माघारे मुदला तोटे ॥ २ ॥
तुका ह्मणे बरें जागवितां मना । तुमच्या नारायणा अभयें करें ॥ ३

---

१ पं. एका.–२ दे. भरलें सप्रेम.–३ पं. अनुभवो.–४ दे. पाठिलाग.–५ त. अभयंकरें.

॥ १६७ ॥

उगें चि हें मन राहातें निश्चळ ॥ तरि कां तळमळ सोंट होती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय तुमचीं नेणों कवतुक विंदानें । सर्वोत्तमपणें खेळतसां ॥ध्रु॥
नानाछंदें आह्मां नाचवावें जीवां । वाढवाव्या हांवा भलत्यापुढें ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी आपुली प्रतिष्ठा । वाढवावया चेष्टा करीतसां ॥ ३ ॥

॥ १६८ ॥

आह्मी बळकट जालों फिराउनी । तुमच्या वचनीं तुह्मां गोऊं ॥ १ ॥
॥ ध्रु० ॥ जालें तेव्हां जालें मागील तें मागें । आतां वर्मलागें उावीं जालीं ॥ ध्रु ॥
तोडावया अवघ्या चेष्टांचा संबंध । शुद्धापाशीं शुद्ध बुद्ध व्हावें ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मां आत्मत्वाची सोय । आपण चि होय तैसा चि तूं ॥ ३ ॥

॥ १६९ ॥

तुह्मी साच नुपेक्षाल हा भरवसा । मज जाणतसां अधीरसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कासया घातला लांबणी उद्धार । ठेवा करकर वारूनियां ॥ध्रु॥
सुटों नये ऐसें कळलें निरुतें । कां घ्यावें मागुतें आळवूनि ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मी सभाग्य जी देवा । माझा तुह्मां केवा काय आला ॥ ३ ॥

॥ १७० ॥

तुह्मां होईल देवा पडिला विसर । आह्मीं तें उत्तर यत्न केलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पतितपावन ब्रीदें मिरविसी । याचा काय देसी झाडा सांग ॥ ध्रु ॥

---

१ त. साठ.—२ पं. आत्मत्वीं.—३ पं. यत्नें.

आहाच मी नव्हें अर्थाचें भुकेलें । भलत्या एका बोलें वारेन त्या ॥२॥
तुका ह्मणे देह देईन सांडणें । सहित अभिमानें ओवाळूनि ॥ ३ ॥

॥ ९७१ ॥

जडलों अंगाअंगीं । मग ठेवीं प्रसंगीं ।
कांहीं उरीजोगी । लोकीं आहे पुरती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ठेवीं निवारूनि आधीं । अवकाश तो चि बुद्धी ।
सांपडली[1] संधी । मग बळ कोणासी ॥ ध्रु ॥
गळा बांधेन पायीं । हालों नेदीं ठायिचा ठायीं ।
निवाड तो तई । अवकळा केलिया ॥ २ ॥
तुका ह्मणे ठावें । तुह्मी असा जी बरवें ।
बोभाटाची सवे । मुळींहुनी विठोबा ॥ ३ ॥

॥ ९७२ ॥

आह्मी[2] शक्तिहीनें । कैसें कराल तें नेणें ।
लिगाडाच्या गुणें । खोळंबला राहिलों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझें मज देई देवा । असे[3] ठेविला तो ठेवा ।
नाहीं करीत हेवा । कांहीं अधीक आगळा ॥ ध्रु ॥
नाहीं गळां पडलों झोंड । तुमचें तें चि माझें तोंड ।
चौघां चार खंड । लांबणी हे अनुचित ॥ २ ॥
नाहीं येत बळा । आतां तुह्मासी गोपाळा ।
तुका ह्मणे गळा । उगवा पांयां[4] लागतों ॥ ३ ॥

---

१ पं सांपडलों.—२ पं आह्मां.—३ पं. असेल तो ठेविला ठेवा.—४ त. पं पायीं.

॥ १७३ ॥

काय कृपेविण घालावें सांकडें । निश्चिंती निवाडें कोण्या एका ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आह्मीं तैसीं पुढें असों दीनपणें । वेचूनि वचनें करुणेचीं ॥ ध्रु ॥
धेरूं[1] भय आतां काय वाहों चिंता । काय करूं आतां आप्तपणें[2] ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी भावहीन जीव । ह्मणउनी देव दुरे दुरी ॥ ३ ॥

॥ १७४ ॥

नाहीं उल्लंघिलें कोणाचें वचन । मज कां नारायण दुरी जाला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंशंकितें[3] मनें करीं आळवण । नाहीं समाधान निश्चितीचें ॥ ध्रु ॥
दासांचा विसर हें तों अनुचित । असे[4] सर्व नीत पायांपाशीं ॥ २ ॥
तुका ह्मणे तुह्मां लाज येत नाहीं । आह्मां चिंताडोहीं बुडवितां ॥ ३ ॥

॥ १७५ ॥

जीव जायवरी सांडी करी माता । हे तों आश्चर्यता बाळकाची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दुर्बळ कीं नाहीं आइकत कानीं । काय नारायणीं न्यून जालें ॥ध्रु॥
क्षणक्षणा माझा नें[5] घ्यावा सांभाळ । अभाग्याचा काळ ऐसा आला ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं वचनासी[6] रुचि । फल कटवें चि तें तें होय ॥ ३ ॥

॥ १७६ ॥

ह्मणउनी दास नव्हे ऐसा जालों । अनुभवें बोलों स्वामीपुढें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कां नाहीं वचन प्रतिउत्तराचें । मी च माझ्या वेचें अट्टाहासें[7] ॥ ध्रु ॥
कासयानें गोडी उपजावा विश्वास । प्रीती कांहीं रस वांचुनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे अगा चतुरा शिरोमणी । विचारावें मनीं केशीराजा ॥ ३ ॥

---

१ पं. धरूनि.—२ पं. आप्तपणें.—३ पं. आशंकित मनें. दे. शंकितमनें.—४ पं. असो.—५ दे. ने घावा.—६— पं. वचनाची.—७ पं. अट्टाहस्यें त. आटाहास्यें.

॥ १७७ ॥

काय आतां आह्मीं पोट चि भरावें । जग चाळवावें भक्त ह्मूण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा तरि एक सांगा जी विचार । बहु होतों फार कासावीस॥ध्रु.॥
काय कवित्वाची घालूनियां रूढी । करूं जोडाजोडी अक्षरांची ॥ २ ॥
तुका ह्मणे काय [1]गुंपोनि दुकाना । राहों नारायणा करुनी घात ॥ ३ ॥

॥ १७८ ॥

वर्म तरि आह्मां दावा । काय देवा जाणें मी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बहुतां रंगीं हीन जालों । तरि आलों शरण ॥ ध्रु. ॥
घाल जरि तुह्मी धीर । होईल स्थिर मन ठायीं ॥ २ ॥
तुका ह्मणे सत्ताबळें । लडिवाळें राखावीं ॥ ३ ॥

॥ १७९ ॥

[2]सांगों काय नेणा देवा । बोलाची त्या आवडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वांयां मज चुकुर करा । विश्वंभरा विनोदें ॥ ध्रु. ॥
आवडीच्या करा ऐसें । अंतर्वासें जाणतसां ॥ २ ॥
तुका ह्मणे समाधानें । होइन मनें मोकळा ॥ ३ ॥

॥ १८० ॥

निर्धाराचें अवघें गोड । वाटे कोड कौतुक ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बैसलिया भाव पांयीं । बरा तई नाचेन ॥ ध्रु. ॥
स्वामी कळे सावधान । तरि मन उल्हासे ॥ २ ॥
तुका ह्मणे आश्वासावें । प्रेम द्यावें विठ्ठले[3] ॥ ३ ॥

---

१ पं. गुफोनि.—२ पं. सांगों देवा नेणा काय । बोलाचिये आवडी ॥ ३ त. विठ्ठलें.

॥ ९८१ ॥

जाली तडातोडी । अवघीं पडिलों[1] उघडीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नव्हों कोणांची च कांहीं । तुझे भरलिया वाहीं ॥ ध्रु ॥
पारुषेला[2] संवसार । मोडली बैसण्याची थार ॥ २ ॥
आतां ह्मणे तुका । देवा अंतरें राखों नका ॥ ३ ॥

॥ ९८२ ॥

आधार तो व्हावा । ऐसी आस करीं देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मांपाशीं काय उणें । काय वेचे समाधानें ॥ ध्रु ॥
सेवेच्या अभिलाषें[3] । मन बहु जालें पिसें ॥ २ ॥
अरे भक्तपराधीना । तुका ह्मणे नारायणा ॥ ३ ॥

॥ ९८३ ॥

तुमचा तुह्मीं[4] केला गोवा । आतां चुकवितां देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कैसें सरे चाळवणें । केलें काशाला शाहाणें ॥ ध्रु ॥
कासया[5] रूपा । नांवा आलेति गा बापा ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां । न सरे हवाले घालितां ॥ ३ ॥

॥ ९८४ ॥

माझी भक्ती भोळी । एकाविध भावबळी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मी कां पडेन निराळा । ऐसा सांडूनि सोहळा ॥ ध्रु ॥
आतां अनारिसा । येथें न व्हावें सहसा ॥ २ ॥
तुका ह्मणे जोडुनि पाय । पुढें उगा उभा राहें ॥ ३ ॥

---

१ पं. पडिली.–२ दे. पारुशला.–३ दे. अभिळासे.–४ पं. आह्मी.–५पं. कासया हो रूपा.

॥ १८५ ॥

आहे तरि सत्ता । ऐशा करितों वारता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अंगसंगाचीं उत्तरें । सलगीसेवेनें लेंकरें ॥ ध्रु ॥
तरी निकटवासें । असों [1]आशंकेच्या नासें ॥ २ ॥
तुका ह्मणे रुची । येथें भिन्नता कैची ॥ ३ ॥

॥ १८६ ॥

काळ सारावा चिंतनें । एकांतवासीं गंगास्नानें ।
देवाचें पूजन । प्रदक्षणा [2]तुळसीच्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ युक्त आहार [3]विहार । नेम [4]इंद्रियांचा सार ।
नसावी बासर । निद्रा बहु भाषण ॥ ध्रु ॥
परमार्थ महाधन । जोडी देवाचे चरण ।
[5]व्हावया जतन । हे उपाय लाभाचे ॥ २ ॥
देह समर्पिजे देवा । भार कांहीं च न घ्यावा ।
होईल आघवा । तुका ह्मणे आनंद ॥ ३ ॥

॥ १८७ ॥

मऊ [6]मेणाहून आह्मी विष्णुदास । कठिण वज्रास भेदूं ऐसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मेले जित असों [7]निजोनियां जागे । जों[8] जो जें जें मागे तें तें देऊं ॥ ध्रु ॥
भले तरि देऊं गांडीची लंगोटी । [9]नाठ्याळा चि गांठी देऊं माथां ॥ २ ॥
मायबापाहूनि बहु मायावंत । करूं घातपात शत्रूहूनि ॥ ३ ॥
अमृत तें काय गोड आह्मांपुढें । विष तें बापुडें कडू किती ॥ ४ ॥

---

१ दे. पं. अशंकेच्या.—२ पं. तुळसीची.—३ दे. वेहार. त. वेऽहार.—४ पं. इंद्रियासीसार.—५ त. करावया.—६ दे. मेनाहूनि.७ त. निजेलिया.—८ दे. त. जो जो जो जें मागे.—९ त. नाठ्याळाचा. पं. नाटाळाचे काटी.

तुका ह्मणे आह्मी अवघे चि गोड । ज्याचें पुरे कोड त्याचेपरि ॥ ५ ॥

॥ १८८ ॥

गाढवाचें तानें । पालटलें क्षणक्षणें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तैसे अधमाचे गुण । एकविध नाहीं मन ॥ ध्रु ॥

उपजतां बरें दिसे । रूप वाढतां तें नासे ॥ २ ॥

तुका ह्मणे भुंकते वेळे । वेळ अवेळ न कळे ॥ ३ ॥

॥ १८९ ॥

विटाळ तो परद्रव्य परनारी । येथुनि जो दुरी तो सोंवळा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ गेद्यें पद्यें कांहीं न धरावी उपाधी । स्वाधीन चि बुद्धि करुनी ठेवा ॥ ध्रु ॥

विचाराचें कांहीं करावें स्वहित । पापपुण्यांचीत भांडवल ॥ २ ॥

तुका ह्मणे न लगे जावें वनांतरा । विश्व विश्वंभरा सारिखें चि ॥ ३ ॥

॥ १९० ॥

कल्पतरु रुया नव्हती बाभुळा । पुरविती फळा ईच्छितिया ॥ १ ॥

उदंड त्या गाई ह्मैसी आणि शेळ्या । परि त्या निराळ्या कामधेनु ॥ २ ॥

तुका ह्मणे देव दाखवील दृष्टी । तया सर्वें भेटी थोर पुण्य ॥ ३ ॥

॥ १९१ ॥

जळो प्रेमा तैसा रंग । जाय उडोनि पतंग ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ सासूसाटीं रडे सून । भाव अंतरींचा भिन्न ॥ ध्रु ॥

मैंद मुखींचा कोंवळा । भाव अंतरीं निराळा ॥ २ ॥

जैसी वृंदावनकांती । उत्तम धरूं नये हातीं ॥ ३ ॥

---

१ पं. येथूनि दुरी तो सोवळा.—२ पं. गद्य पद्य.—३ त. पापपुण्याचीत पं. पापपुण्यावि.—४ पं इच्छी तया.—५ दे. भुलोनि.—६ दे. धरूं ये हातीं.

बक ध्यान धरी । सोंग करूनि मासे मारी ॥ ४ ॥
तुका ह्मणे सर्प डोले । तैसा कथेमाजी खुले ॥ ५ ॥

॥ ९९२ ॥

वेशा नाहीं बोल अवगुण दूषीले । ऐशा बोला भले झणें[२] क्षोभा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोण नेणे अन्न जीवाचें जीवन । विषमेळवण विष होय ॥ ध्रु ॥
सोनें शुद्ध नेणे कोण हा विचार । डांकें हीनें[३]वर केलें त्यासी ॥ २ ॥
याती शुद्ध परि अधम लक्षण । वांयां गेलें तेणें सोंगें[४] ही तें ॥ ३ ॥
तुका ह्मणे शूर तो चि पावे मान । आणीक मंडण भार वाही ॥ ४ ॥

॥ ९९३ ॥

अणुरणीयां[५] थोकडा । तुका आकाशाएवढा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गिळुनि सांडिलें कळिवर[६] । भव भ्रमाचा आकार ॥ ध्रु ॥
सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटीं ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां । उरलों उपकारापुरता ॥ ३ ॥

॥ ९९४ ॥

धन्य आजि दिन । जालें संतांचें दर्शन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जाली पापातापा तुटी । दैन्य गेलें उठाउठीं ॥ ध्रु ॥
जालें समाधान । पायीं विसांवलें मन ॥ २ ॥
तुका ह्मणे आले घरा । तो चि दिवाळीदसरा ॥ ३ ॥

॥ ९९५ ॥

हें चि माझें धन । तुमचे वंदावे चरण ॥ १ ॥

---

१ पं. धरूनि —२ पं. झणी.—३ पं. हीणवर.—४ पं. सोंगहीत.—५ पं. अणुरेणुया.—६ पं. कलीवर.

॥ ध्रु. ॥ येणें मार्गें असों जीत । एवढें समर्पूनी चित्त ॥ ध्रु ॥
सांभाळिलें देवा । मज अनाथा जी जीवा ॥ २ ॥
जोडूनियां कर । तुका विनवितो किंकर ॥ ३ ॥

॥ ११६ ॥

फजितखोरा मना किती तुज सांगों ।
नको कोणा लागों मागें मागें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ स्नेहवादें दुःख जडलेंसे[1] अंगीं ।
निष्ठुर हें जगीं प्रेमसुख ॥ ध्रु ॥
निंदास्तुति कोणी करो दयामाया[2] ।
न[3] धरीं चाड या सुखदुःखें ॥ २ ॥
योगिराज कां रे न राहाती बैसोनी ।
एकिये आसनीं या चि गुणें ॥ ३ ॥
तुका ह्मणे मना पाहें विचारून ।
होईं रे कठिण वज्राऐसें[4] ॥ ४ ॥

॥ ११७ ॥

जळो माझी ऐसी बुद्धी । मज घाली तुजमधीं ।
आवडी हे विधि । निषेधीं चि चांगली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तूं स्वामी मी सेवक । उंच[5] पद निंच एक ।
ऐसें करावें कौतुक । नको करूं खंडणा ॥ ध्रु ॥
जळ न खाती जळा । वृक्ष आपुलिया फळा ।

---

१ पं. जडलें हें आगीं.—२ दे. त. दयामया.—३ पं. न धरीं चाड तया सुखदुःखा.—४ त. पं. वज्रऐसा.—५ पं. उंचनिच पद एक.

भोक्ता निराळा । तेणें गोडी निवडिली ॥ २ ॥
हिरा शोभला कोंदणें । अळंकारीं मिरवे सोनें ।
एक असतां तेणें । काय दुजें जाणावें ॥ ३ ॥
उष्णें छाये सुख वाटे । बाळें माते पान्हा फुटे ।
एका एक भेटे । कोण सुख ते काळीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे हित । हें चि मानी माझें चित्त ।
नव्हे आतां मुक्त । ऐसा जाला भरवसा ॥ ५ ॥

॥ ११८ ॥

मनीं वसे त्याचें आवडे उत्तर । वाटे समाचार घ्यावा ऐसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जातीचें तें झुरे[1] येर येरासाटीं । वियोगें हीं[2] तुटी नेघे कधीं ॥ ध्रु ॥
भेटीची अपेक्षा वा[3]रता आदर । पुसे नव्हे धीर मागुतालें ॥ २ ॥
तुका ह्मणे मांझ्या जीवाचें जीवन । सोइरे हरिजन प्राणसखे ॥ ३ ॥

॥ ११९ ॥

नव्हे आरागूक परि मनीं वाहे । होईल त्या सां[4]हे पांडुरंग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पंढरीसि जावें उद्वेगें[5] मानसीं । धरिल्या पावसी संदेह नाहीं ॥ ध्रु ॥
नसो बळ देह असो पराधीन । परि हें चिंतन टाकों नको ॥ २ ॥
तुका ह्मणे देह पडो या चिंतनें । पुढें[6] लागे येणें याजसाटीं ॥ ३ ॥

---

१ पं. झुरे येरा०.–२ पं हे–३ दे त. वरता आदर.–४ पं. साह्ये.–५ दे. उदेग. त. उद्वेग.–६ पं. पुढतीलागे०.

॥ १००० ॥

कोठें देवा आलें अंगा थोरपण । बरें होतें[1] दीन होतों तरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ साधन ते सेवा संतांची उत्तम । आवडीनें नाम गाईन तें[2] ॥ छ ॥
न पुसतें कोणी कोठें ही असतां । समाधान चित्ताचिया सुखें ॥ २ ॥
तुका ह्मणे जन अव्हेरितें मज । तरी केशीराज सांभाळिता ॥ ३ ॥

॥ १००१ ॥

चतुर मी जालों आपुल्या मौवता । भावेंविण रिता फुंजें[3] अंगीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां पुढें वांयां जावें हें तें काई । कामक्रोधें ठायीं वास केला ॥ छ ॥
गुणदोष आले जगाचे अंतरा । भूताच्या मत्सरावरी बुद्धि ॥ २ ॥
तुका ह्मणे करूं उपदेश लोकां । नाहीं जालों एका[4] परता दोषा ॥ ३ ॥

॥ १००२ ॥

धन्य ते संसारीं । दयावंत जे अंतरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येथें उपकारासाठीं । आले घर ज्यां वैकुंठीं[5] ॥ छ ॥
लटिकें वचन । नाहीं देहीं उदासीन ॥ २ ॥
मधुरा वाणी ओटीं । तुका ह्मणे वाव पोटीं ॥ ३ ॥

॥ १००३ ॥

कुंटल्याविण[6] नव्हे मांडा । अळसें धोंडा पडतसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ राग नको धरूं मनीं । गांडमणी[7] सांगतों ॥ छ ॥
तरटापुढें बरें नाचे । सुतकाचें मुसळ ॥ २ ॥

---

१ पं. होतों.—२ पं. गाईजेतें.—३ पं स्फुंद.—४ पं. एका दोषा परता.—५ दे. वैकठीं.—
६ पं. कांडिल्या कुटिल्या होतो मांडा ।.—७ त. गांडमनी.

तुका ह्मणे कोठी सार । करी फार शाहाणें ॥ ३ ॥

॥ १००४ ॥

कळों येतें तरि कां नव्हे । पडती गोवे भ्रमाचे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जाणतां चि होतो घात । परिसा मेत देवा हें ॥ ध्रु ॥
आंविसासाटीं फासा मान । पाडी धनइच्छा ते ॥ २ ॥
तुका ह्मणे होणार खोटें । कर्म मोटें बळिवंत ॥ ३ ॥

॥ १००५ ॥

मोकळें मन रसाळ वाणी । या चि गुणीं संपन्न ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लक्ष्मी ते ऐशा नावें । भाग्यें ज्यावें तरि त्यांनीं ॥ ध्रु ॥
नमन नम्रता अंगीं । नेघे रंगीं पालट ॥ २ ॥
तुका ह्मणे त्याच्या नांवें । घेतां व्हावें संतोषी ॥ ३ ॥

॥ १००६ ॥

शेवटीची विनवणी । संतजनीं परिसावी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विसर तो न पडावा । माझा देवा तुह्मांसी ॥ ध्रु ॥
पुढें फार बोलों काई । अवघें पायीं विदित ॥ २ ॥
तुका ह्मणे पडिलों पायां । करा छाया कृपेची ॥ ३ ॥

॥ १००७ ॥

करितों कवित्व ह्मणाल हें कोणी । नव्हे माझी वाणी पदरींची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझिये युक्तीचा नव्हे हा प्रकार । मज विश्वंभर बोलवितो ॥ ध्रु ॥
काय मी पामर जाणे अर्थभेद । वदवी गोविंद तें चि वदें ॥ २ ॥

---

१ पं. काठी सार.–२ पं. मात देवा हे.–३ "आमिशासाटीं" असें असावें.

निमित्त मापासी बैसविलों आहें । मी तों कांहीं नव्हे स्वामिसत्ता ॥ ३ ॥
तुका ह्मणे आहें पाईक चि खरा । वागवितों मुद्रा नामाची हे ॥ ४ ॥

॥ १००८ ॥

आह्मीं गावें तुह्मीं कोणीं कांहीं न ह्मणावें ।
ऐसें तंव आह्मां सांगितलें नाहीं देवें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणा रामराम टाळी वाजवा हातें ।
नाचा डोला प्रेमें आपुलिया स्वहितें ॥ ध्रु. ॥
सहज घडे तया आळस करणें तें काई ।
अग्नीचें भातुकें हात पोळितां कां पायीं ॥ २ ॥
येथें नाहीं लाज भक्तिभाव लौकिक ।
हांसे तया घडे ब्रह्महत्यापातक ॥ ३ ॥
जया जैसा भाव निरोपण करावा ।
येथें नाहीं चाड ताळविताळ या देवा ॥ ४ ॥
सदैव ज्यां कथा काळ घडे श्रवण ।
तुका ह्मणे येर जन्मा आले पाषाण ॥ ५ ॥

॥ १००९ ॥

देव घ्या कोणी देव घ्या कोणी । आइता आला घर पुसोनी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देव न लगे देव न लगे । सांटवणेचे रुधले जागे ॥ ध्रु. ॥
देव मंदला देव मंदला । भाव बुडाला काय करूं ॥ २ ॥
देव घ्या फुका देव घ्या फुका । न लगे रुका मोल कांहीं ॥ ३ ॥

---

१ त. पं. निमित्यें.—२ पं. ना नाचा.—३ त. पोळितां.—४ पं. सांटवणाचे.

दुबळा तुका भावेंविणें[1] । उधारा देव घेतला ह्मणें ॥४ ॥

॥ १०१० ॥

विष्णुमय सर्व वैष्णवांसी ठावें । येरांनीं वाहावे भार माथां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ साधनें संकटें सर्वांलागीं सीण । व्हावा लागे क्षीण अहंमान[2] ॥ध्रु॥
भाव हा कठीण वज्र हें भेदवे । परि न छेदवे मायाजाळ[3] ॥ २ ॥
तुका ह्मणे वर्म भजनें चि सांपडे । येरांसी तों पडे ओस दिशा ॥ ३ ॥

॥ १०११ ॥

कीर्तनाची गोडी । देव निवडी आपण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोणी व्हा रे अधिकारी । त्यासी हरि देईल ॥ ध्रु ॥
वैराग्याचे बळें[4] । साही खळ जिणावे ॥ २ ॥
उरेल ना उरी । तुका करी बोभाट ॥ ३ ॥

॥ १०१२ ॥

कायावाचामन ठेविलें गाहाण । घेतलें तुझें रिण जोडीलागीं ॥ १ ॥
॥ध्रु.॥ अवघें आलें आंत पोटा पडिलें थीतें । सारूनि निश्चितें[5] जालों देवा ॥ध्रु॥
द्यावयासी आतां नाहीं तोळा मासा । आधील मवेशा तुज ठावी ॥ २ ॥
तुझ्या रिणें गेले बहुत बांधोन । जाले मजहून थोरथोर ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुझे खतीं जें गुंतलें । करूनि आपुलें घेईं देवा ॥ ४ ॥

ध्रुवक-अभंग २८.

॥ १०१३ ॥

करिसी कीं न करिसी माझा अंगीकार । हा मज विचार पडिला देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देसी कीं न देसी पायांचें दर्शन । ह्मणऊनि मन स्थिर नाहीं ॥ध्रु॥

---

१ पं. भावहीन.–२ त. अहंभाव.–३ त. मायाजाळा.–४ त. बळ.–५ पं. निश्चींत.

बोलसी कीं न बोलसी मजसवें देवा । ह्मणोनियां जिवा भय वाटे ॥ २ ॥
होईल कीं[1] न होय तुज माझा आठव । पडिला संदेह हा चि मज ॥ ३ ॥
तुका ह्मणे मी[2] तों कमाईचें हीण । ह्मणऊनि सीण करीं देवा ॥ ४ ॥

॥ १०१४ ॥

ऐसा माझा कोण आहे भीडभार । नांवाचा मी फार वांयां गेलों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय सेवा रुजु आहे सत्ताबळ । तें मज राउळ कृपा करी ॥ ध्रु. ॥
काय याती शुद्ध आहे कुळ कर्म । तेणें पडे वर्म तुझे ठायीं ॥ २ ॥
कोण तपोनिध दानधर्मसीळ । अंगीं एक बळ आहे सत्ता ॥ ३ ॥
तुका ह्मणे वांयां जालों भूमी भार । होईल विचार काय नेणों ॥ ४ ॥

॥ १०१५ ॥

साच मज काय कळों नये देवा । काय तुझी सेवा कोंय[3] नव्हे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करावें तें बरें जेणें[4] समाधान । सेवावें हें वन न बोलावें[5] ॥ ध्रु. ॥
शुद्ध माझा भाव होइल तुझे पायीं । तरि च हें देई निवडूनि ॥ २ ॥
उचित अनुचित कळों आली गोष्टी । तुझे कृपादृष्टी पांडुरंगा ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज पायांसवें चाड । सांगसी तें गोड आहे मज ॥ ४ ॥

॥ १०१६ ॥

नाहीं कांटाळलों परि वाटे भय । करावें तें काय न कळतां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जन वन आह्मां समान चि जालें । कामक्रोध गेले[6] पावटणी ॥ ध्रु. ॥
षडऊर्मी शत्रु जिंतिले[7] अनंता । नामाचिया सत्ताबळें तुझ्या ॥ २ ॥

---

१ पं. कीं नव्हे तुज०.—२ दे. मी कमाईचे. पं. कमाईचा.— ३ दे. त. काहे.— ४ त. जनसमाधान.—५ पं. बोलवे.—६ प. केले.—७ पं. जिंकिले.

मुख्य धर्म आह्मां सेवकांचा ऐसा । स्वामी करी शिरसा पाळावें तें ॥ ३ ॥
ह्मणऊनि तुका अवलोकुनी पाय । वचनाची पाहे वास एका ॥ ४ ॥

॥ १०१७ ॥

वांयांविण वाढविला हा लौकिक । आणिला लटिक वाद दोघां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं ऐसा जाला देव माझ्या मतें । भुकेलें जेवितें काय जाणे ॥ ध्रु ॥
शब्दज्ञानें गौरविली हे वैखरी । साच तें अंतरीं बिंबे चि ना ॥ २ ॥
जालों परदेशी गेले दोन्ही ठाय । संसार ना पाय तुझे देवा ॥ ३ ॥
तुका ह्मणे मागें कळों येतें ऐसें । न घेतों हें पिसें लावूनियां ॥ ४ ॥

॥ १०१८ ॥

न कळे तत्त्वज्ञान मूढ माझी मती । परि ध्यातों चित्तीं चरणकमळ ॥१॥
॥ ध्रु. ॥ आगमाचे भेद मी तों[1] काय जाणें । काळ तो चिंतनें सारीतसें ॥ ध्रु ॥
कांहीं नेणें परि ह्मणवितों दास । होइल त्याचा त्यास अभिमान॥ २ ॥
संसाराची सोय सांडिला मारग । दुराविलें जग एका घायें ॥ ३ ॥
मागिल्या लागाचें केलेंसे खंडण । एकाएकीं मन राखियेलें ॥ ४ ॥
तुका ह्मणे अगा र[2]खुमादेवीवरा । भ[3]क्तकरुणाकरा सांभाळावें ॥ ५ ॥

॥ १०१९ ॥

इतुलें करीं देवा ऐकें हे वचन । समूळ अभिमान जाळीं माझा ॥ १ ॥

---

१ दे. मी काय०. त. मी तें काय०.—२ पं. रुक्मादेवीवरा.—३ पं. आतां करुणाकरा.

॥ ध्रु. ॥ इतुलें करीं देवा ऐकें हे गोष्टी । सर्व समदृष्टी तुज देखें ॥ध्रु॥

इतुलें करीं देवा विनवितों तुज । संतांचे[1] चरणरज वंदीं माथां ॥ २ ॥

इतुलें करीं देवा ऐकें हे मात । हृदयीं पंढरीनाथ दिवसेरात्रीं[2] ॥ ३ ॥

भलतिया भावें तारीं पंढरीनाथा । तुका ह्मणे आतां शरण आलों ॥ ४ ॥

॥ १०२० ॥

तुझा दास ऐसा ह्मणती लोकपाळ । ह्मणऊनि सांभाळ करीं माझा ॥ १ ॥

॥ध्रु.॥ अनाथाचा नाथ पतितपावन । हें आतां जतन करीं नाम ॥ ध्रु ॥

माझे गुण दोष पाहातां न लगे[3] अंत । ऐसें माझें चित्त मज ग्वाही ॥ २ ॥

नेणें तुझी कैसी करावी हे[4] सेवा । जाणसी तूं देवा अंतरींचें ॥ ३ ॥

तुका ह्मणे तूं या[5] कृपेचा सिंधु । तोडीं भवबंधु माझा देवा ॥ ४ ॥

॥ १०२१ ॥

जाणावें तें काय नेणावें तें काय । ध्यावे तुझे पाय हें चि सार ॥ १ ॥

॥ध्रु.॥ करावें तें काय न करावें तें काय । ध्यावे तुझे पाय हें चि सार ॥ध्रु॥

बोलावें तें काय न बोलावें तें काय । ध्यावे तुझे पाय हें चि सार ॥ २ ॥

जावें तें कोठें न[6] जावें तें आतां । बरवें आठवितां नाम तुझें ॥ ३ ॥

तुका ह्मणे तूं करिसी तें सोपें । पुण्यें होती पापें आमुच्या मतें[7] ॥ ४ ॥

॥ १०२२ ॥

नको ब्रह्मज्ञान आत्मस्थितिभाव । मी भक्त तूं देव ऐसें करीं ॥ १ ॥

ध्रु० ॥ दावीं रूप मज गोपिकारमणा । ठेवीन[8] चरणांवरी माथा ॥ ध्रु ॥

पाहोनि श्रीमुख देइन आलिंगन । जीवें निंबलोण उतरीन ॥ २ ॥

---

१ पं. संतचरणरज०.—२ पं. दिवसराती.—३ पं. कळे.—४ पं. ते.—५ पं तू कृपेचा०.—६ दे. न वजावें आतां.—७ पं. मतीं.—८ पं. ठेवूंद.

पुसतां सांगेन हितगुज मात । बैसोनि एकांत सुखगोष्टी ॥ ३ ॥
तुका ह्मणे यासी न लावीं उशीर ॥ माझें अभ्यंतर जाणोनियां ॥ ४ ॥

॥ १०२३ ॥

मागें शरणागत तारिले बहुत । ह्मणती दीनानाथ तुज देवा ॥ १ ॥
॥धु.॥ पाहिले अपराध नाहीं याती कुळ। तारिला अजामेळ गणिका भिल्ली ॥ ध्रु ॥
अढळपदीं बाळ बैसविला धुरु । क्षीराचा सागरु उप[1]मन्या ॥ २ ॥
गजेंद्रपशु नाडियें[2] जळचरें । भवसिंधुपार उतरिला ॥ ३ ॥
प्रल्हाद अग्नींत राखिला जळांत[3] । विषाचें अमृत तुझ्या नामें ॥ ४ ॥
पांडवां संकट पडतां जडभारी । त्यांचा तूं कैवारी नारायणा ॥ ५ ॥
तुका ह्मणे तूं या अनाथाचा नाथ । ऐकोनियां मात शरण आलों ॥ ६ ॥

॥ १०२४ ॥

तुझा शरणागत जालों मी अंकित । करीं माझें हित पांडुरंगा ॥ १ ॥
॥ धु. ॥ पतितपावन तुझी ब्रीदावळी । ते आतां सांभाळीं मायबापा ॥ध्रु॥
अनाथाचा नाथ [4]बोलतील संत । ऐकोनियां मात विश्वासलों ॥ २ ॥
न करावी निरास न धरावें उदास । देईं याचकास कृपादान ॥ ३ ॥
तुका ह्मणे मी तों पातकांची रासी । देईं पायापासीं ठाव देवा ॥ ४ ॥

॥ १०२५ ॥

सर्वस्वाचा त्याग तो सदा सोंवळा । न लिंपे विटाळा अग्नि जैसा ॥ १ ॥
॥ धु.॥ सत्यवादी करी[5] संसार सकळ । अ[6]लिप्त कमळ जळीं जैसें[7] ॥ ध्रु ॥
घडे ज्यां उपकार भू[8]तांची ते दया । आत्मस्थिति तया अंगीं वसे ॥ २ ॥

---

१ दे. त. उपमन्थे.—२ पं. नाडिला.—३ त. पं. जळत.—४ पं. बोलती ते.—५ पं. करितां.—६ पं. अलिप्त तो जळकमळ जैसा.—७ त. तैसें—८ त. भूताची हे दया. हे भूतांची दया.

नो [1]बोले गुणदोष नाइके जो कानीं । वर्तोनि तो जनीं जनार्दन ॥ ३ ॥
तुका ह्मणे वर्म जाणितल्याविण । पावे करितां सीण सांडीमांडी ॥ ४ ॥

॥ १०२६ ॥

कुळधर्म ज्ञान कुळधर्म साधन । कुळधर्मैं निधान हातीं चढे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ [2]कुळधर्म भक्ति कुळधर्म गति । कुळधर्म विश्रांति पाववील ॥ध्रु॥
[3]कुळधर्म दया कुळधर्म उपकार । कुळधर्म सार साधनाचें ॥ २ ॥
[4]कुळधर्म महत्त्व कुळधर्म मान । कुळधर्म पावन परलोकींचें ॥ ३ ॥
तुका ह्मणे कुळधर्म दावी देवीं देव । यथाविध भाव जरीं होय ॥ ४ ॥

॥ १०२७ ॥

पुण्य परउपकार पाप ते परपीडा । आणीक नाहीं जोडा दुजा यासी ॥१॥
॥ ध्रु. ॥ सत्य तो चि धर्म असत्य तें कर्म । आणीक हें वर्म नाहीं दुजें ॥ध्रु॥
गति ते चि मुखीं नामाचें स्मरण । अधोगति जाण विं[5]न्मुखता ॥ २ ॥
संतांचा संग[6] तो चि स्वर्गवास । नर्क तो उदास अ[7]नर्गळा ॥ ३ ॥
तुका ह्मणे उघडें आहे हित घात । जयाचें उचित करा तैसें ॥ ४ ॥

॥ १०२८ ॥

न वजे वांयां कांहीं ऐकतां हरिकथा । आपण करितां वांयां न वजे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ न वजे वांयां कांहीं देवळासी जातां । देवासी पूजितां वांयां न वजे ॥ध्रु॥
न वजे वांयां कांहीं केलिया[8] तीर्थ । अथवा कां [9]व्रत वांयां न वजे ॥ २ ॥
न वजे वांयां जालें संतांचें दर्शन । शुद्ध आचरण वांयां न वजे ॥ ३ ॥
तुका ह्मणे भाव असतां नसतां । सायास करितां वांयां न वजे ॥ ४ ॥

---

१ प. न. त. ना.—२ त. पं. कुळधर्में भक्ति कुळधर्में गति.—३ त. पं. कुळधर्में दया कुळधर्में उपकार.—४ त. पं. कुळधर्में महत्व कुळधर्में मान.—५ दे. त. विन्मुखते.—६ त. सांगात.—७ पं. अनर्गळ.—८ पं. केलियाही तीर्थ. त. केलिया तीर्थें.—९ त. व्रतें.

॥ १०२९ ॥

चित्तीं धरीन मी पाउलें सकुमार[1] । सकळ बिढार संपत्तीचें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ कंठीं धरिन मी[*] नाम अमृताची वल्ली । होईल राहिली शीतळ तनु ॥ध्रु॥
पाहेन श्रीमुख साजिरें सुंदर । सकळां अगर लावण्यांचें ॥ २ ॥
करिन अंगसंग बाळकाचे परी । बैसेन तों वरी नुतरीं[2] कडिये ॥ ३ ॥
तुका ह्मणे हा केला तैसा होय । धरिली मनें सोय विठोबाची ॥ ४ ॥

॥ १०३० ॥

बाळ मातेपाशीं सांगे तानभूक । उपायाचें दुःख काय जाणे ॥ १ ॥ ध्रु०॥
तयापरी करीं पाळण हें माझें । घेऊनियां ओझें सकळ भार ॥ ध्रु ॥
कासया गुणदोष आणिसील मना । सर्व नारायणा अपराधी ॥ २ ॥
सेवाहीन दीन पातकांची रासी । आतां विचारिसी काय ऐसें ॥ ३ ॥
जेणें काळें पायीं अनुसरलें[3] चित्त । निर्धार हें हित जालें ऐसें ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुह्मी तारिलें बहुतां । माझी कांहीं चिंता असों[4] दे वो ॥ ५ ॥

॥ १०३१ ॥

जीवनावांचूनि तळमळी मासा । प्रकार हा तैसा होतो जीवा ॥ १ ॥
॥ ध्रु० ॥ न संपडे जालें भूमिगत धन । चरफडी मन तयापरी ॥ ध्रु ॥
मातेचा वियोग जालिया[5] हो बाळा । तो कळवळा जाणा देवा ॥ २ ॥
सांगावे ते किती तुह्मांसी प्रकार । सकळांचें सार पाय दावीं ॥ ३ ॥
ये चि चिंते माझा करपला भीतर । कां नेणों विसर पडिला माझा[6] ॥ ४ ॥
नुका ह्मणे तूं हें जाणसी सकळ । यावरि कृपाळ होईं देवा ॥ ५ ॥

---

१ दे. त. सकुमारें.—२ पं नुतरे. त. नुतर.—३ पं. अनुसलें.—४ असों द्यावी.—५ पं. जाह।ळिया बाळा । होतो कळवळा.—६ पं. दे॥.— * पं. "मी" हा शब्द नाहीं.

॥ १०३२ ॥

शरण आलें त्यासी न दावीं हे पाठी । ऐका जगजेठी विज्ञापना ॥ १ ॥
॥धु.॥ अळविती तयांसी उत्तर झडकरी । द्यावें परिसा हरी विज्ञापना ॥धृ॥
गांजिलियाचें करावें धांवणें । विनंती नारायणें परिसावी हे ॥ २ ॥
भागलियाचा होई रे विसांवा । परिसावी केशवा विज्ञापना ॥ ३ ॥
अंकिताचा भार वागवावा माथां । परिसावी अनंता विज्ञापना ॥ ४ ॥
तुका ह्मणे आह्मां विसरावें ना देवा । परिसावी हे देवा विज्ञापना ॥ ५

॥ १०३३ ॥

कोण आह्मां पुसे सिणलें भागलें । तुजविण उगलें पांडुरंगा ॥ १ ॥
॥ धु. ॥ कोणापाशीं आह्मीं सांगावें सुखदुःख । कोण तानभूक निवारील ॥ धृ ॥
कोण या तापाचा करील परिहार । उतरील पार कोण दुजा ॥ २ ॥
कोणापें इच्छेचें मागावें भातुकें । कोण कवतुकें बुझावील ॥ ३ ॥
कोणावरी आह्मीं करावी हे सत्ता । होईल साहाता कोण दुजा ॥ ४ ॥
तुका ह्मणे अगा स्वामी सर्व जाणां । दंडवत चरणां तुमच्या देवा ॥५॥

॥ १०३४ ॥

तेव्हां धालें पोट बैसलों पंगती । आतां आह्मां मुक्तिपांग काई ॥१॥
॥ धु. ॥ धांवा केला आतां यई वो धांवोन। येथें काई करणें न लगे संदेह ॥ धृ ॥

---

१ पं शरण आली त्यासी ने दावी पाठी. त. न दावी.— २ पं. देवा — ३ पं. पारेसावी केशव.—४ प मांगों.—५ पं. ताहान —६ भार —७ दे. होईल धावगे । तया कायी करणें लागे मध्या ॥ त. तया काई करणें लागे संदेह ॥

गायनाचा आतां कोठें उरला काळ । आनंदें सकळ भरीं आलें ॥२॥
देवाच्या सख्यत्वें विषमासी ठाव । मध्यें कोठें वाव राहों सके ॥ ३ ॥
तेव्हां जाली अवघी बाधा वाताहात । प्रेम ह्रदयांत प्रवेशलें ॥ ४ ॥
तुका ह्मणे आह्मीं जिंतिलें भरवसा । देव कोठें दासा मोकलितो ॥५॥

॥ १०३५ ॥

तरि कां पवाडे गर्जती पुराणें । असता नारायण शक्तिहीन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कीर्तीविण नाहीं नामाचा डांगोरा । येर कां इतरां वाणीत ना
॥ ध्रु. ॥
तरि च ह्मणा तो आहे चिरंजीव । केलियाचा जीव सुखीं गुण ॥ २ ॥
चांगलेंपण हें निरुपमता अंगीं । बाणलें श्रीरंगीं ह्मणऊनि ॥ ३ ॥
तरि च हा थोर सांगितलें करी । अभिमान हरीपाशीं नाहीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे तरि करिती याची सेवा । देवापाशीं हेवा नाहीं कुडें ॥५॥

॥ १०३६ ॥

अविट हें क्षीर हरिकथा माउली । सेविती सेविली वैष्णवजनीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अमृत राहिलें लाजोनि माघारें । येणें रसें थोरें ब्रह्मानंदें ॥ध्रु.॥
पतित पातकी पावनपंगती । चतुर्भुज होती देवाऐसे ॥ २ ॥
सर्व सुखें तया मोहोरती ठाया । जेथें दाटणी या वैष्णवांची ॥ ३ ॥
निर्गुण हें सोंग धरिलें गुणवंत । धरूनियां प्रीत गाये नाचे ॥ ४ ॥
तुका ह्मणे केलीं साधनें गाळणी । सुलभ कीर्तनीं होउनि ठेला ॥ ५ ॥

---

१ पं आनंद.—२ त दे. निरुपायता—३पं सेविता सविली.—४ पं. मोहरती. त. मोहो
रती.—५ त. निर्गुण आकार झाला गुणवंत पं. हेंकडवें नाहीं.

॥ १०३७ ॥

संसारसोहळे भोगितां सकळ । भक्तां[1] त्याचें बळ विटोबाचें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ भय चिंता[2] धाक न मनिती मनीं । भक्तां चक्रपाणि सांभाळीत ॥ध्रु.॥
पापपुण्य त्यांचें धरूं न शके अंग । भक्तांसी श्रीरंग सर्वभावें ॥ २ ॥
नव्हती ते मुक्त आवडे संसार । देव भक्तां[3] भार सर्व वाहे ॥ ३ ॥
तुका ह्मणे देव भक्तां वेळाईत । भक्त तें[4] निश्चिंत त्याचियानें ॥ ४ ॥

॥ १०३८ ॥

देवासी अवतार भक्तांसी संसार । दोहींचा विचार एकपणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भक्तांसी सोहळे देवाचिया अंगें । देव त्यांच्या संगें सुख भोगी ॥ ध्रु. ॥
देवें भक्तां रूप दिलासे आकार । भक्तीं त्याचा पार वाखाणिला ॥ २ ॥
एका अंगीं दोन्ही जालीं हीं निर्माण । देवभक्तपण स्वामिसेवा ॥ ३ ॥
तुका ह्मणे येथें नाहीं भिन्नभाव । भक्त तो चि देव देव भक्त ॥ ४ ॥

॥ १०३९ ॥

हुंबरती गाये तयांकडे कान । कैवल्यनिधान देउनि ठाके ॥ १ ॥
॥ध्रु.॥ गोपाळांची पूजा उच्छिष्ट कवळीं । तेणें वनमाळी सुखावला ॥ध्रु.॥
चोरोनियां खाये दुध दहीं लोणी । भावें चक्रपाणि गोविला तो ॥ २ ॥
निष्काम तो जाला कामासी लंपट । गोपिकांची वाट पाहात बैसे ॥ ३ ॥
जगदानी इच्छी तुळसीएकदळ । भावाचा सकळ विकिला तो ॥ ४ ॥
तुका ह्मणे हें चि चैतन्य[5] सावळें । व्यापुनि निराळें राहिलेंसे ॥ ५ ॥

---

१ त. भक्तासी तें बळ विटोबाचें.–२ त. चित्तीं.–३ त्यांचा.–४ त. हे निश्चीत.–५ दे. चैतन्यें.

॥ १०४० ॥

समर्थासि नाहीं वर्णावर्णभेद । सामग्री ते सर्व[1] सिद्ध घरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आदराचे ठायीं बहु च आदर । मागितलें फार तेथें[2] वाढी ॥ध्रु॥
न ह्मणे सोइरा सुहृद[3] आवश्यक । राजा आणि रंक सारिखा[4] चि ॥ २ ॥
भाव देखे तेथें करी लडबड[5] । जडा राखे जड निराळें चि ॥ ३ ॥
कोणी[6] न विसंभे याचकाचा ठाव । विनवुनी देव शंका फेडी ॥ ४ ॥
तुका ह्मणे पोट भरुनी उरवी । धालें[7] ऐसें दावी अनुभवें[8] ॥ ५ ॥

॥ १०४१ ॥

आलें भरा केणें । येरझार[9] चुके जेणें ॥ १ ॥
॥ धु. ॥ उभें केलें विटेवरी । पेंठ इनाम पंढरी ॥ ध्रु ॥
वाहाती मारग । अवघें मोहोरलें जग ॥ २ ॥
तुका ह्मणे माप । खरें आणा माझे बाप ॥ ३ ॥

॥ १०४२ ॥

लक्ष्मीवल्लभा । दिनानाथा पद्मनाभा ॥ १ ॥
॥ ध्रु० ॥ सुख वसे तुझे पायीं । मज ठेवीं ते[10] चि ठायीं ॥ ध्रु ॥
माझी अल्प* हे वासना । तूं तो उदाराचा राणा ॥ २ ॥
तुका ह्मणे भोगें । पीडा केली धांव वेगें ॥ ३ ॥

॥ १०४३ ॥

करीं ऐसें जागें । वेळोवेळां पायां लागें ॥ १ ॥
॥ ध्रु० ॥ प्रेम झोंबो[11] कंठीं । देह धरणिये लोटीं ॥ ध्रु ॥

---

१ पं.—सिद्ध सर्व.— २ पं. तें तें.— ३ सुल्हद सोईरा. दे. सुहुर्द.— ४ पं. सारिखे ची.— ५ त. बडबड.—६ पं. कोणा.— ७ त. पं. आलें.— ८ त. अनुभव. पं. अनुभवा.— ९ दे. पं. वेरझार.—१० पं. "ते चि" याबद्दल "तये."—११ पं. झोंबे.—* पं. "अल्प" शब्द नाहीं.

राहे लोकाचार । पडे अवघा विसर ॥ २ ॥
तुका ह्मणे ध्यावें । तुज [1]व्यंभिचारभावें ॥ ३ ॥

॥ १०४४ ॥

टाळ दिंडी हातीं । वैकुंठींचे [*]ते सांगाती ॥ १ ॥
॥ ध्रु० ॥ जाल तरी कोणी जा गा । करा सिदोरी ते वेगा ॥ ध्रु ॥
जाती सादावीत । तेथें असों द्यावें चित्त ॥ २ ॥
तुका ह्मणे बोल । जाती बोलत विठ्ठल ॥ ३ ॥

॥ १०४५ ॥

वांयां जातों देवा । नेणें भक्ती करूं सेवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां जोडोनियां हात । उभा राहिलों निवांत ॥ ध्रु ॥
करावें तें काय । न कळे अवलोकितां पाय ॥ २ ॥
तुका ह्मणे दान । दिलें पदरीं घेईन ॥ ३ ॥

॥ १०४६ ॥

जीव खादला [2]दैवतें । माझा येणें महाभूतें ।
झोंबलें निरुतें । कांहीं [3]करितां न सुटे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां करूं काय । न चले करितां उपाय ।
तुह्मां आह्मां [4]सैये । [5]विघडाविघड केली ॥ ध्रु ॥
बोलतां दुश्चिती । मी वो पडियेलें भ्रांती ।
[6]आठव हा चित्तीं । न ये ह्मणतां मी माझें ॥ २ ॥
भलतें चि चावळे । जना अवघिया वेगळे ।

१ त. दे. विभीचारभावें.– २ दे. त. देवत.– ३ पं केल्या.– ४ दे. सय. पं. सव्य.– ५ पं. विघडाविघडी.–६ पं. "आठवहा" याबद्दल "आठवण."–* दे. "ते" शब्द नाहीं.

नाठवती बाळें । आपपर सारिखें ॥ ३ ॥
नका बोलों सैये । मज वचन न साहे ।
बैसोल त्या राहें । उग्या वाचा खुंटोनी ॥ ४ ॥
तुह्मां आह्मां भेटी । नाहीं जाली जीवेंसाटीं ।
तुका ह्मणे दृष्टी । पाहा जवळी आहे तों ॥ ५ ॥

॥ १०४७ ॥

जीवींचा जिव्हाळा । पाहों आपुलिया डोळां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आह्मां विठ्ठल एक देव । येर अवघे चि वाव ॥ ध्रु ॥
पुंडलिकाचे पाठीं । उभा हात ठेवुनि कटी ॥ २ ॥
तुका ह्मणे चित्तीं । वाहूं रखुमाईचा पती ॥ ३ ॥

॥ १०४८ ॥

माझें आराधन । पंढरपुरींचें निधान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तया एका*विण दुजें । कांहीं नेणें पंढरीराजें ॥ ध्रु ॥
दास विठ्ठलाचा । अंकित अंकिला ठायींचा ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां । नव्हे पालट सर्वथा ॥ ३ ॥

॥ १०४९ ॥

आतां आह्मां हें चि काम । नें विसंभावें तुझें नाम ।
वाहुनियां टाळी । प्रेमसुखें नाचावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघी जाली आराणूक । मागें पुढें सकळिक ।
त्रिपुटीचें दुःख । प्रारब्ध सारिलें ॥ ध्रु ॥

---

१ पं. सय्य –२ पं. बैसल्या.–३ दे. पंढरपुरचें.– ४ पं. वाचे गोडं तुझें नाम.– ५ पं. "प्रेम सुखें" याबद्दल "सुखें आनंदें."–६ पं. प्रारब्धें. * पं. "एका" शब्द नाहीं.

गोदातटें निर्मळें । देव देवांचीं देवळें ।
संत महंत मेळे । दिवस जाय सुखाचा ॥ २ ॥
तुका ह्मणे पंढरीनाथा । आणिक नाहीं मज चिंता ।
योगक्षेम माथां । भार तुझ्या घातला ॥ ३ ॥

॥ १०५० ॥

चोरटें सुनें मारिलें टाळे । कैंउं करी परि न संडी चाळे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें एक दुराचारी गा देवा । आपुलिया जीवा घात करी ॥ध्रु॥
नाक गेलें तरि लाज ना विचार । हिंडे फजितखोर दारोदारीं ॥ २ ॥
तुका ह्मणे कर्म बळिवंत गाढें । नेदी तया पुढेंमागें सरों ॥ ३ ॥

॥ १०२१ ॥

मुनि मुक्त जाले भेणें गर्भवासा । आह्मां विष्णुदासां सुलभ तो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघा चि संसार केला ब्रह्मरूप । विठ्ठलस्वरूप ह्मणोनियां ॥ध्रु॥
पुराणीं उपदेश साधन उद्धट । आह्मां सोपी वाट वैकुंठींची ॥ २ ॥
तुका ह्मणे जनां सकळांसहित । घेऊं अखंडित प्रेमसुख ॥ ३ ॥

॥ १०५२ ॥

न करावी स्तुति माझी संतजनीं । होईल या वचनीं अभिमान ॥ १ ॥
भारें भवनदी नुतरवे पार । दुरावती दूर तुमचे पाय ॥ २ ॥
तुका ह्मणे गर्व पुरवील पाठीं । होईल माझ्या तुटी विठोबाची ॥ २ ॥

॥ १०५३ ॥

तुमचिये दासींचा दास करूनि ठेवा । आशीर्वाद द्यावा हा चि मज ॥ १ ॥

---

१ पं. आह्मी.—२ पं. बैसोनि निवांत सुख भोगूं.

नवविधा काय बोलिली जे भक्ती । ध्यावी माझ्या हातीं संतजनीं ॥ २ ॥
तुका ह्मणे तुमच्या पायांच्या आधारें । उतरेन खरें भवनदी ॥ ३ ॥

॥ १०५४ ॥

चोर टंकाचे निघाले चोरी । आपलें तैसें पारखे घेरीं[2] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं[3] नफा नागवे आपण । गमाविले कान हात पाय ॥ध्रु॥
बुद्धिहीन नये[4] कांहीं चि कारणा । तयासवें जाणा तें चि सुख ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं ठाउकें वर्म । तयांसी कर्म वोडवलें ॥ ३ ॥

॥ १०५५ ॥

समर्थाचें बाळ कीविलवाणें दिसे । तरी कोणा हांसे जन देवा ॥ १ ॥
अवगुणी जरी जालें तें वोंगळ । करावा सांभाळ लागे त्याचा ॥ २ ॥
तुका ह्मणे तैसा मी एक पतित । पैरि[6] मुद्रांकित जालों तुझा ॥ २ ॥

॥ १०५६ ॥

गाढवाचे अंगीं चंदनाची उटी । राँखेसवें भेटी केली तेणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सहज[8] गुण जयांचे देहीं । पालट कांहीं नव्हे तया ॥ ध्रु ॥
मांकडाचे गळां मोलाचा मणि । घातला चावुनी टाकी थुंकोनि ॥ २ ॥
तुका ह्मणे खळा नावडे[12] हित । अविद्या वाढवी आपुलें[13] मत ॥ ३ ॥

॥ १०५७ ॥

नेणे सुनें चोर पाहुणा मागता । देखून भलता भुंकतसे ॥ १ ॥

---

१ पं. ध्यावी.–२ पं. धरी.–३ पं. नाहीं कांहीं नफा०.– ४ पं. नव्हे.–५ त. तयासी तें कर्म०.–६ पं. दास.–७ दे. राख तया तेणें केलीसे भेटी.–८ पं. सहज तो गुण०– ९ त. जयाचा.–१० पं पालटतो कांही०.–११ माकडाचिया गळां मोलाचा तो मणि ॥ घातला भोवुनि थुंकोनि टाकी ॥ ११ पं. नावडे तें हित.–१३ पं. मत आपलें तें.

॥ ध्रु. ॥ शिकविलें कांहीं न[1] चले तया । बोलियेले वांयां बोल जाती ॥ध्रु॥
क्षीर ओकुनियां खाय अमंगळ । आपुली ते ढाळ जाऊं नेदी ॥ २ ॥
वंदूं[2] निंदूं काय दुराचार[3] । खळाचा विचार तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ १०५८ ॥

जन मानवलें[4] वरी बाह्यात्कारीं । तैसा मी अंतरीं नाहीं जालों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणउनी पंढरीनाथा वाटतसे चिंता । प्रगट बोलतां लाज वाटे ॥ध्रु॥
संतां ब्रह्मरूप जालें अवघें जन । ते माझे अवगुण न देखती ॥ २ ॥
तुका ह्मणे मी तों आपणांसी ठावा । आहें बरा देवा जैसा तैसा ॥ ३ ॥

॥ १०५९ ॥

काम क्रोध माझे जीताती शरीरीं । कोरडें तें वरी बोलतसें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ कैसों[5] सरतां जालों तुझ्या पायीं । पांडुरंगा कांहीं न कळे हें ॥ ध्रु ॥
पुराणींची ग्वाही वदतील संत । तैसें नाहीं चित्त शुद्ध जालें ॥ २ ॥
तुका ह्मणे मज आणूनि अनुभवा । दाखवीं हें देवा साच खरें ॥ ३ ॥

॥ १०६० ॥

स्तुति करीं जैसा नाहीं अधिकार । न कळे विचार योग्यतेचा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ तुमचें[6] मी दास संतांचें दुर्बळ । करूनि सांभाळ राखा पायीं ॥ ध्रु ॥
रामकृष्णहरि मंत्र उच्चारणा । आवडी चरणां विठोबाच्या ॥ २ ॥
तुका ह्मणे तुमचें सेवितों उच्छिष्ट । क्षमा करीं धीट होऊनियां ॥ ३ ॥

॥ १०६१ ॥

बहु दूरवरी ॥ वेठीं[7] ओझें होतें शिरीं ॥ १ ॥

---

१ पं. न चले तें तया.—२ पं. वंदूं निदूं संतां काय०.—३ त. दुराचारी थोर.—४ दे. त. मानविलें.—५ त. कइसा०. पं. कैसा मी सरता०.—६ पं. तुमचा.—७ पं वेठी.

॥ ध्रु. ॥ आतां उतरला भार । तुह्मीं केला अंगीकार ॥ ध्रु ॥
बहु काकुलती । आलों मागें किती ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । आजि सफळ जाली सेवा ॥ ३ ॥

पाईक—अभंग ११.

॥ १०६२ ॥

पाईकपणें जोतिला सिद्धांत । शूर[3] धरी मात वचन चित्तीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाइकावांचून नव्हे कधीं सुख । प्रजांमध्यें दुःख न सरे पीडा ॥ ध्रु ॥
तरि[4] व्हावें पाईक जिवाचे[5] उदार । सकळ त्यांचा भार स्वामी वाहे ॥ २ ॥
पाइकीचें सुख जयां नाहीं ठावें । धिग त्यांनीं ज्यावें वांयांविण ॥ ३ ॥
तुका ह्मणे एका क्षणांचा करार । पाईक अपार सुख भोगी ॥ ४ ॥

॥ १०६३ ॥

पाइकीचें सुख पाइकासी ठावें । ह्मणोनियां जीवें केली साटी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येतां गोळ्या बाण साहिले भडमार ॥ वर्षतां अपार वृष्टि वरी ॥ ध्रु ॥
स्वामीपुढें व्हावें पडतां भांडण । मग त्या मंडन शोभा दावी ॥ २ ॥
पाइकानीं सुख भोगिलें अपार । शुद्ध आणि धीर अंतर्बाहीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे या सिद्धांताच्या खुणा । जाणे तो शाहाणा करी तो भोगी ॥ ४ ॥

॥ १०६४ ॥

पाईक तो जाणे पाइकीचा भाव । लाग[6] पगें ठाव चोरवाट ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपणां राखोनि ठकावें आणीक । घ्यावें सकळीक हरूनियां ॥ ध्रु ॥
येऊं नेदी लाग लागों नेदी माग । पाईक त्या जग स्वामी मानी ॥ २ ॥

---

१ पं. आलें असें मागें०.—२ पं. पाईक ह्मणे—३ दे. सुर. पं. त. शुर.—४ पं. तरीच पाईक.—५ दे. जिवाचा.—६ पं. लाग बग ठाव०.

ऐसें जन केलें पाइकें पाईक । जया कोणी भीक न घलिती ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऐसे जयाचे पाईक । बळिया तो नाईक त्रैलोकींचा ॥ ४ ॥

॥ १०६५ ॥

पाइकांनीं पंथ चालविल्या वाटा । पारख्याचा सांटा मोडोनियां ॥ १ ॥
॥धु.॥ पारखिये ठायीं घेउनियां खोंगें । आपलें तें जन राखियेलें ॥ ध्रु ॥
आधारेंविण जें बोलतां चावळे । आपलें तें कळे नव्हे ऐसें ॥ २ ॥
सांडितां मारग मारिती पाईक । आणिकांसी शीक लागावया ॥ ३ ॥
तुका ह्मणे विश्वा घेऊनि विश्वास । पाईक तयास सुख देती ॥ ४ ॥

॥ १०६६ ॥

पाईक तो प्रजा राखोनियां कुळ । पारखिया मूळ छेदी दुष्टा ॥ १ ॥
॥ धु. ॥ तो एक पाईक पाइकां नाईक । भाव सकळीक स्वामिकाजीं ॥ध्रु॥
तृणवत तनु सोनें ज्या पाषाण । पाइका त्या भिन्न नाहीं स्वामी ॥२॥
विश्वासावांचूनि पाइकासी मोल । नाहीं मिथ्या बोल बोलिलिया ॥ ३ ॥
तुका ह्मणे नये स्वामी उणेपण । पाइका जतन करी त्यासी ॥ ४ ॥

॥ १०६७ ॥

धनी ज्या पाइका मानितो आपण । तया भितें जन सकळीक ॥ १ ॥
॥ धु. ॥ जिवाचे उदार शोभती पाईक । मिरवती नाईक मुगुटमणि ॥ ध्रु ॥
आपुलिया सत्ता स्वामीचें वैभव । भोगिती गौरव सकळ सुख ॥ २ ॥
कमाइचीं हीणें पडिलीं उदंडें । नाहीं तयां खंड येती जाती ॥ ३ ॥
तुका ह्मणे तरि पाइकी च भली । थोडीबहुत केली स्वामिसेवा ॥ ४ ॥

---

१ पं. त्रैलोकींचे.—२ त. खाण.—३ त. पं. दुष्टा.

॥ १०६८ ॥

पाइकपणें खरा मुशारा । पाईक तो खरा पाइकीनें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाईक जाणे मारितें अंग । पाइकासी भंग नाहीं तया ॥ ध्रु. ॥
एके दोहीं घरीं घेतलें खाणें । पाईक तो पणें निवडला ॥ २ ॥
करूनि कारण स्वामी यश द्यावें । पाइका त्या नांवें खरेपण ॥ ३ ॥
तुका ह्मणे ठाव पाइकां निराळा । नाहीं स्वामी छळा गेल्याविण ॥ ४ ॥

॥ १०६९ ॥

उंच निंच कैसी पाइकाची ओळी । कोण गांढे बळी निवडिले ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ स्वामिकार्जीं एक सर्वस्वें तत्पर । एक ते कुचर आशाबद्ध ॥ध्रु.॥
प्रसंगावांचूनि आणिती आविर्भाव । पाईक तो नांव मिरवी वांयां ॥ २ ॥
गणतीचे एक उंच निंच फार । तयांमध्यें शूर विरळा थोडे ॥ ३ ॥
तुका ह्मणे स्वामी जाणे त्यांचा मान । पाईक पाहोन मोल करी ॥ ४ ॥

॥ १०७० ॥

एका च स्वामीचे पाईक सकळ । जैसें[10] बळ तैसें मोल तया ॥ १ ॥
॥ध्रु.॥ स्वामिपदीं एकां ठाव उंच स्थळीं । एकें तीं निराळीं जवळी दुरी ॥ ध्रु. ॥
हीन कमाईचा हीन आन ठाव । उंचा सर्व भाव उंच पद ॥ २ ॥
पाइकपणें तो सर्वत्र सरता । चांग तरी परता गांढ्या ठाव ॥ ३ ॥
तुका ह्मणे मरण आहे या सकळां । भेणें अवकळा अभयें मोल ॥ ४ ॥

---

१ पं. पाइकपणें तो खरा०.—२ पं. पाईक तो जाणे०.—३ पं. एक दोही.—४ त. पारण.—५ त. पं. नांवें.—६ पं. बोली (दे. त. बोळी)— ७ त. गाढे.— ८ पं. आशा बहु.—९ दे. त. पं. आयुर्भाव.—१० त. पं. जैसें तैसें बळ मोल०.—११ पं. एक ते नि० त. एकें वे नि०.—१२ पं. बाव.

॥ १०७१ ॥

प्रजी तो पाईक ओळीचा नाईक । पोटासाटीं एकें जैशीं तैशीं ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आगळें पाऊल आणिकांसी तरी । पळती माघारीं तोडिजेती ॥ध्रु॥
पाठीवरी घाय ह्मणती फटमर । धडा अंगें शूर मान पावे ॥ २ ॥
घेईल दरवडा देहा तो पाईक । मारी सकळीक सर्व हरी ॥ ३ ॥
तुका ह्मणे नव्हे बोलाचें कारग । कमाईचा पण सिद्धी पावे ॥ ४ ॥

॥ १०७२ ॥

जातीचा पाईक ओळखे पाइका । आदर तो एका त्याचे ठायीं ॥ १ ॥
॥ध्रु.॥ धरितील पोटासाटीं हतियेरें । कळती तीं खरें वेठीचींसीं ॥ ध्रु ॥
जातीचें तें असे खरें घायडाय । पारखिया काय पाशीं लोपे ॥ २ ॥
तुका ह्मणे नमूं देव म्हूण जना । जालियांच्या खुणा जाणतसों ॥ ३ ॥

॥ १०७३ ॥ ॥११॥

बुद्धीचा पालट धरा रे कांहीं । मागुता नाहीं मनुष्यदेह ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आपुल्या हिताचे न होती सायास । गृहदाराआसधनवित्त ॥ध्रु॥
अवचितें निधान लागलें हें हातीं । भोगावी विपत्ति गर्भवास ॥ २ ॥
यावें जावें पुढें ऐसें चि कारण । भोगावें पतन नरकंवास ॥ ३ ॥
तुका ह्मणे धरीं आठव या देहीं । नाहीं तरि कांहीं बरें नव्हे ॥ ४ ॥

॥ १०७४ ॥

आह्मीं पतितांनीं घालावें सांकडें । तुह्मां लागे कोडें उगवणें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आचरतां दोष न धरूं सांभाळ । निवाड उकल तुह्मां हातीं ॥ध्रु॥

---

१ त. धाव.—२ दे पं. अंग.—३ पं. हातियेर. त. हातीयेरें.—४ त. येरें.—५ पं. वेटीसीची.—६ पं जातीचे असे खरे डाये घाये । सारखिया काय पासी लोपे ॥ — ७ पं. म्हुण.—८ दे. नव्हती.—९ पं. अवचिता निधान लागलें से हातीं —१० पं. लागी.

न घेतां कवडी करावा कुढावा । पाचारितां देवा नामासाठीं ॥ २ ॥
दयासिंधु नाम पतितपावन । हें आह्मां वचन सांपडलें ॥ ३ ॥
तुका ह्मणे करूं अन्यायाच्या कोटी । क्षमावंत पोटीं तूं चि देवा ॥ ४ ॥

॥ १०७५ ॥

जो भक्तांचा विसावा । उभा पाचारितो धांवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हातीं प्रेमाचें भातुकें । मुखीं घाली कवतुकें ।
भवसिंधू सुखें । उतरी कासे लावूनि ॥ ध्रु ॥
थोर भक्तांची आस । पाहे भोंवताली वास ॥ २ ॥
तुका ह्मणे कृपादानी । फेडी आवडीची धणी ॥ ३ ॥

॥ १०७६ ॥

अखंड तुझी जया प्रीति । मज दे त्यांची संगति ।
मग मी कमळापति । तुज नाणीं कांटाळा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पडोन राहेन ते ठायीं । उगा चि संतांचिये पायीं
न मगें न करीं कांहीं । तुझी आंण विठोबा ॥ ध्रु ॥
तुह्मी आह्मी पीडों ज्यानें । दोन्ही वारतीं एकानें ।
बैसलों धरणें । हाका देत दारेशीं ॥ २ ॥
तुका ह्मणे या बोला । चित्त द्यावें बा विठ्ठला ।
न पाहिजे केला । अवघा माझा आव्हेर ॥ ३ ॥

॥ १०७७ ॥

पुनीत केलें विष्णुदासीं । संगें आपुलिया दोषी ॥ १ ॥

---

१ पं. कुडावा.– २ पं. जया तुझी – ३ पं. तुज वा नाणी कंटाळा०. दे. तुज नानीं.– ४ पं. आण गा विठोबा.–५ पं. जन.–६ पं. वारतील कान.–७ पं. द्वारासीं.–८ पं. अर्वा.

॥ ध्रु. ॥ कोण पाहे तयांकडे । वीर विठ्ठलाचे गाढे ।
अशुभ त्यांपुढें शुभ होउनियां ठाके[१] ॥ ध्रु ॥
प्रेमसुखाचिया रासी । पाप नाहीं ओखदासी ॥ २ ॥
तुका ह्मणे त्यांनीं । केली वैकुंठ मेदिनी ॥ ३ ॥

॥ १०७८ ॥

जने[२] देव तरी पायां चि पडावें । त्याचिया स्वभावें चाड नाहीं ॥ १ ॥
अग्नीचें सौजन्य शीतनिवारण । पालवीं बांधोनि नेतां नये ॥ २ ॥
तुका ह्मणे विंचु सर्प नारायण । वंदावे दुरोन शिवों नये ॥ ३ ॥*

---

१ दे. 'ठाके' याच्यापुढें 'गाढे' असा शोध घातला आहे.–२ पं. जग.– * याच्या पुढें 'भक्तभागवत०', 'पंडित वैदिक०', 'माझी मज०', व 'वैष्णवाची याती०', हे चार अभंग तळेगांवच्या प्रतीत रामेश्वर भटाचे आहेत. देहूच्या व पंढरपूरच्या प्रतींत 'भक्तभागवत०', हा मात्र आहे. यापैकी प्रत्येक अभंगात तुकारामाची प्रशंसा इ०आहे, त्याच्या शेवटच्या कडव्यांत "ह्मणे रामेश्वर" असें आहे यांवर तळेगावच्या प्रतींत "रामेश्वर भ० अ० ४" असें सदर आहे इत्यादि कारणांवरून ते चार अभंग रामेश्वर भट याचेच आहेत असें खचित समजतें; ह्मणून ते येथें फक्त टिपेंत दाखल केले आहेत:–

रामेश्वरभट याचे अभंग ४.

॥ १०७९ ॥

भक्त भागवत जीवन्मुक्त संत । महिमा अत्यद्भुत चराचरीं ।
ऐसिया अनंतामाजी तूं अनंत । लीलाविग्रह होत जगत्राता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ब्रह्मानंद तुकें तुळे आला तुका । तो हा विश्वसखा क्रीडे जनीं ॥ ध्रु ॥
शास्त्रा श्रेष्ठाचार अविरुद्ध क्रिया । तुझी भक्तराया देखियेली ।
देऊनि तिळांजुळी काम्य निषिद्धासी । विधिविणे योगेशी ब्रह्मार्पण ॥ २ ॥
संत महमेळीं जगधंद्या मिळी । पैल उदयाचळीं भानु तुका ।
संत वृंदें तीर्थ गौतमी हरिकथा । तुकया नर सिंहस्ता भेटों आली ॥ ३ ॥
शांति पतिव्रते जाले परि नयन । काम संतर्पण निष्कामता ।

॥ १०७९ ॥

भूत भविष्य कळों यावें वर्तमान । हें तों भाग्यहीन त्यांची जोडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आह्मीं विष्णुदासीं देव ध्यावा चित्तें । होणार तें होतें प्रारब्धें ॥ ध्रु. ॥
जगरूढीसाटीं घातलें दुकान । जातो नारायण अंतरोनि ॥ २ ॥
तुका ह्मणे हा हो प्रपंच गाढा । थोरली ते पीडा रिद्धिसिद्धी ॥ ३ ॥

१ त. परारब्धें.—२ दे. त. घातला.—३ त. परपंच०. पं. प्रपंच चि गाढा.

(३८० पृष्ठावरील टीप.)

क्षमा क्षमापणें प्रसिद्ध प्रथा जगीं । तें तों तुझ्या अंगीं मूर्तिमंत ॥ ४ ॥
दया दिनानाथा तुवां जीवविली । विश्वीं विस्तारली कीर्ति तुझी ।
वेदवाक्यबाहु उभारिला ध्वज पूजिले देव द्विज सर्वभूतें ॥ ॥५
अधर्म क्षयव्याधि धर्माशीं स्पर्शला । तो त्वां उपचारिला अनन्यभक्ति ।
ब्रह्म ऐक्यभावें भक्ति विस्तारिली । वाक्यें सपळ केलीं वेदविहितें ॥ ६ ॥
देहबुद्धि जात्या अभिमानें वंचलों । तो मी उपेक्षिलों न पाहिजे ।
न घडो याचे पायीं बुद्धीचा व्यभिचार । मागे रामेश्वर रामचंद्र ॥ ७ ॥

॥ १०८० ॥

पंडित वैदिक अथवा दशग्रंथी । परि सरी न पवती तुकयाची ।
शास्त्र ही पुराणें गीता नित्य नेम । वाचिताती वर्म न कळे त्यांसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कर्म अभिमानें वर्ण अभिमानें । नाडले ब्राह्मण कलियुगीं ॥ ध्रु ॥
तैसा नव्हे तुका वाणी व्यवसाई । भाव त्याचा पायीं विठोबाचे ।
अमृताची वाणी बरुषला शुद्ध । करी त्या अशुद्ध ऐसा कोण ॥ २ ॥
चहूं वेदांचे हें केलें विवरण । अर्थ ही गहन करूनियां ॥
उत्तम मध्यम कनिष्ट वेगळे । करुनी निराळे ठेविले ते ॥ ३ ॥
भक्तिज्ञानें आणि वैराग्यें आगळा । ऐसा नाहीं डोळा देखियेला ।
जप तप यज्ञ लाजविलीं दानें । हरिनाम कीर्तनें करूनियां ॥ ४ ॥
मागे कवीश्वर जाले थोर थोर । नेले कलिवर कोणें सांगा ।
ह्मणे रामेश्वर सकळां पुसोनि । गेला तो विमानी बैसोनियां ॥ ५ ॥

॥ १०८० ॥

॥ घोंगड्याचे अभंग– ॥ १२ ॥

ठकिलें काळा मारिली दडी । दिली कुडी टाकोनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पांघुरलों[1] बहु काळें । घोंगडें बळें सांडवलें ॥ ध्रु ॥
भये ऐसा[2] लाग वरी । परतें दुरी लपालें[3] ॥ २ ॥
तुका ह्मणे आड सेवा । लाविला हेवा धांदली ॥ ३ ॥

---

१ पं. पांघरलों.–२ पं.ऐशा.–३ पं. लपाले.

(३८० पृष्ठावरील टीप.)

॥ १०८१ ॥

माझी मज आली रोकडी प्रचित । होऊनि फजित दुःख पावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कांहीं द्वेष त्याचा करितां अंतरीं । व्यथा या शरीरीं बहुत जाली ॥ ध्रु ॥
ज्ञानेश्वरें मज केला उपकार । स्वप्नीं सविस्तर सांगितलें ॥ २ ॥
तुका सर्वां श्रेष्ठ प्रिय आह्मां थोर । कां जे अवतार नामयाचा ॥ ३ ॥
त्याची तुज कांहीं घडली रे निंदा । ह्मणोनि हे बाधा घडली तुज ॥ ४ ॥
आतां एक करीं सांगेन तें तुला । शरण जाईं त्याला निश्चयेशीं ॥ ५ ॥
दर्शनें चि तुझ्या दोषा परिहार । होय तो विचार सांगितला ॥ ६ ॥
तो चि हा विश्वास धरूनि मानसीं । जाय कीर्त्तनासी नित्य काळ ॥ ७ ॥
ह्मणे रामेश्वर त्याच्या समागमें । जालें हें आराम देह माझें ॥ ८ ॥

॥ १०८२ ॥

वैष्णवांची याती वाणी जो आपण । भोगी तो पतन कुंभपाकीं ॥ १ ॥
॥ ध्रु ॥ ऐशी वेद श्रुति बोलती पुराणें ॥ नाहीं तें दुषण हरिभक्ता ॥ ध्रु ॥
उंच निंच वर्ण न ह्मणावा कोणी । जें कां नारायणीं प्रिय जालें ॥ २ ॥
चहूं वर्णासी हा असे अधिकार । करितां नमस्कार दोष नाहीं ॥ ३ ॥
जैसा शालिग्राम न ह्मणावा पाषाण । होय पूज्यमान सर्वत्रासी ॥ ४ ॥
गुरु परब्रह्म देवाचा तो देव । त्यासी तो मानव ह्मणूं नये ॥ ५ ॥
ह्मणे रामेश्वर नामीं जे रंगले । स्वयें चि ते जाले देवरूप ॥ ६ ॥

॥ १०८१ ॥

घोंगाडियांचा पालट केला । मुलांमुलां आपुल्यांत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कान्होबा तो मी च दिसें । लाविलें पिसें संवगडियां ॥ ध्रु ॥
तो बोले मी उगाच बैसें । आनारिसें न दिसे ॥ २ ॥
तुका ह्मणे दिलें सोंग । नेदी व्यंग[1] जाऊं देऊं ॥ ३ ॥

॥ १०८२ ॥

खेळों लागलों[2] सुरकवडी । माझी घोंगडी हारपली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कान्होबाचे पडिलों गळां । घेई गोपाळा देई झाडा ॥ ध्रु ॥
मी तों हागे उघडा जालों । अवघ्या आलों बाहेरी ॥ २ ॥
तुका ह्मणे बुद्धि काची । नाहीं ठायींची मजपाशीं ॥ ३ ॥

॥ १०८३ ॥

घोंगडियांची एकी राशी । त्याचपाशीं तें ही होतें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझियाचा माग दावा । केला गोवा उँगवों[4] द्या ॥ ध्रु ॥
व्हावें ऐसें निसंतान । घेईन आन तुजपाशीं ॥ २ ॥
तुका ह्मणे लाहाण मोठा । सांडा ताठा हा देवा ॥ ३ ॥

॥ १०८४ ॥

नाहीं तुझे उगा पडत गळां । पुढें गोपाळा जाऊं नको ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चाहाड तुझे दाविन घरीं । बोलण्या उरी नाहीं ऐसी ॥ ध्रु ॥
तुह्मां आह्मां पडदा होता । सरला आतां सरोबरी ॥ २ ॥
तुका ह्मणे उरती गोठी । पडिली मिठी न सुटे ॥ ३ ॥

---

१ पं. नेदी व्यंग जाउ देवा. दे. त. वेंग. —२ पं. लागली.— ३ पं. उगउ द्या.— ४ पं.घेयी.— ५ पं. मांडवा.

॥ १०८५ ॥

तुह्मां आह्मां उरी तोंवरी । जनाचारीं ऐसे[1] तैसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझें घोंगडें टाकुन देईं । एके ठायीं मग असों ॥ ध्रु ॥
विरोधानें पडे तुटी । कपट पोटीं नसावें ॥ २ ॥
तुका ह्मणे तूं जाणता हरी । मज वेव्हारीं बोलविसी ॥ ३ ॥

॥ १०८६ ॥

मुळींचा तुह्मां लागला चाळा । तो गोपाळा न संडा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घ्यावें त्याचें देणें चि नाहीं । ये चि वाहीं[2] देखतसों ॥ ध्रु ॥
माझी तरी घोंगडी मोठी । गांडीची लंगोटी सोडिस ना ॥ २ ॥
तुका ह्मणे म्यां सांडिली आशा । हुंगिला[3] फांसा येथुनियां ॥ ३ ॥

॥ १०८७ ॥

घोंगडियास घातली मिठी । न सोडीं साटी केली जीवें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हा गे चोर धरा धांवा कोणी । घरांत राहाटे चहूं कोणी[4] ॥ ध्रु ॥
नोळखवे म्यां धरिला हातीं । देहों[5] दीप माय लाविली वाती ॥ २ ॥
न[6] पावे धांवणें मारितो हाका । जनाचारीं तुका नागवला ॥ ३ ॥

॥ १०८८ ॥

आतां मी देवा पांवरों काई । भिकेचें तें ही उरे चि ना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सदैव[7] दुबळें नेणें चोर । देखोनि सुनाट फोडितो घर ॥ ध्रु ॥
नाहीं मजपाशीं फुटकी फोडी । पांचांनीं घोंगडी दिली होती[8] ॥ २ ॥
तुका ह्मणे जना वेगळें जालें । एक चि नेलें एकल्याचें ॥ ३ ॥

---

१ दे. ऐसें. पं. आहे.—२ पं. बाहि. दे. बाहिं.—३ पं. हुंगला.—४ पं. कोनि.—५ दे. देखादिप०.—६ पं. न पवे मारितो०.—७ दे. सदेंव. त. सदैव.—८ पं. पांचा घोंगडी.

॥ १०८९ ॥

मी माझें करित होतों जतन । भीतरिल्या चोरें घेतलें खानें ॥ १ ॥

॥ धृ. ॥ मज आल्याविण आधीं च होता । मज न कळतां मजे माजी ॥ धु ॥

घोंगडें नेलें घोंगडें नेलें । उघडें केलें उघडें चि ॥ २ ॥

तुका ह्मणे चोरटा चि जाला साव । सहज चि न्याय नाहीं तेथें ॥ ३ ॥

॥ १०९० ॥

घोंगडें नेलें सांगों मी कोणा । दुबळें माझें नोणीत मना ॥ १ ॥

॥ धृ. ॥ पुढें तें मज न मिळे आतां । जवळी सत्ता दाम नाहीं ॥ धृ ॥

सेटे महाजन ऐका कोणी । घोंगडियाची करा शोधणी ॥ २ ॥

घोंगडियाचा करा बोभाट । तुका ह्मणे जंव भरला हाट ॥ ३ ॥

॥ १०९१ ॥

माझें घोंगडें पडिलें ठायीं । माग तया पायीं सांपडला ॥ १ ॥

॥ धृ. ॥ चोर तो भला चोर तो भला । पाठिसी घातला पुंडलिकें ॥ धृ ॥

चोर कुठोरि एके चि ठायीं । वेगळें पाहावें न लगे कांहीं ॥ २ ॥

आणिकांचीं ही चोरलीं आधीं । माझें तयामधीं मेळविलें ॥ ३ ॥

आपल्या आपण शोधिलें तीहीं । करीन मी ही ते चि परी ॥ ४ ॥

तुका ह्मणे माझें हित चि जालें । फाटकें जाउन धेडकें आलें ॥ ५ ॥

॥ १२ ॥

॥ १०९२ ॥

सर्प भुलोनें गुंतला नादा । गारुडियें फांदां घातलासे ।

---

१ पं. घेतली खाण. त. घेतलें खान.–२ पं. मजपाशीं.–३ पं. उघड चि.–४ पं. सहज न्याप. त. सहज चि न्याव.–५ पं. नाणिती.–६ पं. त. शोधनी.–७ दे. नलगेच कांहीं.–८ पं. तोहि.–९ दे. धडकें चि आलें.–१० पं. गारुडिये फांदा घालीवसे.

हिंडवुनि पोट भरी दारोदारीं । कोंडुनि पेटारी[1] असेरया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसी परी मज जाली पांडुरंगा । गुंतलों[2] तो मी गा सोडीं आतां ॥
माझें मज कांहीं न चलेसें जालें । कृपा[3] तुज न करितां ॥ ध्रु. ॥
आविसें मीनें[4] लावियला[5] गळीं । भक्ष तो गिळी ह्मणउनियां ।
काढूनि बाहेरी प्राण घेऊं पाहे । तेथे बापमाये[6] कवण रया ॥ २ ॥
पक्षी पिलैंयां[7] पातलें आशा । देखोनियां फांसा गुंते बळें ।
मरण नेणें मांया[8] धांवोनि वोसरे । जीवित्वें[9] ना जालीं बाळें ॥ ३ ॥
गोडपणें मासीं गुंतलीं लिगाडीं । सांपडे फडफडी अधिकाअधिक[10] ।
तुका ह्मणे प्राण घेतला आशा । पंढरीनिवासा धांव घालीं ॥ ४ ॥

॥ १०९३ ॥ ॥ १२ ॥

यातिहीन मज काय तो अभिमान । मानी तुज जन नारायणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय सुख मज तयाची हे खंती । आपुलाला घेती गुणभाव ॥ ध्रु. ॥
द्रव्यांमुळें[11] माथां वाहियेली चिंधी । होन जयामधीं होता गांठी ॥ २ ॥
तुका ह्मणे जन वंदितो वेगळा । मजसीं दुर्बळा काय चाड ॥ ३ ॥

॥ १०९४ ॥

शीतळ साउली आमुची माउली । विठाई वोळली प्रेमपान्हा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जाऊनि वोसंगा रिघेन वोरस । लागलें[12] तें इच्छे पीइन वरी ॥ ध्रु. ॥
कृपा तनु माझी सांभाळी दुभूनि । अमृतजीवनी लोटलीसे ॥ २ ॥
आनंदाचा ठाव नाहीं मांझे[13] चित्तीं । सागर तो किती उपमेसी ॥ ३ ॥
सैर जाये पडे तयेसी सांकडें । सांभाळीत पुढें मागें असें[14] ॥ ४ ॥

---

१ पं. पेटारी आसेरया.— २ पं. गुंतलो मी०.— ३ पं. कृपा हे तुज०.— ४ दे. मिनु. त मीनु.—५ त. पं. लावियेला.—६ दे. त. बापुमाये.—७ पं. पीलीया पातले. त. पीलिया पातले.— ८ पं. सायासे धावोने०.—९ प. जीवित्वा नास जाली०.—१० पं. आधिकाधिक.—११ दे. पं. द्रव्यमुळें.—१२ पं. लागेल.—१३ दे. त. माझा.—१४ पं. त. असे.

तुका ह्मणे चिंता कैसी ते मी नेणें । लडिवाळ तान्हें विठाईचें ॥ ५ ॥

रामचरित्र—अभंग ॥ १४ ॥

॥ १०९५ ॥

रामा वनवास । तेणें वसे[1] सर्व देश ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ केलें नामाचें जतन । समर्थ तो नव्हे भिन्न ॥ ध्रु ॥
वनांतरीं रडे । ऐसे पुराणीं पवाडे ॥ २ ॥
तुका ह्मणे ऋषिनेम । ऐसा कळोनि कां भ्रम ॥ ३ ॥

॥ १०९६ ॥

राम ह्मणे ग्रासोग्रासीं । तो[2] चि जेविला उपवासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धन्यधन्य तें शरीर । तीर्थांव्रतांचें माहेर ॥ ध्रु ॥
राम ह्मणे करितां[3] धंदा । सुखसमाधि त्या सदा ॥ २ ॥
राम ह्मणे वाट[4] चाली । यज्ञ पाउलापाउलीं ॥ ३ ॥
राम ह्मणे भोगीं त्यागीं । कर्म न लिंपे त्या अंगीं ॥ ४ ॥
ऐसा राम जपे नित्य । तुका ह्मणे जीवन्मुक्त[5] ॥ ५ ॥

॥ १०९७ ॥

तारी ऐसे जड । उदकावरी जो दगड ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तो हा न करी तें[6] काई । कां रे लीन नव्हां[7] पायीं ॥ ध्रु ॥
सीळा[8] मनुष्य जाली । ज्याच्या चरणाचे चाली ॥ २ ॥
वानरां हातीं लंका । घेवविली ह्मणे तुका ॥ ३ ॥

---

१ पं. वस (ओस.)—२ पं. तो जेविला०.—३ पं. करी धंदा०.—४ दे. वाटे.—५ पं. वो वि मुक्त.—६ त. तो—७ पं. व्हाना.—८ पं. सीळा होती मनुष्य०.

॥ १०९८ ॥

राम ह्मणतां राम चि होइजे । पदीं बैसोन पदवी घेइजे ॥ १ ॥
॥ ध्रु ॥. ऐसें सुख वचनीं आहे । विश्वासें अनुभव पाहें ॥ ध्रु ॥
रामरसाचिया चवी । आन रस रुचती केवीं ॥ २ ॥
तुका ह्मणे चाखोनि सांगें । मज अनुभव आहे अंगें ॥ ३ ॥

॥ १०९९ ॥

रामराम उत्तम अक्षरें । कंठीं धरिलीं आपण शंकरें ॥ १ ॥
॥ध्रु.॥ कैसीं तारक उत्तम तिहीं लोकां । हळाहळ शितळ केलें शिवा देखा ॥ २ ॥
हा चि मंत्र उपदेश भवानी । तिच्या चुकल्या गर्भादियोनि ॥ २ ॥
जुंनाट नागर नीच नवें । तुका ह्मणे म्यां धरिलें जीवें भावें ॥ ३ ॥

॥ ११०० ॥

राम ह्मणतां तरे जाणतां नेणतां । हो का यातिभलता कुळहीन ॥ १ ॥
॥ध्रु.॥ राम ह्मणतां न लगे आणीक सायास । केले महा दोष तेही जळती ॥ ध्रु ॥
राम ह्मणे तया जवळी नये भूत । कैचा यमदूत ह्मणतां राम ॥ २ ॥
राम ह्मणतां तरे भवसिंधुपार । चुके वेरझार ह्मणतां राम ॥ ३ ॥
तुका ह्मणे हें सुखाचें साधन । सेवीं अमृतपान एका भावें ॥ ४ ॥

॥ ११०१ ॥

पैल आला राम रावणासी सांगती । काय निदसुरा निजलासी भूपति ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघे लंकेमाजी जाले रामाचे दूत । व्यापिलें सर्वत्र बाहेरी भीतरी आंत ॥ ध्रु ॥

---

१ पं. पद घेवियीजे.— २ लोकीं । हाळ हाळ०.—३ दे. जुन्हाट.—४ पं. ह्मणती.— ५ त. हें तों सुखाचें०.

अवघे अंगलग तुझे वधियेले वीर । होईं शरणागत किंवा युद्धासी सादर ॥२॥
तुका ह्मणे एक्या भावें रामेसी भेटी । करूनि घेईं आतां संबंधेसी तुटी ॥३॥

॥ ११०२ ॥

समरंगणा आला । रामें रावण देखिला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कैसे भीडतील दोन्ही । नांव सारुनियां रणीं ॥ ध्रु ॥
प्रेमसुखाचें संधान । बाणें निवारिती बाण ॥ २ ॥
तुकयास्वामी रघुनाथ । वर्म जाणोनि केली मात ॥ ३ ॥

॥ ११०३ ॥

केला रावणाचा वध । अवघा तोडिला संबंध ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लंकाराज्यें बिभीषणा । केली चिरकाळ स्थापना ॥ ध्रु ॥
औदार्याची सीमा । काय वर्णूं रघुरामा ॥ २ ॥
तुका ह्मणे माझा दाता । रामें सोडविली सीता ॥ ३ ॥

॥ ११०४ ॥

रामरूप केली । रामें कौसल्या माउली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ राम राहिला मानसीं । ध्यानीं चिंतनीं जयासी ।
रामें होय त्यासी । संदेह नाहीं हा भरवसा ॥ ध्रु ॥
अयोध्येचे लोक । राम जाले सकळीक ॥ २ ॥
स्मरतां जानकी । रामरूप जाले कपि ॥ ३ ॥
रावणेसी लंका । राम आपण जाला देखा ॥ ४ ॥
ऐसा नित्य राम ध्याय । तुका वंदी त्याचे पाय ॥ ५ ॥

---

१ पं. रामासी.—२ पं. आतां या या संमधेसी०.—३ पं. नाव.—४ पं. तुकारस्वामी.—५ लं-काराज्य.—६ दे. त. उदार्याची.—७ राम.—८ त. पं नाहीं भरवसा.—९ त. ककी.

॥ ११०५ ॥

आनंदले लोक नरनारी परिवार । शंखभेरीतुरें[1] वाद्यांचे गजर ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आनंदे[2] जाला अयोध्येसी आले रघुनाथ ।
अवघा जयजयकार[3] आळंगिला भरत[4] ॥ ध्रु ॥
करिती अक्षवाणें ओंवाळिती रघुवीरा ।
लक्ष्मीसहित लक्ष्मण दुसरा ॥ २ ॥
जालें रामराज्य आनंदलीं सकळें ।
तुका ह्मणे गाईवत्सें नरनारीबाळें ॥ ३ ॥

॥ ११०६ ॥

जालें रामराज्य काय उणें आह्मांसी ।
धरणी धरी पीकें[5] गाई वोळल्या ह्मैसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ राम वेळोवेळां आह्मी गाऊं ओंवियें ।
दळितां कांडितां जेवितां गे बाइये ॥ ध्रु ॥
स्वप्नीं ही दुःख कोणी न देखे डोळां ।
नामाच्या गजरें भय सुटलें काळा ॥ २ ॥
तुका ह्मणे रामें सुख दिलें[6] आपुलें ।
तयां गर्भवासीं येणें जाणें खुंटलें ॥ ३ ॥

॥ ११०७ ॥

अहल्या जेणें तारिली रामें । गणिका परलोका नेली नामें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ रामहरे रघुराजहरे । रामहरे महाराजहरे ॥ ध्रु ॥

---

१ पं. ०तुरें यायावाद्याचे०.– २ पं. " आनंद जाला अयोध्येसी " हें ध्रुपद पूर्वी असून " आनंदले लोक " हें पहिलें कडवें मागून आहे–३ दे. त. जेजेकार.–४ पं. भरथ.–५ त. पिका.–६ त. पं. दिधलें.

कंठ शीतळ जपतां शूळपाणी । राम जपतां अविनाशभवानी ॥ २ ॥
तारकमंत्रश्रवण काशी । नाम जपतां वाल्मीक ऋषि ॥ ३ ॥
नामजप बीजमंत्र नळा । सिंधु तरती ज्याच्या प्रतापें शिळा ॥ ४ ॥
नामजप जीवन मुनिजना । तुकयास्वामी रघुनंदना ॥ ५ ॥

॥ ११०८ ॥

मी तों अल्प मतिहीन । काय वर्णूं तुझे गुण ।
उदकीं तारिले पाषाण । हें माहिमान नामाचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाम चांगलें चांगलें । माझे कंठीं राहो भलें ।
कपिकुळ उद्धरिलें । मुक्त केलें राक्षसां ॥ ध्रु ॥
द्रोणागिरि कपिहातीं । आणविला सीतापती ।
थोर केली ख्याति । भरतभेटीसमयीं ॥ २ ॥
शिळा होती मनुष्य जाली । थोर कीर्ति वाखाणिली ।
लंका दहन केली । हनुमंतें काशानें ॥ ३ ॥
राम जानकीजीवन । योगियांचें निजध्यान ।
राम राजीवलोचन । तुका चरण वंदितो ॥ ४ ॥

॥ १४ ॥

॥ ११०९ ॥

॥ श्लोक रूपी अभंग—६ ॥

तुजवांचुनी मागणें काय कोणा । महीमंडळीं विश्वव्यापकजना ।
जीवभावना पूरवूं कोण जाणे । तुजवांचुनी होत कां रावराणे ॥ १ ॥

---

१ पं जपे—२ दे. अविनाश भवाणी—३ त. राममंत्र जप बीज मंत्र०. प. राम जपे बीज०. दे. नाम जपें बीज मंत्र०.—४ पं. मतिहीन.

नसे मोक्षदाता तिहींमाजि लोकां । भवतारकु तूजवांचुनि एका ।
मनीं मानसीं चिंतितां रूपनाम । पळे पाप ताप भयें नास काम ॥ २ ॥
हरी नाम हें साचें तूझें पुराणीं । हरीहातिचें काळगर्भादियोनी ।
करूं मुखवाणी कैसी देशधडी । तुजवांचुनि वाणितां व्यर्थ गोडी ॥ ३ ॥
भवभंजना व्यापेका लोक तिन्ही । तुज वाणितां श्रमला शेषफणी ॥
असो भावें जिव तुझ्या सर्व पायीं । दुजें मागणें आणिक व्यर्थ काई ॥ ४ ॥
दिनानाथ हे साक्ष तूझी जनासी । दिनें तारिलीं पातकी थोर दोषी ।
तुका राहिला पायिं तो राख देवा । असें मागतसे तुझी चरणसेवा ॥ ५ ॥

॥ १११० ॥

उभा भींवरेच्या तिरीं राहिलाहे । असे सन्मुख दक्षिणे मूख वाहे ।
महापातकांसी पळ कांप थोर । कैसे गर्जती घोष हे नामवीर ॥ १ ॥
गुणगंभीर हा धीर हास्यमुख । वदे वदनीं अमृत सर्वसुख ।
लागलें मुनिंवरां हें गोड चित्तीं । देहभावना तुटलियासि खंती ॥ २ ॥
ठसा घातला ये भूमिमाजी थोर । इच्छादाना हा द्यावयासी उदार ।
जया वोळगती सिद्धि सर्वठायीं । तुझें नाम हें चांगलें गे विठाई ॥ ३ ॥
असे उघडा हा विटेवरि उभा । कटसूत्र हें धरुनि भक्तिलोभा ।
पुढें वाट दावी भवसागराची । विठो माउली हे सिद्धसाधकांची ॥ ४ ॥
करावे गुहा धरा पंथ आधीं । जया पार नाहीं सुखा तें च साधीं ।
ह्मणे तुका पंढरीस सर्व आलें । असे विश्व हें जीवनें त्याचि ज्यालें ॥५॥

---

१ त. नासे काम.–२ दे. व्यापक.–३ दे. मुनिवरां गोड.–४ दे. आस.